॥ विद्या अमृतम् अश्नुते ॥

स्थापना - १९९४

सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे
# कला व वाणिज्य महाविद्यालय

**पाचल - रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी**

मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न

# सह्यगिरी

## २०२५ - २६



**नॅक पुनर्मुल्यांकन 'बी' श्रेणी (Third Cycle)**

ISO 9001:2015 व ISO 29993:2017 प्रमाणित

# आमचे प्रेरणास्थान व प्रमुख आधारस्तंभ



# मा. श्री. मनोहर हरी खापणे

( प्रसिद्ध उद्योगपती )

अध्यक्ष

सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल

॥ विद्या अमृतम् अश्नुते ॥

सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे
# कला व वाणिज्य महाविद्यालय

पाचल - रायपाटण

**नॅक पुनर्मुल्यांकन 'बी' श्रेणी (Third Cycle)**

ISO 9001:2015 व ISO 29993:2017
प्रमाणित

# सह्यगिरी

२०२५ - २६

डॉ. बी. टी. दाभाडे
संपादक

डॉ. पी. एस. मेश्राम
प्र. प्राचार्य

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय,पाचल - रायपाटण

## • संपादक मंडळ •

अध्यक्ष

**प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम**

## • मुख्य संपादक •

**सहा. प्रा. डॉ. बी. टी. दाभाडे**

## • सहसंपादक •

**सह. प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील**

**सहा. प्रा. एस. एस. धोंगडे**

**सहा. प्रा. पी. पी. राठोड**

**सहा. प्रा. एस. जी. चव्हाण**

**सहा. प्रा. पी. के. कांबळे**

**श्री. एस. एल. सक्रे**

## • विद्यार्थी सदस्य •

**नेत्रा बावकर**

**राजरत्न व्हावळे**

( खासगी वितरणासाठी )

टीप - या अंकातील साहित्याशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

## • प्रकटन •


**प्रकाशन स्थळ** - श्री. मनोहर हरी खापणे
कला व वाणिज्य महाविद्यालय
पाचल - रायपाटण
मु. पो. रायपाटण, ता. राजापूर,
जि. रत्नागिरी पिन - ४१६ ७०४

**प्रकाशन काल** - वार्षिक

**मुद्रक** - श्री. मनोहर हरी खापणे
कला व वाणिज्य महाविद्यालय
पाचल - रायपाटण

**प्रकाशक** - प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम

**राष्ट्रीयत्व** - भारतीय

**पत्ता** - श्री. मनोहर हरी खापणे
कला व वाणिज्य महाविद्यालय
पाचल - रायपाटण
मु. पो. रायपाटण, ता.राजापूर,
जि. रत्नागिरी पिन - ४१६ ७०४

**प्रकाशकीय हक्क** - प्र. प्राचार्य,
श्री. मनोहर हरी खापणे कला व
वाणिज्य महाविद्यालय,
पाचल - रायपाटण, ता. राजापूर,
जि. रत्नागिरी, पिन - ४१६७०४


वर दिलेला तपशील आमच्या माहितीप्रमाणे खरा आहे.

# सह्याद्रि परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल



**मा. श्री. मनोहर हरी खापणे**

अध्यक्ष

## संचालक मंडळ



मा. श्री. शंकरराव चव्हाण

उपाध्यक्ष



मा. श्री. नरेश पाचलकर

सरचिटणीस



मा. श्री. संजय जोशी

सहचिटणीस



मा. श्री. प्रदीप खापणे

खजिनदार



मा. श्री. विजय सावंत

सदस्य



मा. श्री. अशोक सक्रे

सदस्य



मा.श्री. चंद्रकांत लिंगायत

सदस्य



मा. श्री. सिध्दार्थ जाधव

सदस्य

# प्राध्यापक वृंद



प्र. प्राचार्य डॉ.पी.एस्. मेश्राम



सह. प्रा. डॉ. व्ही. एस्. पाटील



सहा. प्रा. डॉ. ए. डी. पाटील



सहा. प्रा.डॉ. बी. टी. दाभाडे



सहा. प्रा. एस्. व्ही. निंबाळकर



सहा. प्रा. एस्. एस्. धोंगडे



सहा. प्रा. एन्. जी. देवन



डॉ. एम. आर. कोंडागुर्ले
ग्रंथपाल



सहा. प्रा. पी. पी. राठोड
(हंगामी)



सहा. प्रा. एस. जी. चव्हाण
(हंगामी)



सहा. प्रा. पी. के. कांबळे
(हंगामी)

## ◆ कार्यालयीन कर्मचारी ◆



श्री. आर. ए. चव्हाण
वरिष्ठ लिपिक



श्री. एस. एल. सक्रे
कनिष्ठ लिपिक



सौ. एस. व्ही. कोलते
ग्रंथालय परिचर



श्री. एस. एम. पालकर
शिपाई



श्री. एम. बी. साटम
शिपाई



श्री. बी. टी. जाधव
शिपाई



श्री. जी. एच. मदगे
शिपाई



# प्राचार्यांचे मनोगत

बालकवींच्या औदुंबर कवितेतील निसर्गरम्य वातावरणात आमचे महाविद्यालय वसले असून गेल्या तीन दशकाहून अधिक काळ महाविद्यालय ज्ञानदानाचे कार्य अविरत करत आहे. गतवर्षांपासून सुरू झालेल्या नवीन शैक्षणिक धोरणाचा अंगीकार आम्ही केला  असून नव शैक्षणिक धोरणाचे द्वितीयवर्ष यशस्वीपणे संपन्न होत आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोहरजी खापणे साहेब आणि त्यांचे सर्व संस्था पदाधिकारी, सहकारी, सभासद, हितचिंतक, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि आजी माजी सर्व विद्यार्थ्यांच्या बळावर आम्ही या महाविद्यालयापुढील सर्व आव्हानांना यशस्वीपणे सामोरे जात आहोत.

महाविद्यालयाच्या प्रगतीचा आणि यशस्वी घोडदौडीचा आलेख म्हणजे महाविद्यालयाचा 'सह्यगिरी'  हा वार्षिक अंक  होय. महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणजे उद्याच्या बलशाली भारताचे जबाबदार नागरिकच. विकसनशील भारताकडून विकसित भारताकडे घेऊन जाणारा हा तरुणाईचा झंझावात, त्यांच्या अंतरंगातील ध्येयवाद आणि आपली स्वप्ने पूर्ण व्हावी म्हणून त्यांची चाललेली धडपड आणि या साऱ्या त्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून प्रकटणारा त्यांचा शब्द प्रपंच टिपण्याचा प्रयत्न आमच्या या 'सह्यगिरी' वार्षिक अंकातून होतो. हा अंक आपल्या हाती सुपूर्द करताना आम्हाला अपूर्व आनंद होत आहे.परिसरातील विद्यार्थ्यांच्या घराघरात उच्च शिक्षणाची गंगा पोहोचवणारे भगीरथ म्हणून आमच्या संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोहरजी खापणे साहेब यांना ओळखले जाते.

आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांचे हे कार्य गेली तीन दशकाहून अधिक काळ अविरत सुरू आहे. या परिसरातील विद्यार्थी, पालक यांचेही या कामी अनमोल सहकार्य होत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय अविरत धडपडत आहे.यातूनच वर्षभर महाविद्यालयात उपक्रमांची रेलचेल सुरू असते. महाविद्यालयात दि. १८ जुलै रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाची एक दिवसीय जिल्हास्तरीय कौशल्याधारित कार्यशाळा संपन्न झाली. दि. २५ व २६ जुलै २०२५ या कालावधीत दोन दिवशीय नॅक संदर्भात राष्ट्रीय कार्य शाळा संपन्न झाली. यासाठी देश भरातील विविध महाविद्यालयातील अभ्यासक उपस्थित होते.

डॉ. एन. एस. धर्माधिकारी यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचा द्वितीय वर्ष वाणिज्यचा विद्यार्थी तुषार गोरुले व तृतीय वर्ष वाणिज्यची विद्यार्थिनी निसर्गा धावडे हिने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या राज्यस्तरीय आव्हान शिबिरात अकोला येथे यशस्वीपणे सहभाग नोंदवला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या येरडव येथे झालेल्या विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरात शिवका -लीन ऐतिहासिक पायवाट संरक्षित करण्यात आली. येरडव येथील पायवाट व नैसर्गिक पाणी स्त्रोतांचे पुनर्जीवन करण्यात आले.

पूरग्रस्तांसाठी मदत रॅली काढून ११,०००/- रुपयांचा निधी संकलित करण्यात आला. या बरोबरच  राष्ट्रीय  सेवा-योजना विभागामार्फत वृक्षारोपण, ग्राम स्वच्छता, रस्तासुरक्षा अभियान, नव मतदार नाव नोंदणी व मतदार जनजागृती अभियान असे विविध उपक्रम घेण्यात आले. सांस्कृतिक विभागामार्फत महापुरुषांच्या जयंत्या, पाककृती स्पर्धा,  सांस्कृतिक कार्यक्रम असे विविध उपक्रम घेण्यात आले.

महिला विकास कक्षामार्फत सावित्रीबाई फुले जयंती, महिला दिन, गरीब व गरजू मुलींना मोफत पास सुविधा आदी उपक्रम संपन्न झाले. ग्रंथालय विभागामार्फत बुक रिव्ह्यू, बेस्टरीडर आदी स्पर्धां बरोबरच रंगनाथन जयंती, ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती हे उपक्रम संपन्न  झाले. स्पोर्ट विभागामार्फत क्रीडा स्पर्धा, अँटीरॅगिंग सेलचे प्रबोधनात्मक उपक्रम, स्कॉलरशिप विभागामार्फत विविध स्कॉलरशिपची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी यासाठी प्रयत्न करण्यात आले.

महाविद्यालयाचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत असून यासाठी सदैव झटणारे संस्थेचे  सन्माननीय अध्यक्ष मनोहरजी खापणे साहेब व सर्व संस्था पदाधिकारी, सभासद आणि हितचिंतक बंधूंचे असेच अनमोल सहकार्य यापुढेही लाभू दे. आम्हावरती प्रेम आणि आशीर्वाद असेच अखंड राहू दे.

या अंकाच्या पूर्णत्वासाठी झटणाऱ्या सर्व घटकांचे मनस्वी आभार, मनःपूर्वक धन्यवाद...

**- डॉ. प्रमोद एस. मेश्राम**

प्र. प्राचार्य



# संपादकीय...

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या कोकण भूमीवर ज्ञान, संस्कार आणि सर्जनशीलतेची परंपरा जपणारे श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल–रायपाटण ता. राजापूर, जि. रत्नागिरी ही केवळ शैक्षणिक संस्था नसून विचारांची मशागत करणारे एक सशक्त व्यासपीठ आहे या परंपरेचा अविभाज्य भाग म्हणून प्रकाशित होणारा 'सह्यगिरी' हा वार्षिकांक म्हणजे विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचा, विचारस्वातंत्र्याचा आणि सर्जनशील अभिव्यक्तीचा आरसा आहे. सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षातील 'सह्यगिरी' च्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थी - विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देणे, त्यांची स्वलिखित प्रतिभा समाजासमोर मांडणे, तसेच त्यांच्यातील साहित्यिक, वैचारिक आणि सर्जनशील आत्मविश्वास वाढविणे हाच आमचा मुख्य उद्देश आहे. या वार्षिकांकात विद्यार्थ्यांच्या स्वलिखित कविता, संकलित व प्रेरणादायी कविता, समाज, पर्यावरण, शिक्षण, संस्कृती, विज्ञान, ग्रामीण जीवन, स्त्रीपुरुष समानता, युवकांचे प्रश्न, समकालीन घडामोडी अशा विविध विषयांवरील लेख तसेच वैचारिक चिंतन, अनुभवकथन आणि सर्जनशील लेखन यांना समर्पक स्थान देण्यात आले आहे.

आजच्या बदलत्या काळात विद्यार्थी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता संवेदनशील विचारवंत, जबाबदार नागरिक आणि सर्जनशील व्यक्तिमत्त्व म्हणून घडणे अत्यंत आवश्यक आहे. लेखन, कविता आणि अभिव्यक्तीच्या माध्यमातून स्वतःचे विचार मांडण्याची संधी 'सह्यगिरी' देत आहे. हीच संधी त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा देणारी ठरते. 'सह्यगिरी' हा केवळ वार्षिकांक नाही, तर तो विद्यार्थ्यांच्या मनातील विचारांचा आवाज, त्यांच्या भावनांचा आविष्कार, आणि त्यांच्या कल्पनाशक्तीचा मुक्त आविष्कार आहे.

या 'सह्यगिरी' वार्षिकांकाच्या निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम सर यांचे सहकार्य व वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. त्याच बरोबर अंकासाठी लेखन करणाऱ्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींचे मनःपूर्वक अभिनंदन. तसेच त्यांना सातत्याने प्रोत्साहन देणारे प्राध्यापक, मार्गदर्शक आणि संपादक मंडळ यांचेही आभार. भविष्यातही 'सह्यगिरी' अधिकाधिक समृद्ध होत जाईल आणि विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा दीपस्तंभ म्हणून तेजस्वीपणे उभा राहील, हीच अपेक्षा.

- डॉ. बी. टी. दाभाडे
संपादक

सह्याद्रि परीसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल

संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

पाचल-रायपाटण, मु.पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४

## ◈ महाविद्यालयाची वैशिष्ट्ये ◈

- २(एफ) व १२(बी) खाली युजीसीची मान्यता.
- मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्नता.
- नॅक पुनर्मूल्यांकन 'बी' श्रेणी.
- आय.एस.ओ. ९००१:२०१५ प्रमाणित.
- निसर्गाच्या सानिध्यात प्रशस्त इमारत.
- अध्ययन, अध्यापनास सुयोग्य इमारत.
- राष्ट्रिय सेवा योजना, सांस्कृतिक, क्रीडा विषयक विविध उपक्रम.
- प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रांचे आयोजन.
- महिला विकास कक्षातर्फे विद्यार्थ्यींनीसाठी विविध उपक्रम.
- विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण विकासासाठी विशेष उपक्रम.
- विद्यार्थ्यांच्या सर्व गुणांच्या संवर्धनासाठी संवाद वार्तापत्र.
- 'स्पंदन' अर्धवार्षिक अंकाचे प्रकाशन, 'मायबोली', 'दर्पण' भित्तिपत्रिका प्रकाशन.
- शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, इ. मध्ये नेत्रदीपक कामगिरी.
- स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन.
- राज्य व राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये प्राध्यापकांचा सहभाग.
- प्राध्यापकांचे संशोधनपर लेख आय.एस.एस.एन./ आय.एस.बी.एन. पुस्तकामध्ये मध्ये प्रकाशित.
- भव्य क्रीडांगण, विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन.
- महाविद्यालयाच्या शेजारीच समाजकल्याण विभागाचे शासकीय १०० मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतीगृह आहे.
- विद्यार्थ्यांच्या साहित्यिक कलागुणांच्या संवर्धानासाठी 'सह्यगिरी' वार्षिक अंकाचे प्रकाशन केले जाते.

❖ सह्याद्रि परीसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल

संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

पाचल-रायपाटण, मु.पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४

## ◈ महाविद्यालयातील ग्रंथालयाची वैशिष्ट्ये ◈

- ❖ सुसज्ज ग्रंथालय सुविधा.
- ❖ सुसज्ज वाचन कक्ष.
- ❖ संगणकीकृत ग्रंथालय व संगणक सुविधा.
- ❖ वायफाय सुविधा.
- ❖ दुर्मिळ संदर्भ ग्रंथांची उपलब्धता.
- ❖ वाचन संस्कृती वाढविण्यासाठी गोल्ड कार्ड स्कीम.
- ❖ बेस्ट रीडर अवॉर्ड.
- ❖ बी.सी.बुक-बँक स्कीम.
- ❖ निबंध स्पर्धांचे आयोजन.
- ❖ ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. रंगनाथन जयंती कार्यक्रम.
- ❖ २४ मासिके, ९०९६ ग्रंथ उपलब्ध.
- ❖ आय.सी.एस.एस.आर.बुक कॉर्नर.
- ❖ सिद्धीविनायक ट्रस्ट बुक बँक.



सह्याद्रि परीसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल

संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

**पाचल-रायपाटण, मु.पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४**

## ◈ संचालक मंडळ ◈

- ❖ मा. श्री. मनोहर हरी खापणे ............................................................. अध्यक्ष
- ❖ मा. श्री. शंकरराव गंगाराम चव्हाण.................................................... उपाध्यक्ष
- ❖ मा. श्री. नरेश बापू पाचलकर............................................................ सरचिटणीस
- ❖ मा. श्री. प्रदीप चंद्रकांत खापणे ......................................................... खजिनदार
- ❖ मा. श्री. संजय कृष्णाजी जोशी........................................................... सहचिटणीस
- ❖ मा. श्री. विजय भास्कर सावंत............................................................ सदस्य
- ❖ मा. श्री. चंद्रकांत आत्माराम लिंगायत .................................................. सदस्य
- ❖ मा. श्री. अशोक रघुनाथ सक्रे............................................................. सदस्य
- ❖ मा. श्री. सिद्धार्थ सखाराम जाधव ....................................................... सदस्य

## ◈ महाविद्यालयातील विकास समिती ◈

- ❖ मा. मनोहर हरी खापणे ................................................................... अध्यक्ष
- ❖ मा. नरेश बापू पाचलकर.................................................................. सदस्य
- ❖ मा. प्रदिप चंद्रकांत खापणे................................................................ सदस्य
- ❖ मा. खुशिराम शिवाजी मोरे............................................................... सदस्य
- ❖ मा. मनोज भिकू गांगण.................................................................... सदस्य
- ❖ मा. महादेव बाळकृष्ण रोडे ............................................................... सदस्य
- ❖ सहा. प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील ................................................. सदस्य
- ❖ सहा. प्रा. नंदकुमार गोविंद देवन ....................................................... सदस्य
- ❖ सह. प्रा. डॉ. विकास शंकर पाटील ..................................................... सदस्य
- ❖ सहा. प्रा. संजय वसंत निंबाळकर ...................................................... सदस्य
- ❖ सहा. प्रा. सुभाष सिताराम धोंगडे....................................................... सदस्य
- ❖ श्री. राजेश अंबाजी चव्हाण .............................................................. सदस्य
- ❖ साहिल सत्यवान नार्वेकर ................................................................. सदस्य
- ❖ डॉ. प्रमोद शिवचरण मेश्राम ............................................................ प्र. प्राचार्य व सचिव

सह्याद्रि परीसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल

संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

पाचल-रायपाटण, मु.पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४

## ◈ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद ◈

- प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम - एम्.ए., नेट, पीएच्.डी. (इतिहास)
- सह. प्रा. डॉ. व्ही. एस्. पाटील - एम.ए., बी.एड., नेट, पीएच्.डी. (मराठी)
- सहा. प्रा. डॉ. ए. डी. पाटील - एम.ए., पीएच्.डी. (इतिहास)
- सहा. प्रा. डॉ. बी. टि. दाभाडे - एम.ए., पीएच्.डी. (मराठी)
- सहा. प्रा. एस. व्ही. निंबाळकर - एम.ए., एम.एड., एम. फिल. (हिंदी)
- सहा. प्रा. एस्. एस्. धोंगडे - एम.ए. (हिंदी)
- सहा. प्रा. एन. जी. देवन - एम.ए. (इंग्रजी)
- डॉ. एम. आर. कोंडागुर्ले (ग्रंथपाल) - बी.ए., एम.लिब., नेट, सेट, पीएच.डी.
- सहा. प्रा. पी. पी. राठोड - एम.ए., सेट (अर्थशास्त्र)
- सहा. प्रा. कु. एस. जी. चव्हाण - एम्. कॉम., (कॉमर्स)
- सहा. प्रा. पी. के. कांबळे - एम. कॉम. (अकौन्टन्सी), बी.एड.

## ◈ महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी वृंद ◈

- श्री. राजेश अंबाजी चव्हाण - वरीष्ठ लिपीक
- श्री. संदिप लक्ष्मण सक्रे - कनिष्ठ लिपीक
- सौ. स्नेहा विलास कोलते - ग्रंथालय परिचर
- श्री. संतोष महादेव पालकर - शिपाई
- श्री. मधुकर भिकाजी साटम - शिपाई
- श्री. भगवान तुकाराम जाधव - शिपाई
- श्री. गुलाब हरी मदगे - शिपाई

सह्याद्रि परीसर शिक्षण प्रसारक मंडळ, पाचल

संचलित

# श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल

**पाचल-रायपाटण, मु.पो.रायपाटण, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, ४१६७०४**

## --- व्हिजन ---

विद्यार्थी वर्गाला आणि समाजाला शिक्षणाच्या क्षेत्रात आणि त्याच्या विकासासाठी
मोठ्या प्रमाणात उच्च दर्जाची सेवा देण्याची जबाबदारी व विशेषाधिकार आहे,
हाच महाविद्यालयाचा दृष्टिकोन आहे.

## --- मिशन --

दुर्गम व मागास भागातील तरूणांच्या सुप्त गुणांचा व बुध्दिमत्तेचा विकास करून
त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी उच्च शिक्षणाद्वारे कोकणचा पर्यायाने
राष्ट्राचा विकास करण्यासाठी चालना देणे.

# ◈ मराठी विभाग ◈

# अंतरंग


| अ.क्र. | लेख / कवितेचे नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | कोकणची संस्कृती – कालची व आजची | राजरत्न व्हावळे | ०७ |
| २ | भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य आणि ज्ञानपीठ पुरस्कार | सज्ञानी घागरे | ०९ |
| ३ | कोकणची खाद्यसंस्कृती | पल्लवी आयरे | ११ |
| ४ | बंधने स्त्रियांवरच का ? | प्रणव शेलार | १३ |
| ५ | स्पर्धा परीक्षा आणि मानसिक व्यवस्थापन | मैथिली चव्हाण | १५ |
| ६ | ग्रंथ हेच गुरु | प्राची तांबे | १७ |
| ७ | डिजिटल युगातील ग्रंथालयांची बदलती भूमिका | पायल जाधव | १९ |
| ८ | बहिणाबाईंची काव्यप्रतिमा | नेत्रा बावकर | २१ |
| ९ | आजची देशसेवा | निसर्गा धावडे | २४ |
| १० | उठ रे मनाच्या वाटेवर | सारिका गुरव | २५ |
| ११ | आजचा दिवस आपलाच आहे | प्रणिता कदम | २६ |
| १२ | पुस्तक | निसर्गा धावडे | २७ |
| १३ | माझी ही प्रीत वेडी | राजरत्न व्हावळे | २८ |
| १४ | पैसा | सहा. प्रा. स्नेहल चव्हाण | ३० |
| १५ | प्रिये तुझ्यासाठी... | श्री. संदिप सक्रे | ३१ |

# ◈ कोकणची संस्कृती : कालची व आजची ◈

- राजरत्न व्हावळे
एफ.वाय.बी.ए.(मराठी)

कोकण हा महाराष्ट्राचा एक अत्यंत सुंदर, निसर्गसंपन्न आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असा प्रदेश आहे. अरबी समुद्राची किनारपट्टी, सह्याद्रीच्या पर्वतरांगा, हिरवीगार भातशेती, नारळी-पोफळीच्या बागा आणि गोड माणसं यामुळे कोकणची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. कोकण म्हणजे केवळ भौगोलिक प्रदेश नाही, तर तो एक जीवनपद्धतीचा अनुभव आहे. येथील संस्कृती ही परंपरेवर आधारित असली तरी ती काळानुसार बदलत गेली आहे. म्हणूनच कोकणची संस्कृती कालची आणि आजची यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.पूर्वीच्या काळात कोकणचे जीवन पूर्णपणे निसर्गावर आधारित होते. भातशेती, मासेमारी, नारळी-सुपारीची शेती आणि फळबागांवर लोकांचा उदरनिर्वाह चालत असे. लोक कष्टाळू, समाधानी आणि एकमेकांवर अवलंबून होते. कौलारू घरे, मातीच्या भिंती, लाकडी दरवाजे, अंगणात तुळस हे घराचे सामान्य चित्र होते. जीवन साधं होतं, पण त्यात समाधान, शांती आणि स्थैर्य होतं.कोकणात सण-उत्सवांना विशेष महत्त्व होते. गणेशोत्सव हा कोकणचा आत्मा मानला जातो. घराघरांत गणपती बसवला जात असे, शेजारी-पाजारी मिळून आरती, भजन, कीर्तन करत. शिमगा (होळी), नारळी पौर्णिमा, दिवाळी, जत्रा, ग्रामदेवतेचे उत्सव हे समाजाला एकत्र बांधणारे घटक होते. या सणांमधून धार्मिक श्रद्धा, सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक मूल्ये व्यक्त होत.लोककला ही कोकणच्या संस्कृतीचा महत्त्वाचा भाग होती. दशावतार, नमन, भारूड, गोंधळ, जाखडी नृत्य अशा लोककलांमधून पौराणिक कथा, सामाजिक संदेश आणि मनोरंजन यांचा सुंदर संगम होत असे. गावोगावी कलाकारांचे पथक येत आणि संपूर्ण गाव एकत्र येऊन ते पाहत असे. ही कला केवळ करमणूक नव्हती, तर ती शिक्षणाचेही माध्यम होती. कोकणची खाद्यसंस्कृती ही साधी, नैसर्गिक आणि ऋतूनुसार बदलणारी होती. भात, नाचणी, भाकरी, भाजी, कोकमाची आमटी, सोलकढी, मासळीचे विविध पदार्थ, उकडीचे मोदक, घावन, घरी बनवलेली लोणची हे सर्व घरगुती आणि आरोग्यदायी होते. पदार्थांमध्ये चव होतीच, पण त्यामागे निसर्गाशी जोडलेपणही होते.

आजच्या काळात कोकणची संस्कृती बदलत्या जीवनशैलीमुळे वेगळ्या रूपात दिसते. शिक्षण, शहरीकरण, पर्यटन, औद्योगिकीकरण आणि तंत्रज्ञान यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर जाणवतो. अनेक तरुण शिक्षण व नोकरीसाठी शहरांकडे जात आहेत. त्यामुळे पारंपरिक शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. कौलारू घरांच्या जागी सिमेंटची पक्की घरे, अपार्टमेंट्स उभे राहिले आहेत.सण-उत्सव आजही साजरे होतात, पण त्यांचे स्वरूप बदलले आहे. गणेशोत्सव आता अधिक भव्य, रोषणाई, डीजे आणि सोशल मीडियावर पोस्ट्स यांच्या माध्यमातून साजरा होतो. आधी लोक प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देत, आता मोबाईलवरून संदेश पाठवले जातात. यामुळे वेळ वाचतो, पण मानवी स्पर्श कमी होतो.लोककला आज अस्तित्वासाठी झगडताना दिसते. टीव्ही, इंटरनेट आणि ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे पारंपरिक करमणुकीचे स्थान बदलले आहे. तरीही काही संस्था, कलाकार आणि महोत्सव लोककला जपण्यासाठी प्रयत्नशील

आहेत. शाळा-महाविद्यालयांतून लोककलेचे कार्यक्रम घेतले जात आहेत, ही सकारात्मक बाब आहे.खाद्यसंस्कृतीतही बदल झाले आहेत. पारंपरिक जेवणाबरोबर फास्ट फूड, पॅकेज्ड अन्न, बाहेरचे पदार्थ आले आहेत. तरीही कोकणी जेवणाची चव आणि ओळख अजूनही लोकांच्या मनात टिकून आहे. सणासुदीला उकडीचे मोदक, दिवाळीत फराळ, लग्नसमारंभात पारंपरिक पदार्थ यांचे महत्त्व अजूनही आहे.वेशभूषा, भाषा आणि आचार-विचार यातही बदल झाले आहेत. तरुण पिढी आधुनिक कपडे घालते, इंग्रजी-मिश्रित भाषा वापरते. पण त्याच वेळी सणावाराला पारंपरिक पोशाख परिधान करते आणि आपल्या मुळांशी जोडलेली राहते.म्हणूनच कोकणची संस्कृती ही परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम आहे. बदल अपरिहार्य आहेत, पण मुळ विसरता कामा नयेत. लोककला, स्थानिक भाषा, पर्यावरण, सण आणि सामाजिक मूल्ये जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

कोकणची संस्कृती काल साधी, निसर्गाशी जवळची आणि परंपरेवर आधारित होती; आज ती आधुनिक, गतिमान आणि जागतिक संपर्कात आलेली आहे. तरीही तिचा आत्मा साधेपणा, आपुलकी, निसर्गप्रेम आणि सांस्कृतिक समृद्धी अजूनही जिवंत आहे. हीच कोकणची खरी ओळख आहे आणि ती जपणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.



# ◈ भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य आणि ज्ञानपीठ पुरस्कार ◈

- सज्ञानी घागरे

तुतीय वर्ष, कला ( मराठी विभाग )

मराठी साहित्यात आधुनिक काळात जे थोडेसे साहित्यिक आपल्या स्वतंत्र विचारसरणीमुळे, वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैलीमुळे आणि समाजाभिमुख दृष्टिकोनामुळे वेगळे ठरतात, त्यामध्ये भालचंद्र नेमाडे यांचे नाव अग्रभागी घेतले जाते. ते केवळ कादंबरीकार नाहीत, तर ते एक विचारवंत, समीक्षक, सांस्कृतिक भाष्यकार आणि आत्मशोध घेणारे लेखक आहेत. त्यांच्या साहित्यातून ग्रामीण जीवन, मध्यमवर्गीय मानसिकता, अस्मिता, परंपरा आणि आधुनिकतेतील संघर्ष यांचे सूक्ष्म दर्शन घडते. त्यांच्या या महत्त्वपूर्ण योगदानासाठी त्यांना सन २०१४ साली भारतीय साहित्यातील सर्वोच्च सन्मान असलेला 'ज्ञानपीठ पुरस्कार' प्रदान करण्यात आला. भालचंद्र नेमाडे यांचा जन्म १९३८ साली महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात झाला. ग्रामीण परिसरात वाढल्यामुळे त्यांच्या लेखनावर ग्रामीण जीवनाचा खोल प्रभाव दिसून येतो. त्यांनी मराठी भाषा, संस्कृती आणि अस्मिता यांचा सातत्याने आग्रह धरला. "देशीवाद" ही संकल्पना मांडून त्यांनी भारतीय भाषांतील साहित्याने आपल्या मातीतून, आपल्या अनुभवातून उगम पावावे असा विचार मांडला.त्यांचे सर्वात प्रसिद्ध साहित्य म्हणजे कोसला, बिढार, जारिला, आणि हिंदू या चार कादंबऱ्यांचा समावेश असलेली कादंबरीमाला. ही मालिका एका तरुणाच्या जीवनप्रवासाच्या माध्यमातून समाजातील विसंगती, आत्मसंघर्ष, बौद्धिक गोंधळ आणि अस्तित्वाचा प्रश्न मांडते. 'कोसला' ही कादंबरी विशेषतः तरुण पिढीच्या मनोविश्वाचे प्रभावी चित्रण करते. ग्रामीण भागातून शहरात आलेल्या तरुणाची मानसिक घुसमट, आत्मशोध आणि अस्मितेचा संघर्ष या कादंबरीत अतिशय प्रभावीपणे मांडला आहे. नेमाडे यांच्या लेखनाची भाषा ही सहज, बोलीप्रधान, पण तत्त्वज्ञानात्मक खोली असलेली आहे. ते सजावट टाळून वास्तव थेट मांडतात. त्यांच्या लेखनात अलंकारिकपणा नसून स्पष्टपणा आहे. त्यामुळे त्यांचे साहित्य वाचकाला विचार करायला भाग पाडते, केवळ मनोरंजन करत नाही. कादंबऱ्यांव्यतिरिक्त नेमाडे यांनी साहित्यसमीक्षा, निबंध, लेख आणि वैचारिक लेखनही केले आहे. त्यांनी मराठी साहित्याला आत्मपरीक्षणाची दिशा दिली. त्यांनी पाश्चात्त्य साहित्याच्या अंधानुकरणावर टीका केली आणि भारतीय साहित्याने आपली स्वतंत्र वाट शोधावी असा आग्रह धरला.त्यांचा "देशीवाद" हा विचार मराठी साहित्याला नव्या दिशेने घेऊन गेला. जागतिकीकरणाच्या काळात स्थानिक अनुभवांचे महत्त्व अधोरेखित करणारा हा विचार आजही अत्यंत सुसंगत आहे. त्यामुळे नेमाडे हे केवळ साहित्यिक नाहीत, तर सांस्कृतिक विचारवंत म्हणूनही ओळखले जातात. 'ज्ञानपीठ पुरस्कार' हा भारतीय साहित्यातील सर्वोच्च सन्मान मानला जातो. तो साहित्यिकाच्या संपूर्ण साहित्यिक योगदानासाठी दिला जातो. २०१४ साली नेमाडे यांना हा पुरस्कार जाहीर झाला तेव्हा तो केवळ एका लेखकाचा सन्मान नव्हता, तर मराठी ग्रामीण वास्तव, मातृभाषा आणि स्वदेशी विचारधारेचा सन्मान होता.

नेमाडे यांच्या साहित्याचे महत्त्व आजही वाढत आहे. बदलत्या समाजात माणसाची अस्मिता, मूल्यसंघर्ष, भाषेचे स्थान आणि संस्कृतीचे भान यासारखे प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित न राहता सार्वकालिक ठरते.त्यांच्या लेखनातील नायक हे परिपूर्ण नसतात; ते प्रश्न विचारतात, चुकतात, संभ्रमात राहतात आणि त्यामुळे ते अधिक मानवी

वाटतात. हा मानवीपणा हेच त्यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य आहे.नेमाडे यांनी साहित्याला करमणूक म्हणून न पाहता ते वैचारिक परिवर्तनाचे साधन मानले. त्यांनी वाचकाला प्रश्न विचारायला शिकवले आपली ओळख काय? आपली भाषा कोणती? आपली संस्कृती कोणती? हे प्रश्न आजही महत्त्वाचे आहेत.

भालचंद्र नेमाडे हे मराठी साहित्यातील एक असामान्य व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी लेखनाला केवळ करिअर मानले नाही, तर ते एक बौद्धिक आणि सांस्कृतिक जबाबदारी मानली. त्यांच्या साहित्यातून समाजाला आरसा दाखवण्याचे कार्य झाले. ज्ञानपीठ पुरस्कार हा त्यांच्या लेखनाचा सन्मान असला तरी त्याहून मोठा सन्मान म्हणजे त्यांचे साहित्य आजही विचारप्रवर्तक ठरत आहे. म्हणूनच नेमाडे यांचे साहित्य हे मराठी भाषेचे वैचारिक वैभव मानले जाते.




**ज्ञानपीठ पुरस्कार विजेते भालचंद्र नेमाडे**

# ◈ कोकणची खाद्य संस्कृती ◈

- पल्लवी आयरे
तृतीय वर्ष, कला (मराठी विभाग)

कोकण म्हणजे निसर्गाने उदारपणे दिलेल्या संपत्तीचा प्रदेश समुद्रकिनारा, हिरवीगार भातशेती, नारळी-सुपारीची झाडे, आंबा-फणसांच्या बागा आणि मासळीने समृद्ध असलेला सागर. या निसर्गदत्त वातावरणातूनच कोकणची खाद्यसंस्कृती घडलेली आहे. येथील जेवण केवळ भूक भागवणारे नसून ते ऋतूंशी, आरोग्याशी, संस्कृतीशी आणि जीवनशैलीशी घट्ट जोडलेले आहे. साधेपणा, चव, ताजेपणा आणि पौष्टिकता हे कोकणी खाद्यसंस्कृतीचे वैशिष्ट्य आहे.कोकणच्या खाद्यसंस्कृतीची मुळे ग्रामीण जीवनात खोलवर रुजलेली आहेत. पूर्वी लोक स्वतः पिकवलेले धान्य, भाज्या, फळे आणि मासे वापरत. त्यामुळे जेवण शुद्ध, नैसर्गिक आणि आरोग्यदायी असे. भात हे मुख्य अन्न, त्यासोबत आमटी, भाजी, उसळ, भाकरी, पिठले, चटणी, लोणचं - असा साधा पण पौष्टिक आहार असे. मसाले मर्यादित पण योग्य प्रमाणात वापरले जात.

कोकणातील पदार्थांची खास ओळख म्हणजेकोकम, आमसुल, नारळ, हिरवी मिरची, कढीपत्ताआणिमसाल्यांची सौम्य फोडणी. कोकमामुळे आंबटपणा आणि थंडावा मिळतो, जो उष्ण हवामानात आरोग्यास उपयुक्त ठरतो. नारळाचा वापर ओले खोबरे, वाटण, दूध किंवा तेल अशा विविध स्वरूपात होतो.मासळी ही कोकणची खास ओळख आहे. सुरमई, पापलेट, बांगडा, कोळंबी, तिसऱ्या, खेकडे अशा विविध प्रकारच्या मासळीपासून भाजी, कालवण, तळण, सुकट तयार केले जाते. मासळीचा वापर ऋतूनुसार बदलतो आणि ताजी मासळी वापरण्यावर भर असतो. त्यामुळे चव आणि आरोग्य दोन्ही जपले जाते.कोकणात सणावारांनुसार खास पदार्थ केले जातात. गणेशोत्सवात उकडीचे मोदक, नारळी भात; होळीत पुरणपोळी किंवा घावन; दिवाळीत चकल्या, लाडू, करंजी; लग्नसमारंभात खास गोड पदार्थ केले जातात. हे पदार्थ केवळ चवीसाठी नसून त्यामागे धार्मिक आणि सामाजिक भावना दडलेली असते.कोकणच्या गोड पदार्थांमध्ये नारळ, तांदूळ, गूळ यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. उकडीचे मोदक, घावन, तांदळाच्या पिठाचे लाडू, नारळाची वडी, शिरा हे सर्व पारंपरिक आणि पौष्टिक असतात.भाजीपाला देखील स्थानिक आणि ऋतुनुसार असतो वाल, पावटा, तोंडली, दोडका, काकडी, भेंडी, कोहळा, फणसाची भाजी, आंब्याची कढी, कैरीची चटणी इत्यादी. यामुळे शरीराला आवश्यक पोषण मिळते.आजच्या काळात कोकणची खाद्यसंस्कृती बदलत आहे. शहरीकरण, पर्यटन आणि बाह्य संस्कृतींच्या प्रभावामुळे फास्ट फूड, बाहेरचे पदार्थ, पॅकेज्ड अन्न यांचा वापर वाढत आहे. तरीसुद्धा कोकणी जेवणाची ओळख टिकून आहे. पर्यटनामुळे कोकणी पदार्थांची ओळख इतर राज्यांत व देशांत पोहोचत आहे हे सकारात्मक आहे.आज अनेक हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि होमस्टे पारंपरिक कोकणी पदार्थ पर्यटकांना देतात. त्यामुळे खाद्यसंस्कृतीचा प्रचार होत आहे. सोशल मीडियावरून रेसिपी शेअर होतात, यूट्यूबवर कोकणी स्वयंपाक शिकवला जातो ही आधुनिकतेची चांगली बाजू आहे.तरीही काही धोके आहेत. झपाट्याने वाढणारे फास्ट फूड आरोग्यावर परिणाम करत आहे. पारंपरिक पद्धतीने बनवलेले घरगुती अन्न कमी होत चालले आहे. त्यामुळे पोषणमूल्य कमी होण्याची शक्यता आहे.म्हणूनच परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल राखणे

गरजेचे आहे. पारंपरिक पदार्थ जपणे, स्थानिक धान्य वापरणे, ऋतुनुसार अन्न घेणे ही सवय टिकवणे आवश्यक आहे.

कोकणची खाद्यसंस्कृती ही केवळ जेवण नसून ती एक जीवनदृष्टी आहे. निसर्गाशी सुसंगत, आरोग्यदायी, साधी आणि स्वादिष्ट अशी ही परंपरा आजही आपल्याला मार्गदर्शन ठरते. आधुनिकतेच्या युगातही ही संस्कृती जपली तरच कोकणची खरी ओळख टिकून राहील.



कोकणची खाद्य संस्कृती

# ◈ बंधने स्त्रियांवरच का?◈

- प्रणव शेलार

प्रथम वर्ष, कला

डॉ. बाबसाहेब समाज हा नियम, परंपरा आणि मूल्यांच्या चौकटीत उभा असतो. या चौकटी समाजाला दिशा देतात, शिस्त लावतात; पण अनेकदा याच चौकटी काही घटकांवर अन्यायकारक बंधने घालतात. इतिहास पाहिला तर बहुतेक समाजरचनांमध्ये स्त्रियांवरच अधिक बंधने लादलेली दिसतात वागण्यात, कपड्यांत, शिक्षणात, कामात, विवाहात, मातृत्वात आणि अगदी स्वातंत्र्यातही. मग प्रश्न उभा राहतो “बंधने स्त्रियांवरच का?”या प्रश्नाचे उत्तर केवळ स्त्रियांत नाही, तर समाजाच्या पितृसत्ताक रचनेत आहे. पितृसत्ताक म्हणजे असा समाज जिथे सत्ता, निर्णय आणि नियंत्रण मुख्यतः पुरुषांकडे असते. या रचनेत स्त्रीला दुय्यम स्थान दिले गेले आणि तिची ओळख ‘मुलगी, बायको, आई’ या नात्यांपुरती मर्यादित ठेवली गेली. त्यामुळे तिचे स्वातंत्र्य कायम इतरांच्या अपेक्षांमध्ये अडकले.

लहानपणापासूनच मुलगा आणि मुलगी यांना वेगवेगळ्या अपेक्षांच्या चौकटीत वाढवले जाते. मुलीला "हे करू नकोस", "असं वागू नकोस", "बाहेर जाऊ नकोस", "उशिरा येऊ नकोस" असे सांगितले जाते, तर मुलाला मोकळीक दिली जाते. त्यामुळे मुलीच्या मनात भीती, अपराध भावना आणि मर्यादा रुजवल्या जातात, तर मुलाच्या मनात स्वातंत्र्याची सवय लागते. ही मानसिक घडणच पुढे असमानतेला खतपाणी घालते.स्त्रियांवरच्या बंधनांचा मोठा भाग ‘सन्मान’ आणि ‘इज्जत’ या संकल्पनांशी जोडलेला आहे.

समाजात स्त्रीच्या वर्तनावरून संपूर्ण कुटुंबाची प्रतिष्ठा मोजली जाते. त्यामुळे स्त्रीच्या प्रत्येक कृतीवर पहारा ठेवला जातो. पुरुषांच्या चुकीला वैयक्तिक चूक मानले जाते, तर स्त्रीच्या चुकीला सामाजिक अपमान मानले जाते ही दुहेरी भूमिका अन्यायकारक आहे.शिक्षण, करिअर आणि आर्थिक स्वावलंबन हे स्त्रीसाठी स्वातंत्र्याचे मार्ग आहेत; पण याच गोष्टींवरही अनेकदा बंधने येतात. "इतकं शिकून काय करणार?", "नोकरी केली तर घर कोण सांभाळणार?" असे प्रश्न आजही विचारले जातात. त्यामुळे स्त्रीला निवडीचा अधिकार असूनही तो वापरण्याचे स्वातंत्र्य नसते.विवाह आणि मातृत्व या क्षेत्रांत स्त्रीवर विशेष बंधने असतात. लग्नाची वेळ, जोडीदाराची निवड, मुलांची संख्या या सगळ्या गोष्टींवर समाजाचा दबाव असतो. स्त्रीचे शरीर आणि तिचे निर्णय तिचेच असावेत, ही कल्पना अजूनही अनेकांना मान्य नाही.माध्यमे, चित्रपट, जाहिरातीही अनेकदा स्त्रीला एका ठराविक साच्यात दाखवतात त्यागी, सहनशील, सौम्य, समर्पित. ही प्रतिमा सुंदर असली तरी ती अपूर्ण आहे. स्त्री ही रागावणारी, निर्णय घेणारी, महत्त्वाकांक्षी, स्वतंत्र व्यक्तीही आहे ही बाजू दुर्लक्षित होते.मात्र चित्र पूर्णपणे निराशाजनक नाही. शिक्षण, चळवळी, कायदे आणि स्त्रियांच्या संघर्षामुळे परिस्थिती बदलत आहे. स्त्रिया आज प्रत्येक क्षेत्रात पुढे येत आहेत . शिक्षण, विज्ञान, क्रीडा, राजकारण, संरक्षण, उद्योग या सगळ्या ठिकाणी त्यांचे योगदान दिसते. त्यांनी बंधनांना आव्हान दिले आहे.तरीही प्रश्न उरतोच बदलाचा वेग पुरेसा आहे का? अजूनही अनेक स्त्रिया हिंसा, भेदभाव, संधीअभावी अडकलेल्या आहेत. त्यामुळे केवळ कायदे नव्हे, तर

मानसिकता बदलणे आवश्यक आहे. पुरुषांनीही या बदलाचा भाग व्हायला हवे. स्त्रीस्वातंत्र्य म्हणजे पुरुषविरोध नव्हे, तर समानतेचा मार्ग आहे.

बंधने स्त्रियांवरच असण्याचे कारण समाजरचनेतील असमानता आहे. ती निसर्गनिर्मित नाही, तर मानवनिर्मित आहे आणि म्हणूनच ती बदलता येण्यासारखी आहे. स्त्री ही बंधनांची वस्तू नाही, तर स्वतंत्र अस्तित्व आहे. जेव्हा समाज हे स्वीकारेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने समानता येईल.



# ◈ स्पर्धा परीक्षा आणि मानसिक व्यवस्थापन ◈

- मैथिली चव्हाण
द्वितीय वर्ष, वाणिज्य

आजचा विद्यार्थी आणि तरुण वर्ग अभूतपूर्व स्पर्धात्मक वातावरणात जगतो आहे. शिक्षण, रोजगार, सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक सुरक्षितता या सगळ्यांचा केंद्रबिंदू आता स्पर्धा परीक्षा बनल्या आहेत. U.P.S.C., M.P.S.C., N.E.T., S.E.T., S.S.C., बँकिंग, J.E.E., N.E.E.T., C.E.T. अशा असंख्य परीक्षांमध्ये लाखो उमेदवार बसतात आणि निवड काही हजारांचीच होते. हा असमतोलच विद्यार्थ्यांच्या मनावर तणाव निर्माण करतो. या पार्श्वभूमीवर मानसिक व्यवस्थापन हे यशाचे केवळ पूरक नव्हे, तर मुख्य घटक ठरते.स्पर्धा परीक्षा ही फक्त ज्ञानाची परीक्षा नसून ती सहनशक्तीची, संयमाची, आत्मविश्वासाची आणि मानसिक स्थैर्याची परीक्षा असते. अनेकदा आपण पाहतो की अत्यंत हुशार विद्यार्थीही अपयशी ठरतात, तर सरासरी बुद्धिमत्तेचे विद्यार्थी यशस्वी होतात. कारण फरक बुद्धीचा नसून मनाच्या स्थैर्याचा असतो.मानसिक तणावाची अनेक कारणे असतात. सततची तुलना - मित्रांशी, टॉपर्सशी, सोशल मीडियावरील यशस्वी लोकांशी - विद्यार्थ्याला सतत कमी असल्याची भावना देते. पालकांच्या अपेक्षा, समाजाची नजर, आर्थिक अडचणी, वय वाढत चालल्याची जाणीव, आणि “यंदा नाही झाले तर काय?” ही भीती मन पोखरते.या तणावाचे परिणाम शरीरावर आणि मनावर दोन्हीवर होतात. झोप लागत नाही, भूक लागत नाही, अभ्यासात लक्ष लागत नाही, विस्मरण वाढते, चिडचिड वाढते, आत्मविश्वास कमी होतो, आणि कधी कधी नैराश्यही येते. त्यामुळे मानसिक व्यवस्थापन ही लक्झरी नसून अत्यावश्यक गरज आहे.मानसिक व्यवस्थापन म्हणजे भावना दडपणे नाही. उलट भावना ओळखणे, स्वीकारणे आणि योग्य प्रकारे हाताळणे होय. “मला भीती वाटते”, “मला तणाव आहे”, “मला थकवा जाणवतो” हे स्वतःला मान्य करणे हीच पहिली पायरी आहे.स्वतःची तुलना इतरांशी न करता स्वतःच्या प्रगतीशी करणे अत्यंत आवश्यक आहे. आज मी कालपेक्षा थोडा चांगला आहे का, एवढाच प्रश्न स्वतःला विचारावा.नियमित दिनचर्या ही मानसिक स्थैर्याची गुरुकिल्ली आहे. उठण्याची वेळ, अभ्यासाची वेळ, विश्रांतीची वेळ, झोपेची वेळ ठरलेली असेल तर मनाला सुरक्षिततेची भावना मिळते.शारीरिक हालचाल तणाव कमी करते. चालणे, धावणे, योग, खेळ, प्राणायाम - यामुळे शरीरातून तणावाचे हार्मोन्स कमी होतात आणि आनंदाचे हार्मोन्स वाढतात.

ध्यान ही मनाची स्वच्छता आहे. रोज १०-१५ मिनिटे शांत बसून श्वासावर लक्ष केंद्रित केल्यास मन स्थिर होते. अभ्यासाचे नियोजन वास्तववादी असावे. अवास्तव वेळापत्रक अपयशाची भावना वाढवते. कमी पण सातत्यपूर्ण अभ्यास अधिक परिणामकारक असतो.अपयशाला शत्रू न मानता शिक्षक मानणे ही मोठी मानसिक परिपक्वता आहे. प्रत्येक अपयश आपल्याला कुठे सुधारणा हवी ते दाखवते.समर्थन प्रणाली महत्त्वाची असते. मित्रांशी, पालकांशी, शिक्षकांशी संवाद साधणे मन हलके करते.डिजिटल डिटॉक्स आवश्यक आहे. ठरावीक वेळ मोबाईल बंद

ठेवणे मनाला विश्रांती देते.डायरी लिहिणे, स्वतःशी संवाद साधणे, भावना व्यक्त करणे हे मानसिक स्वच्छतेचे साधन आहे.आध्यात्मिकता, निसर्ग, सेवा, संगीत, चित्रकला प्रत्येकाला शांती देणारी गोष्ट वेगळी असते. ती शोधणे आवश्यक आहे. निष्कर्षतः स्पर्धा परीक्षा ही बुद्धीची लढाई असली तरी ती मनाच्या स्थैर्याची खरी कसोटी आहे. जो आपले मन सांभाळतो, तोच खऱ्या अर्थाने यश सांभाळू शकतो. त्यामुळे अभ्यासाइतकेच मनाचे व्यवस्थापन शिका कारण शेवटी यश हे मनात जिंकले जाते..



# ग्रंथ हेच गुरू

- प्राची तांबे
तृतीय वर्ष, कला (मराठी विभाग)

मानवजातीच्या इतिहासात अनेक गुरू झाले, अनेक मार्गदर्शक झाले; परंतु काळाच्या कसोटीवर जे टिकून राहिले, जे पिढ्यान्‌पिढ्या माणसाला घडवत राहिले, ते म्हणजे ग्रंथ. गुरू माणसाला वाट दाखवतो, जीवनाला दिशा देतो आणि विचारांना उंची देतो. हाच गुण ग्रंथातही असतो. म्हणूनच "ग्रंथ हेच गुरू" ही केवळ सुंदर उक्ती नसून एक गहन सत्य आहे. ग्रंथ मानवाच्या बौद्धिक, नैतिक आणि आत्मिक विकासाचे शाश्वत साधन आहेत.मानव बोलायला शिकला, नंतर लिहायला शिकला आणि त्यातूनच ग्रंथांची निर्मिती झाली. अनुभव, ज्ञान, विचार आणि भावना यांचे संचित म्हणजे ग्रंथ. माणसाचे आयुष्य मर्यादित असते, पण ग्रंथांच्या माध्यमातून त्याचे विचार अमर होतात. वेद, उपनिषदे, गीता, बुद्धाचे धम्मपद, कुराण, बायबल, महाभारत, रामायण, प्लेटोचे संवाद, अरिस्टॉटलचे ग्रंथ, कालिदासाचे साहित्य, ज्ञानेश्वरी, तुकारामांचे अभंग, फुले-आंबेडकरांचे विचार या सर्वांनी मानवजातीला विचार करायला शिकवले. म्हणूनच ग्रंथ हे काळाच्या पलीकडील गुरू ठरतात.गुरू प्रत्यक्ष भेटतो, शिकवतो, शंका निरसन करतो; पण गुरूचे आयुष्य मर्यादित असते. ग्रंथ मात्र शतकानुशतके जिवंत राहतात. हजारो वर्षांपूर्वी लिहिलेला ग्रंथ आजही आपल्याशी संवाद साधतो. तो आपल्याला त्या काळातील समाज, मूल्ये, संघर्ष आणि स्वप्ने समजावतो. त्यामुळे ग्रंथ म्हणजे काळाशी संवाद साधण्याचे माध्यम आहे.ग्रंथ माणसाला केवळ माहिती देत नाहीत, तर विचार करायला शिकवतात. ते प्रश्न विचारतात, उत्तर शोधायला लावतात आणि आपल्या दृष्टिकोनाला आव्हान देतात. एखादा वैज्ञानिक ग्रंथ माणसाला विश्वाची रहस्ये उलगडायला शिकवतो, तत्त्वज्ञान माणसाला स्वतःला ओळखायला शिकवते, इतिहास माणसाला चुका समजावतो, तर साहित्य माणसाला संवेदनशील बनवते. म्हणूनच ग्रंथ म्हणजे केवळ ज्ञानाचे भांडार नव्हे, तर माणूस घडवणारी कार्यशाळा आहे.ग्रंथ माणसाला नैतिकता शिकवतात. काय योग्य आहे, काय अयोग्य आहे, समाजात कसे वागावे, सत्ता कशी वापरावी, दुबळ्यांशी कसे वागावे हे सर्व प्रश्न ग्रंथांनी मानवजातीसमोर मांडले आहेत. बुद्धाने करुणा शिकवली, महावीरांनी अहिंसा शिकवली, कबीरांनी सत्य शिकवले, तुकारामांनी मानवतेचा संदेश दिला, फुले-आंबेडकरांनी समतेचा विचार दिला. या सर्व विचारांनी समाजाची नैतिक दिशा ठरवली.

ग्रंथ माणसाला आत्मपरीक्षण करायला शिकवतात. बाह्य जगापेक्षा अंतर्गत जग अधिक गुंतागुंतीचे असते. आपण कोण आहोत, आपल्या इच्छा काय आहेत, आपल्या भीती काय आहेत, जीवनाचा अर्थ काय आहे हे प्रश्न ग्रंथांच्या माध्यमातूनच आपण स्वतःला विचारतो. म्हणूनच ग्रंथ हे अंतर्मुखतेचे गुरू असतात.ग्रंथ माणसाला मुक्त करतात. अज्ञानातून मुक्त करतात, अंधश्रद्धेतून मुक्त करतात, संकुचित विचारांतून मुक्त करतात. जिथे विचार बंद होतात, तिथे गुलामगिरी सुरू होते. आणि

जिथे विचार सुरू होतात, तिथे मुक्तीची प्रक्रिया सुरू होते. म्हणूनच सर्व क्रांतींच्या मुळाशी ग्रंथ असतात. फ्रेंच राज्यक्रांतीच्या मुळाशी रूसो होता, रशियन क्रांतीच्या मुळाशी मार्क्स होता, भारतीय सामाजिक क्रांतीच्या मुळाशी फुले-आंबेडकर होते.ग्रंथ माणसाला सहिष्णुता शिकवतात. विविध संस्कृती, धर्म, भाषा, जीवनपद्धती यांचे दर्शन घडवून ते आपली दृष्टी व्यापक करतात. त्यामुळे माणूस केवळ स्वतःपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण मानव जातीशी नाते जोडतो.आजच्या डिजिटल युगात माहिती प्रचंड आहे, पण ज्ञान दुर्मिळ होत चालले आहे. सोशल मीडियावर क्षणिक माहिती मिळते, पण खोल विचार मिळत नाही. ग्रंथ मात्र खोलात जातात, स्थिर विचार देतात आणि माणसाला आतून बदलतात. म्हणूनच आजच्या काळातही “ग्रंथ हेच गुरू” हे विधान अधिक अर्थपूर्ण झाले आहे.ग्रंथ हे कधीच जबरदस्ती करत नाहीत. ते सांगतात, पण लादत नाहीत. ते मार्ग दाखवतात, पण चालायला माणसालाच लावतात. त्यामुळे ते स्वातंत्र्याचे गुरू असतात.

गुरू माणसाला चालायला शिकवतो, पण ग्रंथ माणसाला स्वतःचा मार्ग शोधायला शिकवतात. गुरू शरीराने मर्यादित असतो, पण ग्रंथ काळात अमर असतात. गुरू एक व्यक्ती असतो, पण ग्रंथ संपूर्ण मानवजातीचा सामूहिक अनुभव असतो. म्हणूनच खऱ्या अर्थाने “ग्रंथ हेच गुरू” आहेत.

# डिजिटल युगातील ग्रंथालयांची बदलती भूमिका

- पायल जाधव
तृतीय वर्ष, कला (मराठी विभाग)

ज्ञानसंपादनाच्या इतिहासात ग्रंथालयांना नेहमीच मध्यवर्ती स्थान राहिले आहे. प्राचीन काळातील नालंदा, तक्षशिला, अलेक्झांड्रिया यांसारखी ग्रंथालये ही केवळ पुस्तकांची साठवणूक नसून ज्ञाननिर्मितीची केंद्रे होती. आज आपण डिजिटल युगात प्रवेश केला आहे, जिथे माहिती एका क्लिकवर उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत "ग्रंथालयांची गरज संपली का?" असा प्रश्न उपस्थित केला जातो. प्रत्यक्षात मात्र डिजिटल युगाने ग्रंथालयांची भूमिका संपवली नसून ती अधिक व्यापक, अधिक गतिशील आणि अधिक जबाबदार बनवली आहे. पूर्वी ग्रंथालय म्हणजे शांत खोली, रांगेत लावलेली पुस्तके आणि संदर्भ शोधणारे वाचक अशी प्रतिमा होती. आज मात्र ग्रंथालय हे माहिती व्यवस्थापन केंद्र बनले आहे. छापील पुस्तकांबरोबरच ई-बुक्स, ऑनलाइन जर्नल्स, डेटाबेस, संशोधन पेपर्स, ऑडिओ-व्हिडिओ साहित्य यांचे व्यवस्थापन करणे ही ग्रंथालयांची नवी जबाबदारी आहे. त्यामुळे ग्रंथालय हे भौतिक जागेपेक्षा एक डिजिटल नेटवर्क बनले आहे.डिजिटल युगात माहितीची उपलब्धता प्रचंड आहे, पण विश्वासार्हतेचा प्रश्न गंभीर आहे. इंटरनेटवर माहिती भरपूर आहे, पण ती योग्य आहे का, शास्त्रीय आहे का, पूर्वग्रहविरहित आहे का, हे ओळखणे कठीण झाले आहे. अशा वेळी ग्रंथालये आणि ग्रंथपाल हे "माहितीचे मार्गदर्शक" बनतात. ते वाचकांना योग्य स्रोतांकडे नेण्याचे, संशोधनासाठी योग्य डेटाबेस सुचवण्याचे आणि माहितीचे मूल्यांकन शिकवण्याचे कार्य करतात.ग्रंथालयांची भूमिका आता केवळ पुस्तक देणाऱ्याची राहिलेली नाही, तर माहिती साक्षरता निर्माण करणारी झाली आहे. विद्यार्थी आणि संशोधकांना माहिती कशी शोधावी, कशी तपासावी, कशी वापरावी आणि कशी संदर्भ द्यावा हे शिकवणे ही नवी शैक्षणिक भूमिका ग्रंथालये बजावत आहेत. त्यामुळे ग्रंथालये आता शिकण्याची सक्रिय केंद्रे बनली आहेत.

डिजिटल युगाने ग्रंथालयांना सामाजिक समावेशनाची नवी जबाबदारी दिली आहे. समाजातील सर्व घटकांना डिजिटल संसाधनांपर्यंत समान प्रवेश नसतो. ग्रामीण भाग, गरीब विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती यांच्यासाठी ग्रंथालये डिजिटल दरी भरून काढण्याचे कार्य करतात. मोफत इंटरनेट, संगणक सुविधा, प्रशिक्षण कार्यक्रम यांच्या माध्यमातून ग्रंथालये डिजिटल लोकशाही घडवतात.ग्रंथालये आता समुदाय केंद्रे बनत आहेत. व्याख्याने, कार्यशाळा, पुस्तक चर्चासत्रे, डिजिटल प्रशिक्षण, बालवाचन उपक्रम यांद्वारे ग्रंथालये सामाजिक संवादाची केंद्रे बनली आहेत. त्यामुळे ती केवळ शांत अभ्यासाची जागा न राहता सर्जनशील संवादाची जागा बनली आहेत.

संशोधनाच्या क्षेत्रात ग्रंथालयांची भूमिका अधिक महत्त्वाची झाली आहे. ओपन ॲक्सेस चळवळ, रिसर्च डेटा मॅनेजमेंट, प्लॅजेरिझम तपासणी, संदर्भ व्यवस्थापन यासर्व बाबतीत ग्रंथालये संशोधकांना मार्गदर्शन करतात. त्यामुळे ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेत ग्रंथालये थेट सहभागी होतात.डिजिटल युगात ग्रंथालयांसमोर आव्हानेही आहेत. निधीची कमतरता, तंत्रज्ञानातील वेगवान बदल, कौशल्यांची गरज, आणि वाचकांच्या सवयींतील बदल. परंतु ही आव्हाने संधीही आहेत. ग्रंथालयांनी स्वतःला बदलले नाही, तर ती मागे पडतील; पण जर त्यांनी तंत्रज्ञान स्वीकारले, तर ती अधिक सशक्त होतील. महत्त्वाचे म्हणजे ग्रंथालयांचे मूलभूत मूल्य बदललेले नाही  ते म्हणजे

ज्ञानाचे लोकशाहीकरण. पूर्वी पुस्तके देऊन हे केले जात होते, आज डिजिटल संसाधनांद्वारे केले जाते. माध्यम बदलले आहे, ध्येय बदललेले नाही. डिजिटल युगाने ग्रंथालयांची गरज संपवलेली नाही, तर ती अधिक आवश्यक बनवली आहे. माहितीच्या पूरात दिशाहीन होणाऱ्या समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य ग्रंथालये करतात. म्हणूनच डिजिटल युगातही ग्रंथालये ही ज्ञानाची मंदिरेच आहेत फक्त आता त्या ईंट-पत्थरांच्या नव्हे, तर डेटाबेस आणि नेटवर्कच्या आहेत.



Modern digital library with ebooks computers and traditional books photo

# बहिणाबाईंची काव्यप्रतिमा

- कु. नेत्रा बावकर
द्वितीय वर्ष, कला

बहिणाबाई चौधरी म्हणजे संगीत शारदेला पडलेला एक सुंदर स्वप्न होतं.ज्या काळात केशवसुत, गोविंदाग्रज, भा.रा.तांबे हे महाराष्ट्राचे प्रतिभाशाली कवी महाराष्ट्रभर आपल्या काव्याची बहर उधळीत होते. त्याच काळात जळगावात राहणारे एका शेतकऱ्याच्या घरात एक अडाणी मराठी गृहिणी जात्यावर दळता दळता आणि शेतामध्ये काम करता करता आपल्या खेडवळ भाषेत संसारासाठी गाणी गात होती.

बहिणाबाईंचा जन्म जळगाव जिल्ह्यातील असोदे गावी झाला.बहिणाबाईंनी लहानपणापासूनच शाळेचे तोंड पाहिले नाही. त्यांना लिहिताही येत नव्हते, आणि वाचताही येत नव्हते. विठोबाचे आणि रामाचे मंदिर ह्याच माझ्या शाळा असं त्या म्हणत. बहिणाबाईंच्या वयाच्या तेराव्या वर्षी नथुजी चौधरी सोबत विवाह झाला. परंतु ऐन तारुण्यात सौभाग्य गमावले यावर बहिणाबाई म्हणते,

'लपे कर्माची रेखा
माझ्या कुंकवाच्या खाली
पुसोनिया गेले कुंकू
रेखा उघडी पडली'

बहिणाबाईंनी पती निधनाचा धक्का पचवला. पती निधनाच्या वेळी स्त्रिया दुःख हलके करण्यासाठी घरी आल्या, त्यांना उद्देशून बहिणाबाई म्हणतात,

'नका नका आयाबाया
नका करू माझी किव
झालं माझं समाधान
आता माझे मला जीव'

बहिणाबाई त्याला म्हणते, माझी. कीव करू नका आता. माझ्या माझ्यासाठी जीव आहे, आपल्या रडणाऱ्या जीवाची समजूत घालताना त्या म्हणतात, अरे माझ्या जीवा तुला रडण्याची सवय आहे. जरी गळयातील मंगळसूत्र तुटलं असेल तरीही पतीदेवांच्या गळयाची शपथ अजूनही आहे.

'रडू नको माझ्या जीवा, तुला रडयाची रे सव
रडू हासव जरा, त्यात संसाराची चव
जरी फुटल्या बांगड्या, मनगटी करतूत
तुटे मंगळसुतर, उरे गळयाची शपथ'

मनगटावरच्या बांगड्या फुटल्या परंतु मनगटातील कर्तव्य कोणीही हिरावू शकत नाही. मंगळसूत्र तुटलं तरीही पती देवाची शपथ अजूनही गळयात आहे. ती तुटता तुटणार नाही. बहिणाबाईंच्या कविता विशेषता दैनंदिन जीवनावर अवलंबून असत. सकाळी उठल्यावर बहिणाबाई जात्यावर दळायला बसत जात्यातून पीठ पडायला लागायचे तसे बहिणाबाईंचे काव्य ओओटातून सांडू लागे-

'अरे घरोटा घरोटा, माझे दुखता रे हात
तसं संसाराचं गानं, माझं बसते मी गात
अरे घरोटा घरोटा, तुझ्यातून पडे पीठी
तसं. तसं माझं गानं, पोटातून येते व्होटी'

पीठ दळून झाल्यावर बहिणाबाई भाकऱ्या भाजायला बसत. चूल पेटावायला बसत   पण चूल पेटेनाशी झाली आणि तिच्यातून फक्त धूर येऊ लागला की, बहिणाबाई काव्यातूनच चुलीवर संतापत असत-

‘घरी दाटला धुककय,कसा हटता हाटेना
माझे डोये झाले लाल, चुल्हा पेटला पेेटेता
आता सापडेना हाती, कुठे फुकणी बी मेली
कुठे पट्टवकरीन ( धुर्त), (नुरी)प् ,पयीसन गेली
पेट पेट  धुक्कायेला, किती घेशी माझा जीव
आरे   इस्तवाच्या  धन्या, कसं आले तुला कीव’

फुंकता फुंकता अखेरीस विस्तव पेटला. चूल पेटली, तवा तापला, बहिणाबाई भाकऱ्या भाजायला बसत, हाताला चटके बसत तेव्हा हेच चटके काव्याचे रूप घेत. त्यापासून ‘अरे संसार संसार’ सारखे काव्य निर्माण होई-

‘अरे संसार संसार
जसा तवा चुल्यावर
आधी हाताला चटके
तवा मियते भाकर’

बहिणाबाईंच्या काव्यात निसर्गाचे अद्‌भुत वर्णन पाहायला मिळते.  निसर्गातील घटना, शेती  शेतकरी यांचे वर्णन पाहायला मिळते. शेतावर जाताना वाटेत लाल तांबड्या फळांनी भरलेले वडाचे हिरवेगार  झाड दिसते की, लगेचच ते त्यांच्या ओठावर नाचायला लागे -

‘हिरवी हिरवी पान
लाल फळ जशी चोच
आले वडाच्या झाडाला
जस पीक पोपटाचं’

शेतातील कोणत्याही कामाने मग ती पेरणी असो कापणी असो बहिणाबाईंची पाठ काव्याने कधीही सोडली नाही पेरणी झाल्यानंतर बियाणे कसे रुसते याचे वर्णन बहिणाबाईने सुंदर केले आहे -

‘ऊन वाऱ्याशी खेयता
एका एका कोंबातून
पर्गटले दोन पानं
जसे हात जोडीसनं
टाया वाजविती पानं
दंग देवाच्या भजनी’

दिवसभर उन्हात कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला त्या म्हणतात-

‘शेतामधी गये घाम, हाडं मोडीसनी
आता घ्या रे हरिनाम  टाया पिटीसनी’

शेती हेच त्यांचे सर्वस्वी होते.  शेतीची साधने, शेतीची मशागत आणि त्यातील प्रक्रिया या सर्व त्यांनी काव्यात गुंफल्या आहेत. पाऊस आला की, त्या म्हणतात -

‘आता उगु  दे रे  शेत
आला आला पाऊस
वऱ्ये येऊ दे रे रोप
आता फिटली हाऊस’

मळयातील मोठेचे  वर्णन करताना त्या म्हणतात -

'वसांडली मोट
करे  धो धो यायण्यात
हुंदडत पानी
जसं तान्हं पायण्यात'

आभाळाचे धरतीशी असलेले नातं त्या एका स्फूट होईल म्हणतात-

'धर्तीवरील  हिर्वय
गेली अडत अडत
अरे उडता उडता
झाली नियी आभायात'

'देव अजब गारोडी ' या काव्यात बहिणाबाईंनी जमिनीच्या कुशीत निजलेल्या बी- बियाण्यांवर धरतीने मातीची शाल पांघरली आहे. अशी कल्पना केली आहे या काव्यात त्या म्हणतात -

'धरत्रीच्या कुशीमधी
बियबियाणं निजली
वऱ्ये  पसरली माटी
जशी शाल पांघरली '

मार्गशीष महिन्याची चाहूल लागताच कापणीची वारे वाहू लागते. तेव्हा बहिणाबाई सर्व शेतकऱ्यांना इय्ये (विळा) पाजळून ठेवायला सांगतात  केव्हा म्हणतात -

'आता लागे मार्गेसर
आली कापनी कापनी
आज करे खालेवऱ्ये
डाव्या डोयाची पापणी !
शेत पिवये धम्मक
आली कापनी कापनी
आता धरा रे हिम्मत
इय्ये ठेवा पाजवुनी '



# आजची देशसेवा...

- निसर्गा धावडे
तृतीय वर्ष, वाणिज्य

आजची देशसेवा...

"गीतेतून ज्ञान मिळालं,रामायणातून राम मिळाले
भाग्यातून हिंदू धर्म मिळाला, नशीबातून हिंदूस्तान मिळाला”

आपला भारत देश चंद्रावर पोहोचला, सुर्याचाही अभ्यास करू लागला, बुलेटवर बसून प्रवासही करू लागला. समृध्दी महामागामुळे वेळही वाचवू लागला. जगात कुठेही जा आपला देश, सन्मान मिळवू लागला, आपतला देश एक वेगळा इतिहास घडवू लागाया. आपला भारत देश पूर्णपणे संविधानावर चालतो असे देखील आपण म्हणू शकतो, कारण भारताचे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले जाहे. भारतीय इतिहासात तो दिवस अमर झाला तो, दिवस म्हणजेच १५ ऑगस्ट १९४७. आपला भारत देश पारतंत्र्यातून स्वातंत्र्यात आला. किती तो आक्रोश झाला. किती त्या. रक्त्यांच्या नद्या वाहल्या, मृतदेहांचा सडा पडला, तेव्हा स्वातंत्र्य दिन उदयास आला, अनेक स्वातंत्र्यवीरांनी आपल्या निधड्या छातीवर गोळया झेेलल्या म्हणून आज आपण स्वाभिमानाने उभे आहोत.

भारत ही प्राचीन सभ्यता, समृद्ध वारसा आणि या ब्रिटीश गौरवशाली इतिहासाचीही भूमी आहे. भारताला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले तेव्हापासून भारताने लोकशाही , विविधता, विकास, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. म्हणून,

"स्वातंत्र्याचा ध्वज फडकतो,
सूर्य तळपतो प्रगतीचा,
भारत भूच्या पराक्रमाला,
आमचा मानाचा मुजरा...

सध्याच्या काळात तर आपले भारतीय सैनिक देशाच्या सीमेवर रात्रं दिवस झटत असतात, तर आत्ताची तरुण पीढी आपण पाहिली तर त्यांना फक्त मोबाईल वापरला गेलो.परंतु अशी देशाची रक्षा करण्याची त्यांची अजिबात मनस्थिती नसते. देशाचा बरा हिरो आहे. उष्णतेत, थंडीत, पावसात व कोणत्याही हवामानात तो आपलं कर्तव्य पार पाडतो. सैनिक देशासाठी आपल्या हक्काच्या कुटुंबापासून दूर राहतो. सण- उत्सवावेळी तो देशासाठी सीमेवर तैनात असतो. भारतीय सैनिक आपल्या देशासाठी प्रचंड मेहनत घेत सदैव राखण करत असतो.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे केवळ कोल्हापूर संस्थानचे राजे नव्हते, तर ते आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार होते. त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग वैभव, ऐश्वर्य किंवा वैयक्तिक सुखासाठी न करता समाजातील वंचित, दुर्बल आणि उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी केला. म्हणूनच शाहू महाराजांचे नेतृत्त्व हे राजकीय नसून सामाजिक नेतृत्व म्हणून इतिहासात अजरामर झाले आहे.उन्नीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय समाज अत्यंत विषमतेने ग्रासलेला होता. जातिभेद, अस्पृश्यता, अज्ञान, अंधश्रद्धा आणि सामाजिक अन्याय यांनी समाजाचे तुकडे केले होते. शिक्षणावर उच्चवर्णीयांची मक्तेदारी होती आणि बहुजन समाज शिक्षण, प्रशासन व सत्तेपासून दूर ठेवला जात होता. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाला आपल्या राज्यकारभाराचा केंद्रबिंदू बनवला.शाहू महाराजांनी सर्वप्रथम शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. त्यांनी बहुजन समाजासाठी मोफत व सक्तीचे शिक्षण सुरू केले, वसतिगृहे स्थापन केली आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या. शिक्षणाच्या माध्यमातून समाज स्वतःचे बंधन तोडू शकतो, हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे शिक्षण हे त्यांच्या सामाजिक नेतृत्त्वाचे पहिले आधारस्तंभ ठरले. दुसरा महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणजे सामाजिक समता. त्यांनी आपल्या राज्यात अस्पृश्यतेविरोधी ठोस पावले उचलली. सार्वजनिक विहिरी, शाळा, रस्ते आणि देवळे सर्वांसाठी खुले करण्याचा त्यांनी आग्रह धरला. अस्पृश्यतेला त्यांनी अमानवी प्रथा मानले आणि ती नष्ट करण्यासाठी राजसत्ता वापरण्याचे धाडस केले.तिसरा आधारस्तंभ म्हणजे आरक्षणाची संकल्पना. १९०२ साली शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू केले. हा निर्णय केवळ क्रांतिकारी नव्हता तर दूरदृष्टीपूर्ण होता. समाजातील संधींचे असमान वाटप दुरुस्त करण्यासाठी विशेष सवलती आवश्यक आहेत, हे त्यांनी ओळखले होते. आजच्या सामाजिक न्याय धोरणांची बीजे याच निर्णयात आढळतात.

शाहू महाराजांनी बहुजन समाजातील नेतृत्त्व घडवण्यावरही भर दिला. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजारामशास्त्री भागवत, दिनकरराव जावडेकर यांसारख्या अनेक विचारवंतांना प्रोत्साहन दिले. त्यांनी बहुजन समाजाला केवळ लाभार्थी न बनवता नेतृत्त्वासाठी सज्ज केले. त्यामुळे त्यांचे नेतृत्त्व व्यक्तिकेंद्री न राहता चळवळीकेंद्री बनले.स्त्रीशिक्षण व स्त्रीस्वातंत्र्य हाही त्यांच्या सामाजिक नेतृत्त्वाचा महत्त्वाचा भाग होता. त्यांनी स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा, वसतिगृहे सुरू केली, विधवा विवाहाला पाठिंबा दिला आणि बालविवाह विरोधात भूमिका घेतली. समाजाचा निम्मा घटक मागे राहिला तर समाज पुढे जाऊ शकत नाही, हा त्यांचा ठाम विश्वास होता. धर्माच्या बाबतीतही शाहू महाराज अत्यंत प्रगल्भ होते. त्यांनी धर्माचा उपयोग सामाजिक शोषणासाठी न होता सामाजिक उन्नतीसाठी व्हावा अशी भूमिका घेतली. पुरोहितशाहीवर टीका केली आणि सत्य, मानवता व समतेवर आधारित धर्माची संकल्पना पुढे मांडली. त्यामुळे त्यांनी धार्मिक सुधारणेलाही सामाजिक सुधारणेचे रूप दिले. या सर्व सुधारणा त्यांनी केवळ कायद्याने नव्हे तर स्वतःच्या

आचरणातून रुजवल्या. त्यांनी जातिभेद तोडण्यासाठी स्वतः भोजन समारंभात सर्वांना एकत्र बसवले, अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांशी सार्वजनिक व्यवहार केले आणि सामाजिक समतेचा आदर्श स्वतःच्या जीवनातून उभा केला.म्हणूनच शाहू महाराजांचे नेतृत्त्व हे केवळ आदेश देणारे नव्हते, तर प्रेरणा देणारे होते. त्यांनी सत्ता वापरली नाही, तर सत्तेला समाजपरिवर्तनाचे साधन बनवले. त्यामुळे ते केवळ राजे राहिले नाहीत, तर समाजाचे खरे नेते झाले. आजच्या भारतात सामाजिक न्याय, आरक्षण, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि स्त्रीस्वातंत्र्य यावर जे धोरणात्मक निर्णय घेतले जातात, त्यांची वैचारिक मुळे शाहू महाराजांच्या विचारांत आढळतात. म्हणूनच त्यांना सामाजिक नेतृत्त्वाचे आधारस्तंभ म्हटले जाते.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी समाजाला केवळ सुधारले नाही, तर समाजाला स्वतःला सुधारण्याची क्षमता दिली. त्यांनी घडवलेली सामाजिक जाणीव हीच त्यांची खरी वारसा आहे. म्हणूनच ते केवळ इतिहासातील राजे नसून आधुनिक भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे महान शिल्पकार आहेत.



**राजर्षी छत्रपती शाहू महाराज**

# ◈ महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य ◈

- नेत्रा बावकर
द्वितीय वर्ष, कला

महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले हे आधुनिक भारतातील सामाजिक परिवर्तनाचे दोन अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ मानले जातात. त्यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजातील अज्ञान, अन्याय, जातिभेद आणि स्त्रीदास्य यांच्याविरुद्ध लढण्यासाठी वापरला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाला नवचेतना मिळाली आणि सामाजिक समतेची एक नवी दिशा निर्माण झाली. उन्नीसाव्या शतकातील भारतीय समाज हा तीव्र विषमतेने ग्रासलेला होता. जातीय उतरंड, अस्पृश्यता, स्त्रियांचे दास्य, अज्ञान आणि अंधश्रद्धा यांनी समाजाचा कणा मोडून टाकला होता. शिक्षण हे काही मोजक्या लोकांचे अधिकार बनले होते आणि बहुसंख्य समाज शिक्षण, सत्ता आणि सन्मान यांपासून वंचित होता. अशा काळात फुले दांपत्याने सामाजिक क्रांतीचा पाया घातला. महात्मा जोतीराव फुले यांनी सर्वप्रथम समाजाच्या मानसिक गुलामगिरीवर प्रहार केला. त्यांनी जातिभेदाला नैसर्गिक किंवा दैवी नसून मानवनिर्मित अन्याय मानले. 'गुलामगिरी' या ग्रंथातून त्यांनी ब्राह्मण्य वर्चस्वावर तीव्र टीका केली आणि बहुजन समाजाला आपल्या शोषणाची जाणीव करून दिली. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून सत्य, समता आणि मानवतेवर आधारित समाजरचनेचा आग्रह धरला.

सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची ज्योत प्रज्वलित केली. १८४८ मध्ये पुण्यात त्यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. त्या काळात स्त्रियांचे शिक्षण हे पाप मानले जात होते, परंतु सावित्रीबाईंनी सामाजिक विरोध, अपमान आणि बहिष्कार सहन करूनही शिक्षणाचा मार्ग सोडला नाही. त्यांनी विधवा, दलित, मागास आणि गरीब मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. फुले दांपत्याने अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रत्यक्ष कृती केली. त्यांनी आपल्या घरातील पाण्याची विहीर सर्वांसाठी खुली केली. सार्वजनिक ठिकाणी दलितांना प्रवेश मिळावा यासाठी संघर्ष केला. त्यांनी अस्पृश्यतेला मानवतेवरील कलंक मानले आणि समाजाला त्याविरुद्ध जागे केले. स्त्रियांच्या हक्कांसाठी फुले दांपत्याने विशेष कार्य केले.

सावित्रीबाईंनी विधवांसाठी आश्रयगृहे सुरू केली, अनाथ बालकांसाठी बालहत्या प्रतिबंधक केंद्र स्थापन केले आणि स्त्रियांना आत्मसन्मानाने जगण्याची प्रेरणा दिली. त्यांनी स्त्रियांचे दुःख हे वैयक्तिक नसून सामाजिक समस्या आहे, हे समाजासमोर मांडले. धर्माच्या बाबतीत फुले दांपत्याची भूमिका मानवतावादी होती. त्यांनी धर्माचा उपयोग शोषणासाठी नव्हे तर मुक्तीसाठी व्हावा असा आग्रह धरला. त्यांनी कर्मकांड, अंधश्रद्धा आणि पुरोहितशाहीवर टीका केली आणि विवेक, विज्ञान आणि मानवतेवर आधारित धर्माची संकल्पना मांडली.महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजाला केवळ दोष दाखवले नाहीत, तर पर्यायही दिला. त्यांनी शिक्षण, संघटन आणि विचार या माध्यमातून समाजपरिवर्तनाचा मार्ग दाखवला. त्यांनी निर्माण केलेली चळवळ पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज आणि अनेक सुधारकांनी पुढे नेली. महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य हे केवळ एका काळापुरते मर्यादित नाही. ते आजही सामाजिक न्याय, स्त्रीस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या लढ्याला दिशा देते. त्यांनी समाजाला केवळ बदलले नाही, तर समाजाला बदलण्याची ताकद दिली. म्हणूनच ते आधुनिक भारताचे खरे सामाजिक क्रांतिकारक मानले जातात.

# ◈ बहुजनांचे उद्धारक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर ◈

- सावली चव्हाण
तृतीय वर्ष, कला (इतिहास)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नव्हते, तर ते बहुजन समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि मानवी मुक्तीचे महान उद्धारक होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजातील विषमता, जातिभेद, अस्पृश्यता आणि अन्याय यांच्या विरोधात संघर्ष करण्यासाठी समर्पित केला. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ एका व्यक्तीचे कार्य न राहता एक व्यापक सामाजिक चळवळ बनले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म अत्यंत प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत झाला. अस्पृश्य म्हणून त्यांना शिक्षणात, समाजात आणि सार्वजनिक जीवनात अपमान सहन करावा लागला. मात्र त्यांनी या अपमानाला स्वतःची मर्यादा मानले नाही, तर समाजातील व्यवस्थेची चूक मानली. शिक्षण हेच मुक्तीचे साधन आहे हे त्यांनी ओळखले आणि त्यासाठी त्यांनी विलक्षण संघर्ष केला. परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतले आणि ते ज्ञान बहुजन समाजाच्या उद्धारासाठी वापरले.

डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक विषमतेच्या मुळावरच प्रहार केला. त्यांनी जातिभेद ही मानवनिर्मित व्यवस्था आहे हे सिद्ध केले आणि तिच्या नैतिक व बौद्धिक पायावर प्रश्न उपस्थित केले. त्यांनी अस्पृश्यतेला अमानवी प्रथा मानले आणि ती नष्ट करण्यासाठी कायदा, चळवळ आणि विचार या तिन्हींचा उपयोग केला. महाड सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन यांसारख्या चळवळींनी दलित समाजाला आत्मसन्मानाची जाणीव करून दिली.शिक्षण हा डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यांनी बहुजन समाजाला शिकण्याची प्रेरणा दिली. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा त्यांचा संदेश आजही तितकाच अर्थपूर्ण आहे. त्यांनी शिक्षणाला केवळ नोकरीचे साधन न मानता सामाजिक मुक्तीचे साधन मानले. संविधान निर्मितीतील बाबासाहेबांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांनी भारतीय संविधानात समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले. अस्पृश्यता नष्ट करणे, समान नागरिकत्व, मूलभूत अधिकार, आरक्षण यांसारख्या तरतुदी त्यांच्या सामाजिक दृष्टीचे कायदेशीर रूप होते. त्यामुळे बहुजन समाजाला केवळ नैतिक नव्हे तर कायदेशीर संरक्षण मिळाले. डॉ. बाबासाहेबांनी स्त्रीस्वातंत्र्यालाही विशेष महत्त्व दिले. हिंदू कोड बिलच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना मालमत्तेचा हक्क, विवाहातील समानता आणि घटस्फोटाचा अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्त्रीदास्याला सामाजिक अन्याय मानले आणि स्त्री-पुरुष समतेचा आग्रह धरला.धर्माच्या बाबतीत डॉ. बाबासाहेबांची भूमिका विवेकवादी होती. त्यांनी धर्माचा उपयोग शोषणासाठी नव्हे तर मुक्तीसाठी व्हावा अशी भूमिका घेतली. म्हणूनच त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारून समता, करुणा आणि विवेकावर आधारित जीवनदृष्टी समाजाला दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते संपूर्ण भारताचे नैतिक व वैचारिक मार्गदर्शक होते. त्यांनी बहुजन समाजाला केवळ हक्क दिले नाहीत, तर आत्मसन्मान, विचारशक्ती आणि संघर्षाची ताकद दिली. म्हणूनच ते खऱ्या अर्थाने बहुजनांचे उद्धारक ठरतात.

# ◈ छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य ◈

- श्रुती आर्डे
द्वितीय वर्ष, कला

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे केवळ एक राज्य नव्हते, तर ते एक नवे राजकीय तत्त्वज्ञान, एक सामाजिक मूल्यव्यवस्था आणि जनतेच्या आत्मसन्मानावर उभे राहिलेले लोककल्याणकारी शासन होते. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" असा विचार प्रत्यक्षात उतरवणारे छ. शिवाजी महाराज हे आधुनिक भारतातील राष्ट्रभावनेचे आद्य शिल्पकार मानले जातात. त्यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेत स्वातंत्र्य, न्याय, लोककल्याण, धर्मसहिष्णुता आणि सुशासन यांचा अद्भुत संगम होता.सतराव्या शतकातील भारत हा परकीय सत्तांच्या संघर्षांनी आणि अंतर्गत राजकीय अस्थिरतेने ग्रासलेला होता.

मुघल साम्राज्य, आदिलशाही, कुतुबशाही यांच्यात सत्ता संघर्ष सुरू होता. सामान्य जनता करभार, अन्याय आणि असुरक्षिततेखाली दबलेली होती. अशा परिस्थितीत छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची कल्पना मांडली, जी केवळ राजसत्ता मिळवण्याची नव्हे तर जनतेला सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि न्याय्य जीवन देण्याची चळवळ होती. छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी तलवारीपेक्षा बुद्धीने अधिक केली. त्यांनी गनिमी काव्याचे तंत्र विकसित करून तुलनेने लहान सैन्य असूनही मोठ्या सत्तांना आव्हान दिले. डोंगराळ भूगोलाचा अभ्यास, किल्ल्यांची साखळी, वेगवान हालचाल आणि स्थानिक जनतेचा पाठिंबा यांच्या आधारे त्यांनी स्वराज्याचा पाया घातला. तोरणा, राजगड, सिंहगड, पुरंदर यांसारखे किल्ले स्वराज्याचे संरक्षणस्तंभ बनले.

महाराजांचे स्वराज्य हे लोकाभिमुख होते. त्यांनी शेतकऱ्यांचे रक्षण केले, अनावश्यक कर कमी केले आणि महसूल व्यवस्था सुटसुटीत केली. त्यांची करप्रणाली उत्पादनक्षमतेवर आधारित होती, त्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत नसे. स्वराज्याचा खरा आधार शेतकरी आणि सामान्य जनता होती, हे छ. शिवाजी महाराजांनी ओळखले होते.त्यांचे प्रशासन कार्यक्षम आणि नैतिक होते. त्यांनी अष्टप्रधान मंडळाची स्थापना करून शासनव्यवस्था विकेंद्रित केली. प्रत्येक मंत्र्याची स्पष्ट जबाबदारी होती, त्यामुळे भ्रष्टाचाराला फारशी जागा नव्हती.

न्यायव्यवस्था सुलभ आणि जलद होती. जात, धर्म किंवा वर्ग न पाहता न्याय दिला जात असे. धर्माच्या बाबतीत छ. शिवाजी महाराज अत्यंत सहिष्णू होते. ते स्वतः कट्टर हिंदू होते, पण त्यांनी कधीही धर्माधारित द्वेष किंवा अन्यायाला प्रोत्साहन दिले नाही. मशिदी, दर्गे आणि स्त्रियांचा सन्मान राखण्याचे त्यांनी सैन्याला कठोर आदेश दिले. त्यांच्या स्वराज्यात धार्मिक स्वातंत्र्य होते आणि सर्व धर्मांच्या लोकांना सुरक्षितता होती.स्त्रियांचा सन्मान हे त्यांच्या स्वराज्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. युद्धात स्त्रियांवर अत्याचार करण्यास कठोर मनाई होती. पकडलेल्या स्त्रियांना सन्मानाने परत पाठवले जाई. त्यामुळे छ. शिवाजी महाराजांचे राज्य हे केवळ शक्तिशाली नव्हे तर सुसंस्कृतही होते.शिवाजी महाराजांनी नौदल उभारून समुद्री स्वराज्याची पायाभरणी केली. परकीय शक्तींच्या समुद्री आक्रमणांपासून किनारपट्टीचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी जलदुर्ग आणि आरमार उभारले.

हे त्यांच्या दूरदृष्टीचे द्योतक होते.स्वराज्य हे महाराजांसाठी वैयक्तिक सत्ता नव्हती, तर ती लोकांची मालकी होती. त्यांनी स्वतःला "राजा"पेक्षा

"रायतेचा सेवक" मानले. त्यांच्या पत्रांमध्ये आणि आज्ञापत्रांमध्ये हा लोकाभिमुख दृष्टिकोन स्पष्ट दिसतो. छ. शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे राजकीयदृष्ट्या यशस्वी होतेच, पण त्याहून अधिक ते वैचारिकदृष्ट्या क्रांतिकारी होते. त्यांनी भारतीय समाजाला स्वातंत्र्याची, आत्मसन्मानाची आणि स्वशासनाची प्रेरणा दिली. पुढील पिढ्यांच्या स्वातंत्र्यलढ्याची मानसिक पायाभरणी त्यांनीच केली असे म्हणता येईल.

छ. शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे केवळ एका भौगोलिक प्रदेशापुरते मर्यादित नव्हते. ते एक मूल्यव्यवस्था होते न्यायावर आधारित, लोककल्याणकारी, धर्मसहिष्णू आणि स्वाभिमानपूर्ण. म्हणूनच छ. शिवाजी महाराज हे केवळ मराठ्यांचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे राष्ट्रनायक मानले जातात.



**छत्रपती शिवाजी महाराज**

# वाणिज्य विभाग

# ◈वाणिज्य विभाग◈

# अंतरंग


| अ.क्र. | लेख / कवितेचे नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | भारताची अर्थव्यवस्था : आव्हाने आणि संधी | समृद्धी रबसे | ६९ |
| २ | शाश्वत विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्राचे महत्त्व | संस्कार नारकर | ७१ |
| ३ | भारतीय अर्थव्यवस्था आणि परराष्ट्र संबंध व्यवस्था | भरत जोशी | ७३ |
| ४ | वाचन संस्कृती आणि आजचा विद्यार्थी | सुमित चांदे | ७५ |
| ५ | स्वामी विवेकानंद आणि आजचा विद्यार्थी | शुभम हांदे | ७७ |
| ६ | आजची देशसेवा | निसर्गा धावडे | ७९ |
| ७ | पतसंस्थांचे संचालक आणि व्यवस्थापन | रजनी बाबशेट्ये | ८० |
| ८ | सोने भारतासाठी एक नवी गुंतवणूक आणि कर्ज व्यवसायासाठी सुवर्णसंधी | साहिल नार्वेकर | ८३ |
| ९ | सहकारी संस्था आणि कृत्रिम बुद्धिमत्ता | तन्वी शिर्के | ८५ |

# ◈ भारताची अर्थव्यवस्था : आव्हाने आणि संधी◈

- समृद्धी रबसे
द्वितीय वर्ष, वाणिज्य

मी एक महाविद्यालयीन विद्यार्थिनी म्हणून आजच्या भारताच्या अर्थव्यवस्थेकडे पाहताना मला असे जाणवते की भारत एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. एकीकडे देश झपाट्याने पुढे जात आहे, तर दुसरीकडे अनेक समस्या अजूनही कायम आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारताने नियोजनबद्ध विकासाचा मार्ग स्वीकारला आणि सन १९९१ नंतर खुल्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल केली. या बदलांमुळे उद्योग, सेवा क्षेत्र, तंत्रज्ञान आणि व्यापाराला चालना मिळाली. त्यामुळे भारत आज जागतिक पातळीवर एक महत्त्वाची अर्थव्यवस्था म्हणून ओळखला जातो.आज भारताची तरुण लोकसंख्या ही देशाची मोठी ताकद आहे.

महाविद्यालयात शिक्षण घेत असताना आम्हाला सतत सांगितले जाते की, आम्ही "देशाचे भविष्य" आहोत. पण त्याच वेळी रोजगाराबद्दलची अनिश्चितता आम्हाला अस्वस्थ करते. अनेक विद्यार्थी शिक्षण पूर्ण करूनही नोकरी मिळवण्यासाठी संघर्ष करत आहेत. काहींना त्यांच्या शिक्षणाशी सुसंगत नोकरी मिळत नाही, तर काहींना कमी पगारावर काम करावे लागते. त्यामुळे शिक्षण आणि रोजगार यातील अंतर ही एक मोठी समस्या वाटते.

शहरांमध्ये विकास मोठ्या प्रमाणावर दिसतो, पण ग्रामीण भागात अजूनही मूलभूत सुविधांचा अभाव आहे. शेतकरी कष्ट करून अन्न पिकवतो, पण त्याला त्याच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही. हवामान बदलामुळे शेती अधिक जोखमीची झाली आहे. दुष्काळ, अतिवृष्टी आणि कीड यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते आणि त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो.

महागाई ही सामान्य माणसांसाठी मोठी चिंता आहे. रोजच्या गरजेच्या वस्तू, इंधन, शिक्षण आणि आरोग्यसेवा महाग होत चालल्या आहेत. त्यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांचे बजेट कोलमडते. शिक्षण घेत असताना खर्च वाढत असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांवर आर्थिक ताण येतो.विकासाच्या प्रक्रियेमुळे पर्यावरणावरही मोठा ताण आला आहे.

प्रदूषण, वाढते तापमान, पाण्याची टंचाई आणि जंगलतोड यामुळे भविष्यातील पिढ्यांचे जीवन धोक्यात येऊ शकते. त्यामुळे केवळ आर्थिक विकास पुरेसा नाही, तर तो पर्यावरणपूरक आणि शाश्वत असणे आवश्यक आहे, असे मला वाटते. या सर्व आव्हानांबरोबरच भारतासमोर अनेक संधीही आहेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे आज व्यवहार सोपे झाले आहेत. मोबाईलवरून पैसे पाठवता येतात,

ऑनलाइन शिक्षण घेता येते आणि माहिती सहज मिळते. यामुळे नवीन व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. स्टार्टअप संस्कृतीमुळे तरुणांना स्वतःचा उद्योग सुरू करण्याची प्रेरणा मिळत आहे.उत्पादन क्षेत्रातही भारताकडे मोठी संधी आहे. अनेक परदेशी कंपन्या भारतात गुंतवणूक करत आहेत.

यामुळे रोजगारनिर्मिती होऊ शकते आणि देश आर्थिकदृष्ट्या अधिक मजबूत होऊ शकतो.मला असे वाटते की भारताचा खरा विकास तेव्हाच होईल जेव्हा तो सर्वांना सोबत घेऊन होईल. बेरोजगारी कमी होईल, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल, शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचेल आणि पर्यावरणाचे संरक्षण होईल, तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने प्रगत देश बनेल.

शेवटी एक विद्यार्थिनी म्हणून माझी अशी अपेक्षा आहे की, आम्हाला केवळ नोकरी शोधणारे नव्हे तर समाजासाठी काहीतरी करणारे नागरिक घडवले जावे. जर सरकार, समाज आणि युवकांनी एकत्रितपणे प्रयत्न केले तर भारताची अर्थव्यवस्था आव्हानांवर मात करून संधींचा लाभ घेऊ शकेल आणि एक समृद्ध, समतोल व शाश्वत भविष्य घडवू शकेल.



# ◈ शाश्वत विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्राचे महत्त्व ◈

- संस्कार नारकर
प्रथम वर्ष, वाणिज्य

मी एक विद्यार्थी म्हणून आजच्या जगाकडे पाहताना असे जाणवते की, विकास आणि पर्यावरण यांच्यातील नाते दिवसेंदिवस अधिक महत्त्वाचे होत चालले आहे. लोकसंख्या वाढत आहे, गरजा वाढत आहेत आणि त्याचबरोबर नैसर्गिक संसाधनांवरचा ताणही वाढत आहे.

आपण विकासाच्या नावाखाली जंगलतोड करतो, नद्या प्रदूषित करतो, हवेत विषारी वायू सोडतो आणि पृथ्वीचे नैसर्गिक संतुलन बिघडवतो. त्यामुळे शाश्वत विकास ही संकल्पना आज अत्यंत गरजेची झाली आहे.शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो आजच्या गरजा पूर्ण करतो, पण भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता कमी करत नाही.

म्हणजेच आर्थिक प्रगती, सामाजिक न्याय आणि पर्यावरण संरक्षण या तिन्ही गोष्टींचा समतोल साधणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय. केवळ कारखाने उभारणे, मोठ्या इमारती बांधणे किंवा उत्पन्न वाढवणे म्हणजे विकास नाही. जर त्यातून प्रदूषण वाढले, नैसर्गिक साधनसंपत्ती संपली आणि मानवी आरोग्य धोक्यात आले, तर तो विकास टिकणारा ठरत नाही.पर्यावरणीय अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्था आणि पर्यावरण यांच्यातील संबंधांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. हवा, पाणी, जमीन, जंगल आणि जैवविविधता ही अर्थव्यवस्थेची मूलभूत साधने आहेत.

त्यांचा अति वापर केल्यास भविष्यात मोठा आर्थिक आणि सामाजिक खर्च सहन करावा लागतो. पर्यावरणीय अर्थशास्त्र आपल्याला सांगते की, प्रदूषण आणि संसाधनांच्या ऱ्हासाचे खर्च लक्षात घेऊनच विकासाचे निर्णय घ्यायला हवेत. आज आपण हवामान बदलाचे परिणाम प्रत्यक्ष अनुभवत आहोत. वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान, दुष्काळ, पूर, चक्रीवादळे आणि हिमनद्या वितळणे हे मानवी कृतींचे परिणाम आहेत.

याचा थेट परिणाम शेती, पाणीपुरवठा, आरोग्य आणि जीवनमानावर होतो. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नसून तो आर्थिक आणि सामाजिक प्रश्नही आहे. शाश्वत विकासासाठी नवीकरणीय ऊर्जेचा वापर अत्यंत महत्त्वाचा आहे. सौरऊर्जा, पवनऊर्जा आणि जलऊर्जा या पर्यावरणपूरक आहेत आणि भविष्यातील ऊर्जेचा आधार ठरू शकतात.

यामुळे प्रदूषण कमी होते, इंधन आयात कमी होते आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतात. तसेच हरित तंत्रज्ञान आणि ऊर्जा कार्यक्षम साधने वापरल्यास पर्यावरण संरक्षणासोबत आर्थिक लाभही मिळतो. शाश्वत विकासाचा सामाजिक पैलूही महत्त्वाचा आहे. विकास सर्वांसाठी असला पाहिजे. शिक्षण, आरोग्य, पाणी आणि स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधा सर्वांना मिळाल्याशिवाय विकास अपूर्ण राहतो. शाश्वत विकास म्हणजे केवळ निसर्गाचे रक्षण नव्हे, तर मानवतेचे भविष्य सुरक्षित करणे होय.

एक विद्यार्थी म्हणून मला असे वाटते की, आमची पिढी या बदलांची साक्षीदार आहे आणि त्याची जबाबदारीही आमच्यावर आहे. आम्ही पर्यावरणपूरक सवयी अंगीकारू शकतो, प्लास्टिकचा वापर कमी करू शकतो, पाणी आणि वीज वाचवू शकतो आणि समाजात पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करू शकतो.

शेवटी असे म्हणता येईल की शाश्वत विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र हे केवळ अभ्यासाचे

विषय नसून आपल्या अस्तित्त्वाशी निगडित आहेत. जर आपण आज निसर्गाचे संरक्षण केले नाही, तर उद्याचा विकास अर्थहीन ठरेल. म्हणून आर्थिक प्रगतीसोबत पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक न्याय यांचा समतोल साधणे हाच खरा आणि टिकाऊ विकासाचा मार्ग आहे.




**शाश्वत विकास, पर्यावरण  व अर्थशास्त्र**

# ◈ भारतीय अर्थव्यवस्था आणि परराष्ट्र संबंध व्यवस्था ◈

- भरत जोशी
तृतीय वर्ष, वाणिज्य

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात कोणतीही राष्ट्रीय अर्थव्यवस्था पूर्णतः स्वतंत्र राहू शकत नाही. प्रत्येक देशाची आर्थिक प्रगती ही केवळ अंतर्गत धोरणांवर नव्हे, तर आंतरराष्ट्रीय व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि राजनैतिक संबंधांवरही अवलंबून असते. भारतासारख्या विकसनशील व उदयोन्मुख अर्थव्यवस्थेसाठी परराष्ट्र संबंध ही आर्थिक विकासाची एक महत्त्वाची किल्ली ठरली आहे.

त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था आणि परराष्ट्र संबंध यांच्यातील परस्परसंबंध समजून घेणे आज अत्यंत आवश्यक झाले आहे.स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही दशकांत भारताने समाजवादी आणि संरक्षणवादी आर्थिक धोरण स्वीकारले होते. आत्मनिर्भरता, सार्वजनिक क्षेत्राचे वर्चस्व आणि आयात नियंत्रण यांवर भर देण्यात आला.

त्या काळात परराष्ट्र संबंध प्रामुख्याने राजकीय स्वरूपाचे होते आणि आर्थिक सहकार्य मर्यादित होते. मात्र सन १९९१ नंतरच्या आर्थिक उदारीकरणानंतर भारताने जागतिक अर्थव्यवस्थेशी सक्रियपणे जोडून घेण्याची भूमिका घेतली. मुक्त व्यापार, खासगीकरण, आणि उदारीकरणामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला वेग मिळाला आणि परराष्ट्र संबंध अधिक आर्थिक-केंद्रित झाले.आंतरराष्ट्रीय व्यापार हा परराष्ट्र संबंधांचा सर्वात महत्त्वाचा आर्थिक पैलू आहे. भारत कच्चे तेल, नैसर्गिक वायू, यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांची मोठ्या प्रमाणावर आयात करतो, तर औषधे, आयटी सेवा, वस्त्रोद्योग, कृषी उत्पादने, वाहन उद्योग आणि रसायने यांची निर्यात करतो. अमेरिका, युरोपियन संघ, चीन, जपान, आशियान देश आणि आफ्रिकी राष्ट्रे ही भारताची प्रमुख व्यापार भागीदार आहेत. व्यापारामुळे परकीय चलन मिळते, रोजगार निर्मिती होते आणि देशांतर्गत उद्योगांना प्रोत्साहन मिळते.

परकीय थेट गुंतवणूक (F.D.I.) ही भारताच्या आर्थिक विकासाची दुसरी महत्त्वाची बाजू आहे. मजबूत आणि विश्वासार्ह परराष्ट्र संबंध असल्यास परदेशी गुंतवणूकदार भारतात गुंतवणूक करण्यास उत्सुक होतात. यामुळे भांडवल उपलब्ध होते, आधुनिक तंत्रज्ञान येते, व्यवस्थापन कौशल्य वाढते आणि उत्पादनक्षमता सुधारते. "मेक इन इंडिया", स्टार्टअप इंडिया" आणि "डिजिटल इंडिया" यांसारख्या उपक्रमांमुळे भारताने स्वतःला जागतिक गुंतवणुकीसाठी आकर्षक बनवले आहे.

परराष्ट्र संबंधांचा तिसरा पैलू म्हणजे आर्थिक कूटनीती. आज भारत केवळ राजकीय मुद्द्यांवर नव्हे, तर ऊर्जा सुरक्षा, हवामान बदल, अन्न सुरक्षा, पुरवठा साखळी स्थिरता आणि तंत्रज्ञान सहकार्य यांवरही जागतिक मंचांवर सक्रिय भूमिका बजावत आहे. G20, W.T.O., I.M.F., B.R.I.C.S., Q.U.A.D. आणि शांघाय सहकार्य संघटना यांसारख्या मंचांवर भारत आपल्या आर्थिक हितसंबंधांचे रक्षण करतो आणि विकसनशील देशांचा आवाज बनतो. जागतिक घडामोडींचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. आंतरराष्ट्रीय युद्धे, जागतिक मंदी, तेलाचे वाढते दर, डॉलर-रुपया विनिमय दरातील चढ-उतार यांचा परिणाम महागाई, आयात खर्च आणि आर्थिक स्थिरतेवर होतो. त्यामुळे भारताला संतुलित, बहुपक्षीय आणि वास्तववादी परराष्ट्र धोरण स्वीकारावे लागते, जे आर्थिक हितांचे संरक्षण करते आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवते. भारताची लोकसंख्या, मोठी बाजारपेठ, युवा कार्यबल आणि तांत्रिक क्षमता यांमुळे तो जगासाठी एक महत्त्वाचा

आर्थिक भागीदार ठरत आहे. सेवा क्षेत्रात भारताची विशेष ओळख निर्माण झाली आहे, विशेषतः आयटी, बँकिंग, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांत. त्यामुळे परराष्ट्र संबंध केवळ व्यापारापुरते मर्यादित न राहता ज्ञान-विनिमय, संशोधन सहकार्य आणि शैक्षणिक देवाण-घेवाण यांपर्यंत विस्तारले आहेत.

सध्याच्या काळात भारत "वसुधैव कुटुंबकम्" या संकल्पनेवर आधारित समावेशक आणि सहकार्यपूर्ण परराष्ट्र धोरणाचा अवलंब करीत आहे. भारत केवळ स्वतःचा फायदा पाहत नाही तर जागतिक स्थैर्य, शांतता आणि शाश्वत विकास यांनाही महत्त्व देतो. त्यामुळे हवामान बदल, आरोग्य संकटे आणि आर्थिक असमानता यांसारख्या जागतिक समस्यांवर भारत सक्रिय भूमिका घेत आहे.

असे म्हणता येईल की, भारतीय अर्थव्यवस्था आणि परराष्ट्र संबंध यांच्यात घनिष्ठ आणि परस्परावलंबी नाते आहे. मजबूत परराष्ट्र संबंधांमुळे आर्थिक संधी वाढतात, तर मजबूत अर्थव्यवस्थेमुळे देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढते. त्यामुळे भारताने दीर्घकालीन, संतुलित आणि समावेशक परराष्ट्र धोरण स्वीकारून आर्थिक विकासाला दिशा देणे आवश्यक आहे. हाच भारताच्या स्थिर, शाश्वत आणि सर्वसमावेशक प्रगतीचा खरा मार्ग ठरेल.

# ◈ वाचन संस्कृती आणि आजचा विद्यार्थी◈

- सुमित चांदे
प्रथम वर्ष, वाणिज्य

वाचन ही केवळ अक्षरांची ओळख करून घेण्याची क्रिया नसून ती माणसाच्या विचारांना दिशा देणारी, संवेदनशीलता वाढवणारी आणि जीवनाला अर्थ देणारी एक मूलभूत प्रक्रिया आहे. वाचनामुळे माणूस स्वतःच्या मर्यादा ओलांडतो, दुसऱ्यांचे अनुभव समजून घेतो आणि व्यापक मानवतेशी जोडला जातो. म्हणूनच ज्या समाजात वाचन संस्कृती बळकट असते, तो समाज अधिक प्रगल्भ, अधिक विवेकी आणि अधिक सर्जनशील बनतो.

आजचा विद्यार्थी मात्र एका वेगळ्याच माहितीविश्वात जगत आहे , झपाट्याने बदलणाऱ्या डिजिटल तंत्रज्ञानाच्या, वेगवान जीवनशैलीच्या आणि सततच्या उत्तेजनांच्या जगात. अशा परिस्थितीत वाचन संस्कृती टिकून आहे का, बदलत आहे का, की मागे पडत आहे, हा प्रश्न गंभीरपणे विचार करण्यासारखा आहे.पूर्वी वाचन ही शांततेची, एकाग्रतेची आणि अंतर्मुखतेची क्रिया होती. ग्रंथालयात बसून पुस्तक हातात घेऊन वाचणे, ओळीखाली रेघ ओढणे, वहीत नोंदी करणे आणि विचार करणे ही एक साधना होती. त्या प्रक्रियेत वेळ लागत असे, संयम लागत असे आणि मनाची उपस्थिती आवश्यक असे आज मात्र माहिती क्षणार्धात उपलब्ध होते. एका क्लिकवर हजारो लेख, व्हिडिओ, नोट्स, कोर्सेस आणि सारांश मिळतात. त्यामुळे विद्यार्थ्याला असे वाटते की वाचनाची गरजच उरलेली नाही, कारण सर्व काही तत्काळ मिळते. परंतु माहिती मिळणे आणि ज्ञान मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

डिजिटल माध्यमांनी विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या सवयी बदलल्या आहेत. लांबलचक मजकुराऐवजी लहान मजकूर, व्हिडिओ क्लिप्स, इन्फोग्राफिक्स आणि रील्स यांकडे ओढ वाढली आहे. हे माध्यमे उपयुक्त असली तरी त्यांचा अतिरेक झाल्यास खोल वाचनाची सवय कमी होते. खोल वाचन म्हणजे केवळ शब्द समजून घेणे नव्हे, तर त्यामागील अर्थ, संदर्भ, परिणाम आणि प्रश्न यांचा विचार करणे होय. हे खोल वाचनच विद्यार्थ्याला चिकित्सक विचारशक्ती देते.आजच्या विद्यार्थ्यांसमोर स्पर्धा प्रचंड आहे. गुण, प्रवेश परीक्षा, नोकरी, कौशल्य विकास या सर्वांच्या दबावाखाली विद्यार्थी वाचनाला वेळेची चोरी मानू लागतो. "परीक्षेला येईल तेवढेच वाचा" ही मानसिकता वाढते. त्यामुळे अभ्यास हा केवळ यांत्रिक प्रक्रिया बनतो आणि शिक्षणाचा आनंद हरवतो. वाचन संस्कृती ही याच आनंदाशी जोडलेली असते.

वाचनाचे महत्त्व केवळ शैक्षणिक यशापुरते मर्यादित नाही. साहित्य वाचनाने भावनिक बुद्धिमत्ता वाढते, इतिहास वाचनाने सामाजिक भान येते, तत्त्वज्ञान वाचनाने जीवनाचा अर्थ शोधता येतो, आणि विज्ञान वाचनाने विवेक आणि तर्कशक्ती वाढते. त्यामुळे विद्यार्थी केवळ कुशल कर्मचारी न बनता संवेदनशील नागरिक बनतो.आज वाचनासमोर मोठे आव्हान म्हणजे विचलन (distraction). सतत येणाऱ्या नोटिफिकेशन्स, मेसेजेस, कॉल्स आणि अपडेट्स यामुळे विद्यार्थी मनाने कधीच पूर्णपणे एका गोष्टीत नसतो. त्यामुळे एकाग्रता तुटते आणि वाचन वरवरचे राहते. या पार्श्वभूमीवर वाचन म्हणजे ध्यानासारखी प्रक्रिया बनते मनाला स्थिर करण्याची.तरीही आजच्या काळात वाचनाच्या संधी पूर्वीपेक्षा अधिक आहेत. ई-बुक्स, ओपन ॲक्सेस जर्नल्स, ऑनलाइन लायब्ररी,

ऑडिओबुक्स, पॉडकास्ट्स या सर्वांनी वाचन लोकशाही बनवले आहे.

दूरच्या गावात बसलेला विद्यार्थीही जागतिक दर्जाच्या साहित्यापर्यंत पोहोचू शकतो. प्रश्न हा आहे की या साधनांचा वापर आपण कसा करतो.शिक्षणसंस्थांची भूमिका येथे अत्यंत महत्त्वाची आहे. जर शाळा आणि महाविद्यालयांनी वाचनाला गुणांशी नव्हे तर आनंदाशी जोडले, तर विद्यार्थ्यांमध्ये नैसर्गिक वाचनसंस्कृती निर्माण होईल. पुस्तक चर्चा, वाचन क्लब, लेखक भेटी, साहित्य संमेलन, वाचन दिन यांसारखे उपक्रम वाचनाला सामाजिक अनुभव बनवू शकतात.पालकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. मुलं जे पाहतात तेच शिकतात. घरात पालक वाचत असतील, पुस्तकांवर चर्चा करत असतील, तर मुलांमध्येही वाचनाची गोडी निर्माण होते.आजच्या विद्यार्थ्यांनी वाचनाकडे गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे वेळेची नव्हे तर आयुष्याची गुंतवणूक. वाचनाने मिळणारे भांडवल हे कधीच वाया जात नाही.

वाचन संस्कृती संपत नाही, ती रूपांतरित होत आहे. प्रश्न हा आहे की, आपण तिला उथळ बनवतो की सखोल बनवतो. आजचा विद्यार्थी जर डिजिटल साधनांचा विवेकाने वापर करून दर्जेदार वाचन करेल, तर तो केवळ यशस्वी नव्हे तर सुजाण, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनेल. म्हणूनच आजच्या काळात वाचन संस्कृती ही ऐच्छिक नसून अत्यावश्यक आहे.



वाचन संस्कृती : आजचा विद्यार्थी

# ◈ स्वामी विवेकानंद आणि आजचा विद्यार्थी ◈

- शुभम हांदे
प्रथम वर्ष, वाणिज्य

स्वामी विवेकानंद हे केवळ भारताचे महान संन्यासी, तत्त्वज्ञ किंवा वक्ते नव्हते, तर ते आधुनिक भारताच्या तरुणाईचे मानसिक शिल्पकार होते. त्यांनी भारतीय समाजाला आत्मविश्वास दिला, गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर काढले आणि विशेषतः तरुण पिढीला स्वतःच्या अंतःशक्तीची ओळख करून दिली. आजचा विद्यार्थी ज्या स्पर्धात्मक, तणावग्रस्त, अस्थिर आणि वेगाने बदलणाऱ्या जगात जगतो आहे, त्या जगात स्वामी विवेकानंदांचे विचार अधिकच समकालीन, अधिकच उपयुक्त आणि अधिकच मार्गदर्शक ठरतात.स्वामी विवेकानंदांचा सर्वात प्रसिद्ध संदेश होता - "उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका." हा संदेश आजच्या विद्यार्थ्यासाठी अत्यंत सुसंगत आहे. आजचा विद्यार्थी परीक्षांचा ताण, करिअरची अनिश्चितता, पालकांच्या अपेक्षा, समाजाची तुलना, सोशल मीडियावरील कृत्रिम परिपूर्णतेचे भास यांच्यात अडकलेला असतो.

त्यामुळे तो अनेकदा न्यूनगंड, भीती, आत्मशंका आणि मानसिक थकवा अनुभवतो. विवेकानंद मात्र विद्यार्थ्याला सांगतात - शक्ती बाहेर नाही, ती तुमच्यातच आहे. स्वतःवर विश्वास ठेवा.विवेकानंदांनी शिक्षणाला केवळ माहिती संकलन मानले नाही. त्यांच्यामते शिक्षण म्हणजे "आत दडलेली पूर्णता बाहेर आणणे." आजच्या शिक्षणपद्धतीत मात्र गुण, रँक, मार्कशीट आणि डिग्री यांवर अधिक भर आहे. त्यामुळे विद्यार्थी शिकतो खरा, पण घडत नाही. विवेकानंद सांगतात की, शिक्षणाने चरित्र निर्माण झाले पाहिजे, आत्मसंयम निर्माण झाला पाहिजे आणि सेवाभाव जागा झाला पाहिजे.

आजच्या विद्यार्थ्यांसमोर मानसिक आरोग्य हे मोठे आव्हान बनले आहे. चिंता, नैराश्य, असुरक्षितता, एकटेपणा, तुलना आणि अपयशाची भीती ही आजच्या विद्यार्थ्यांची रोजची वास्तव आहेत. विवेकानंदांनी मनावर नियंत्रण ठेवण्यावर भर दिला. त्यांनी ध्यान, आत्मचिंतन आणि मानसिक शिस्त यांना अत्यंत महत्त्व दिले. ते सांगतात की, ज्याने स्वतःचे मन जिंकले, त्याने जग जिंकले.

विवेकानंदांनी शारीरिक आरोग्यालाही महत्त्व दिले. त्यांनी सांगितले की सशक्त शरीरातच सशक्त मन वसते. आजचा विद्यार्थी दीर्घकाळ मोबाईल, लॅपटॉप आणि स्क्रीनसमोर बसतो. त्यामुळे शारीरिक हालचाल कमी होते आणि त्याचा मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होतो. विवेकानंदांचे शरीरसाधनेवरचे विचार आजच्या काळात अधिकच आवश्यक वाटतात.स्वामी विवेकानंदांचा राष्ट्रविचारही आजच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी भारताला दुर्बल, मागास किंवा हीन मानले नाही, तर महान सांस्कृतिक परंपरेचा वारसदार मानले. आजचा विद्यार्थी जागतिक नागरिक आहे, पण त्याच वेळी जबाबदार भारतीय नागरिक असणेही महत्त्वाचे आहे.

विवेकानंदांनी शिकवलेली देशसेवा आज सामाजिक सेवा, प्रामाणिकपणा, नैतिकता आणि सामाजिक संवेदनशीलतेच्या रूपात प्रकट होऊ शकते.विवेकानंदांनी स्त्रीशक्तीवर विशेष भर दिला. त्यांनी स्त्रीला समाजाच्या उन्नतीचे केंद्र मानले. आजच्या विद्यार्थिनींसाठी त्यांचे विचार आत्मविश्वास

देणारे आहेत आणि विद्यार्थ्यांसाठी स्त्री-पुरुष समतेचा आदर शिकवणारे आहेत.धर्माबाबत विवेकानंदांची भूमिका अत्यंत आधुनिक होती.  त्यांनी धर्माला कर्मकांडापुरता मर्यादित ठेवले नाही, तर तो मानवतेशी जोडला.  त्यांनी सर्व धर्मांचा आदर केला आणि सहिष्णुता, करुणा व विवेक हे धर्माचे खरे सार मानले.  आजच्या धार्मिक संघर्षांच्या पार्श्वभूमीवर हा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो.डिजिटल युगात माहिती भरपूर आहे, पण विवेक कमी पडतो. विवेकानंदांचा संदेश हा माहितीपासून ज्ञानाकडे आणि ज्ञानापासून प्रज्ञेकडे जाण्याचा आहे.  ते विद्यार्थ्याला सांगतात वाचा, शिका, पण स्वतःचा विवेक वापरा.  अंधानुकरण करू नका.विवेकानंदांचे संपूर्ण जीवन हे विद्यार्थ्यांसाठी एक जिवंत धडा आहे. गरीब घरातून आलेला, कठीण परिस्थितीत शिकलेला, परदेशात जाऊन भारताचा गौरव वाढवलेला हा युवक आजच्या विद्यार्थ्याला सांगतो की परिस्थिती मर्यादा नाही, ती संधी आहे.

निष्कर्षतः असे म्हणता येईल की, स्वामी विवेकानंद हे केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत, तर ते आजच्या विद्यार्थ्याचे समकालीन मार्गदर्शक आहेत.  त्यांच्या विचारांनी विद्यार्थी अधिक आत्मविश्वासी, अधिक संयमी, अधिक विवेकी, अधिक संवेदनशील आणि अधिक जबाबदार बनू शकतो. म्हणूनच “स्वामी विवेकानंद आणि आजचा विद्यार्थी” हा केवळ अभ्यासाचा विषय नसून जीवनाचा मार्ग आहे.




स्वामी विवेकानंद: आजचा विद्यार्थी

# ◈ आजची देशसेवा ◈

- निसर्गा धावडे
तृतीय वर्ष, वाणिज्य

देशसेवा - एक कृतज्ञतेचा अभिवादन
गीतेतून ज्ञान मिळाले,
रामायणातून राम मिळाले,
भाग्यातून हिंदू धर्म मिळाला,
नशिबातून हिंदुस्थान मिळाले.'

आपला भारत देश आज चंद्रावर पोहोचला आहे, सूर्याचा अभ्यास करू लागला आहे, बुलेट ट्रेनवरून प्रवास करू लागला आहे आणि समृद्धी महामार्गामुळे वेळही वाचू लागला आहे. जगात कुठेही जा - आपल्या देशाला सन्मान मिळू लागला आहे. भारत आज वेगळा इतिहास घडवत आहे. भारत हा संविधानावर चालणारा देश आहे आणि हे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले आहे, याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.भारतीय इतिहासात १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. त्या दिवशी भारत पारतंत्र्यातून स्वातंत्र्यात आला. मात्र हे स्वातंत्र्य सहज मिळाले नाही. त्या काळात किती आक्रोश झाला, किती रक्ताच्या नद्या वाहिल्या, किती निष्पाप जीव गेले - तेव्हा स्वातंत्र्याचा सूर्य उगवला. अनेक स्वातंत्र्यवीरांनी आपल्या निधड्या छातीवर गोळया झेलल्या; म्हणूनच आज आपण स्वाभिमानाने उभे आहोत.भारत ही प्राचीन सभ्यता, समृद्ध वारसा आणि गौरवशाली इतिहासाची भूमी आहे. ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने लोकशाही, विविधता, विकास, विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षण या क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे.

"स्वातंत्र्याचा ध्वज फडकतो,
सूर्य तळपतो प्रगतीचा,
भारतभूमीच्या पराक्रमाला,
आमचा मानाचा मुजरा."

आज भारतीय सैनिक देशाच्या सीमेवर रात्रंदिवस सज्ज आहेत. उष्णता, थंडी, पाऊस अशा कोणत्याही हवामानात ते आपले कर्तव्य पार पाडतात. सण-उत्सवाच्या वेळीही ते कुटुंबापासून दूर, देशाच्या रक्षणासाठी सज्ज असतात. त्यामुळे प्रत्येक सैनिक हा आपल्या देशाचा खरा हिरो आहे.आजची तरुण पिढी मोबाईल आणि सोशल मीडियात रमलेली दिसते; पण देशरक्षणाची भावना कमी होत चालली आहे, हे दुर्दैव आहे. देशात अनेक श्रीमंत लोक आहेत, पण देशाबद्दलची जाणीव आणि कृतज्ञता सर्वांमध्ये दिसून येत नाही. म्हणून प्रत्येक नागरिकाने मनात देशसेवेची भावना बाळगली पाहिजे.सैनिक आपल्याला देशभक्ती, शिस्त, त्याग आणि कर्तव्याची शिकवण देतो. म्हणून त्यांच्या सेवेबद्दल आपण नेहमी कृतज्ञ राहिले पाहिजे.

"सैनिक जागे आहेत,
म्हणूनच आपण निवांत आहोत."
'तिरंगा आमचा प्राण आहे,
भारताची शान आहे.'
"उत्सव तीन रंगांचा,
आभाळी आज सजला,
नतमस्तक मी त्या सर्वांना,
ज्यांनी भारत देश घडविला."

# ◈ पतसंस्थांचे संचालक आणि व्यवस्थापन ◈

- रजनी बाबशेट्ये
प्रथम वर्ष, वाणिज्य

पतसंस्थांच्या कामकाजात तीन मुख्य घटक असतात त्यापैकी संस्थेचे संचालक मंडळ हे अत्यंत महत्त्वाचे असतात. यालाच कार्यकारी व्यवस्थापन मंडळ किंवा एक्झिक्युटिव्ह मॅनेजमेंट असे म्हटले जाते. पतसंस्थेच्या व्यवस्थापनात या घटकांची भूमिका फार महत्त्वाची असते. संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे तसेच महाराष्ट्र सहकारी कायदा आणि संबंधित पतसंस्थेचे पोटनियम यांच्या आधारे दरपाच वर्षांनी सभासद आपले प्रतिनिधी निवडतात. या मंडळावर किती संचालक कोणत्या वर्गातून कसे निवडायचे ? त्यांची रचना कशी ? त्यांचे अधिकार काय ? संचालक म्हणून निवडून येण्यास व राहण्यास पात्रता काय ? यासर्व बाबी पोटनियमानुसार निश्चित केल्या जातात. पतसंस्था ठेवींचा आणि कर्जाचा व्यवहार करते हे व्यवहार कसे करायचे याचे धोरण संचालक मंडळ ठरवत असते आणि ते राबवून घेत असते. संचालक हे निवडून आलेले प्रतिनिधी असतात ते संस्थेच्या ठेवीदारांचे व सभासदांचे ही विश्वस्त असतात. या घटकांच्या आर्थिक हिताची जपणूक करणे हे संचालक मंडळाचे प्रमुख काम असते पतसंस्थांच्या ठेवींना सहकारी बँकां प्रमाणे ठेव विमा संरक्षण नसल्याने सभासदांनी ठेवलेल्या ठेवींची रक्कम त्यांना व्याजासह पूर्णपणे परत मिळेल याची काळजी त्यांना घ्यावी लागते. तरदुसऱ्या बाजूने सभासदांनी विकत घेतलेल्या व्याजाची रक्कम अबाधित राहील याची ही काळजी त्यांना घ्यावी लागते.

या सर्व कारणांमुळे संचालकाच्या पतसंस्थेच्या व्यवस्थापनातील सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. तो कमी चालणार नाही आणि जास्तही चालणार नाही पूर्णविराम व्यवस्थापनात व्यत्यय न आणता व्यवस्थापन चालवायचे संचालकांची भूमिका कायम असली पाहिजे. पतसंस्थांमध्ये व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून व्यवस्थापनातील विविध क्षेत्रात संचालकांचा सहभाग अपेक्षित असतो. यामध्ये संस्थेच्या आर्थिक नियोजन, मानवी संपत्ती विकास व्यवस्थापन, संस्थेचे दैनंदिन व्यवस्थापन, संस्थेचे कर्जव्य वस्थापन, संस्थेचे वसुली व्यवस्थापन, संस्थेमधील नियंत्रण व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रांमध्ये संचालकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. आर्थिक नियोजन म्हणजे पतसंस्थेच्या पैशाच्या व्यवहाराचे असेनियोजन की ज्यामुळे संस्थेला नफा होईल. यामध्ये निधी उभारणी, नीधी गुंतवणूक, उत्पन्नाची आखणी, खर्चाचे नियंत्रण, व्याजदराचे निश्चिती यामुद्द्यांच्या आधारे संचालकांना धोरण ठरवावे लागते. यासगळ्या आर्थिक नियोजनात प्रामुख्याने व्याज दरठरवणे हा महत्त्वाचा भाग आहे.

यासाठी संचालकांचा अभ्यास असणे आवश्यक आहे. यामध्येही महत्त्वाची बाब अशी आहे की, उपलब्धनिधीचा पुन्हा पुन्हा वापर कसा होईल याकडे संचालक मंडळ कसे लक्ष देते आणि वास्तवात काय करते, तसेच ठेवींची मुदत आणि कर्जाची मुदत याची सांगड कशी घालते, याबाबी महत्त्वाच्या ठरतात. त्याच प्रमाणे गुंतवणुकीची बाजारपेठ, सभासदांची कर्जाची गरज, उत्पादक विविध मार्ग, खर्चाचा प्राधान्य क्रम याकडे लक्ष देणे हा देखील संचालक सहभागाचा महत्त्वाचा मुद्दा आहे. आर्थिक नियोजनात संचालक मंडळ तयार करत असलेल्या अंदाजपत्रकला अनन्यसाधारण महत्व आहे. हे अंदाजपत्रक तयार करताना संचालक मंडळाने संस्थेच्या आर्थिक विकासाचा वेग, निधी उभारणीचा सरासरी व्याज दर, कर्जावर व गुंतवणुकीवर

मिळालेला सरासरी व्याज दर, द्यावा लागणारा व्याज दर व मिळणारा व्याजदर यातील निश्चित फरक राखण्यासाठी योजना, नफा क्षमता आणि उत्पादकता याबाबींचा विचार करणे आवश्यक असते. संचालकांच्या दृष्टिकोनातून मानवी संपत्तीच्या विकासाचा विचार हा प्रामुख्याने संस्थेमध्ये कामकरणाऱ्या सेवकाच्या संदर्भात आहे. पतसंस्थेमध्ये असणारे आणि येणारे सेवक ही केवळ दोन हात, दोन पायव एक डोके असलेली माणसे नसून ती मानवी संपत्ती आहे, ते विविध बाबींचे साठे आहेत. ते संस्थेचा ग्राहक आणि व्यवस्थापकीय मंडळयांच्यातील दुवा साधणारा महत्त्वाचा घटक आहे आणि त्यांचा उपयोग संस्था विकासासाठी करून घ्यावयाचा यासाठी या व्यवस्थापनात संचालकांचा सहभाग मोठा आणि महत्त्वपूर्ण असतो. या व्यवस्थापनात सेवकांची आर्थिक बाजू, सेवकांची मानसिक बाजू आणि सेवकांच्या विकासाची बाजू संचालकांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. संस्थेला सहज शक्य होईल अशी वेतन श्रेणी, सेवकांना त्रासदायक होणार नाहीत पण शिस्तीला आवश्यक अशा सेवाशर्ती, भरती आणि पदोन्नती यात अन्याय होणार नाही असे वातावरण याकडे संचालकांनी लक्ष देणे आवश्यक आहे. सेवक आपल्या संस्थेत स्थिरावला पाहिजे, विकसित झाला पाहिजे आणि बाहेर गेलाच तर समाधान पाहिजे या व्यवस्थापनातील बाजू आहे. सेवकांची मानसिकता विचलित होणार नाही असे वातावरण, वर्तन आवश्यक आहे. ही मानसिकता संस्थाभिमुख व्हावी ही या व्यवस्थापनाची फलश्रुती आहे.

यासाठी बौद्धिक विकास आवश्यक आहे. बौद्धिकता आणि मानसिकता यासाठी संचालक मंडळाने प्रशिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत यासाठी संचालक मंडळाने या विषयासंबंधीची धोरणे तयार करून त्यानुसार काम करणे आणि त्यात व्यक्तीशः रस घेणे आवश्यक असते. आपल्या पतसंस्थेत या व्यवस्थापनाची आवश्यकता यासाठीच आहे की, पतसंस्थेमध्ये माणूस आणि पैसा हे दोन्ही मोहाचे अनाकलनीय घटक आहेत. संस्थेतील सुयोग्य आणि यशस्वी व्यवस्थापनासाठी संचालकांनी याचा विचार करणे आवश्यक आहे. या सहभागामुळे व्यवस्थापनातील गुणवत्ता वाढण्यासाठी मदत झाली पाहिजे, यातून अंतर्गत संबंध चांगले झाले पाहिजेत. स्पर्धेच्या युगात आता मानवी संपत्तीच्या विकासाकडे लक्ष देण्याची आवश्यकता अधिक निर्माण झाली आहे. यास्पर्धेत संस्था टिकवायचे असेल, वाढवायचे असेल, सक्षम करायचे असेल तर मानवी संपत्तीची गुणात्मक वाढ व तिचा पर्याप्त उपयोग याकडे लक्ष देणे अत्यंत महत्त्वाचे असते.

संस्थेचे दैनंदिन व्यवस्थापनात संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आपल्या विविध पातळीवरील सहकाऱ्यांच्या मदतीने विविध जबाबदाऱ्या पार पाडत असतात. त्यामध्ये सभाव्य वस्थापन, हिशेब व्यवस्थापन, पूर्तता व्यवस्थापन, ग्राहक सेवा, निधी व्यवस्थापन अशा विविध बाबींचा समावेश यामध्ये असतो. विविध विभागातील दैनंदिन कामे वेळेत, अचूक होत आहेत यासाठी हस्तक्षेप न करता नजर ठेवणे, मार्गदर्शन करणे एवढ्या पुरता संचालकांचा सहभाग अपेक्षित असतो. या साऱ्यांचा प्रमुख हा संस्थेचा मुख्य व्यवस्थापक असतो त्याला यासाठी वादातील स्वातंत्र्य देणे हे संचालक मंडळाचे प्रथम कर्तव्य आहे. व्यवस्थापनाची शिस्त बिघडू नये म्हणून हस्तक्षेपाचा मोह टाळणे हीच खरी संचालकांची महत्त्वाची भूमिका असते. पतसंस्थेचा मुख्य व्यवहार संस्थेला वर नेणारा अथवा संस्थेला मारक ठरणारा हा कर्जव्यवहारच असतो. पोटनियम आणि सहकारी कायदायामध्ये या संदर्भातले अंतिम अधिकार हे संचालक मंडळाला असणे या व्यवहारात त्यांचा सहभाग हा नेहमीच चिंतेचा आणि काळजीचा विषय आहे. अधिकार आहेत म्हणून कसे ही कर्ज वाटप केले तर तो चुकीचा सहभाग ठरू शकतो. या पतसंस्थेचा व्यवहार हा अधिक सुरक्षित अधिक शास्त्रीय तत्वावर आधारलेला, अधिकाधिक

गरजाभिमुख आणि योग्य कर्जदाराशी कसा होईल, यासाठीच या क्षेत्रात संचालकांचा सहभाग अपेक्षित आहे. त्यांनी प्रीती पेक्षा रीती आणि नितीचे पालन करणे गरजेचे असते. संचालक मंडळाने कर्ज धोरण आणि कर्ज नियम तयार करणे हे करत असताना पोट नियमातील तरतुदींचे भान ठेवणे आणि त्यानुसार मंजुरी देणे महत्त्वाचे असते. कर्जमंजुरी बाबत निर्णय घेताना कर्ज विभाग प्रमुखाचे मत, अभिप्राय काय आहे, त्यांना काय वाटते त्यांनी मंजुरीबाबत केलेली शिफारस, मंजुरीच्या अटीअडचणी याबाबत विचार केला पाहिजे. कर्ज व्यवहाराबाबतचा सहभाग कर्जमंजुरी पुरताच मर्यादित राहावा. मंजुरी झाल्यानंतर वाटपासाठीची कागदपत्रे आणि घ्यावयाची काळजी, नंतरची देखरेख यामध्ये हस्तक्षेप वाढेल इतका सहभाग घेऊ नये. कर्ज व्यवहार वाढवण्यासाठी कर्जाच्या विविध योजना आखण्यासाठी, नवीन कर्ज व्यवसाय शोधून काढण्यासाठी संचालकांच्या सहभागाची गरज असते. कारण ते समाजात असतात समाजाची नाडी ओळखणारे असतात त्यांच्या व्यावसायिक ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा त्यांनी संस्थेस द्यावा हा मोठा सहभाग त्यांच्याकडून अपेक्षित असतो. सर्वसाधारणपणे पतसंस्था कर्जमंजूर करताना तो कर्जदार कोणत्या ना कोणत्या संचालकाच्या संपर्कातील असतो. अशा वेळी कोणत्याही कारणाने कर्जदार थकबाकीत गेला तर तो याबाबत त्या संचालकाशी अधिक मनमोकळेपणाने बोलू शकतो. संचालकाच्या वसुलीतील सहभाग इथूनच सुरू होतो. थकबाकी भरावयास त्याला प्रवृत्त करणे, त्याच्या अडचणी ओळखून घेणे याबाबी संचालकांकडून अपेक्षित असतात. अशा प्रकारे सामोपचाराने प्रयत्न करूनही वसुली होऊ शकली नाही, तर कार्यालयाने शिफारस केलेल्या कायदेशीर कारवाईस मान्यता देणे हेही कामसं चालकाचे आहे तसेच एकदा कायदेशीर कारवाई सुरू झाल्यावर त्यात कोणताही हस्तक्षेप करायचा नाही हे पथ्य संचालकांनी पाळणे हा ही कर्जवसुलीत त्यांचा मोठा सहभाग अपेक्षित असतो.

अशा प्रकारे पतसंस्थेच्या व्यवस्थापनासाठी संचालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची असते. त्यापदावर काम करणार्या व्यक्तीने आपली जबाबदारी चोखपणे बजावली तर व्यवस्थापन हे यशस्वीपणे नक्कीच पार पडू शकते. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची बाधा निर्माण होऊ शकणार नाही त्याचप्रकारे भ्रष्टाचाराला आळा बसू शकतो.

# ◈ सोने भारतासाठी एक नवी गुंतवणूक आणि कर्ज व्यवसायासाठी सुवर्णसंधी ◈

- साहिल नार्वेकर
द्वितीय वर्ष, वाणिज्य

आपण या लेखात एकारोचक विषयावर मंथन करणार आहोत.सोने आणि भारताची अर्थव्यवस्था आपल्याला माहित आहे का, की भारतातील घराघरात साठवलेले सोने हे एक प्रकारचे परकीय गुंतवणुकीसारखे काम करू शकते. हे कसे ते सोप्या भाषेत समजावून घेऊ. १९९१ मध्ये भारताला मोठे परकीय चलन संकट आले होते.तेव्हा पासून एफडीआय म्हणजे परकीय गुंतवणूक हा शब्द सर्वसामान्यांच्या ओळखीचा झाला. एफ डी आय चेमुख्य काम म्हणजे अर्थव्यवस्थेला पैसा आणि स्थिरता देणे.हे गुंतवणूकदार बाहेरून पैसे आणतात, तंत्रज्ञान देतात आणि अर्थव्यवस्थेला मजबूत करतात. गेल्या दहा वर्षात एफडीआयने सुमारे ४०० अब्जडॉलर्स आणले.पण आता प्रश्न असा आहे की हेकाम सोने करू शकते का ?

भारत जगातील सर्वात मोठा सोन्याचा साठा असलेला देश आहे. २०१९ मध्येवर्ल्ड गोल्ड कौन्सिलने सांगितले की, भारतीय घरांमध्ये सुमारे २५००० टन सोने आहे हे मूल्य सुमारे ३.२ ट्रिलियन डॉलर्स इतके आहे. म्हणजेच भारताच्या एकूण जी.डी.पी. च्या ७५ टक्के इतके हे सोने १० मोठ्या केंद्रीय बँकांच्या एकत्रित सोन्यापेक्षा जास्त आहे. हे सोने जर अर्थव्यवस्थेत योग्य वापरले तर ते एफडीआय सारखे काम करेल आणि तेही घरगुती ! गेल्या दहा वर्षात भारताने ४५० ते ५०० अब्ज डॉलर्सचे सोने खरेदी केले होते.हे आयात व्यापारातील तूट वाढवते. एकूण व्यापार दरवर्षी ३५ ते ५५ अब्ज डॉलरचे सोने खरेदी करते.हे आयात व्यापारातील तूट वाढवते एकूण व्यापार तूट सतराशे अब्ज डॉलर्स आहे, पण सोने वगळता ती १३०० अब्ज इतकी कमी होईल. म्हणजे सोने आयात हे मोठे कारण आहे पण हे सोने घरात साठवले जाते उत्पादक कामात सोन्याचे अधिकृत निर्यात दहा ते पंधरा अब्ज डॉलर्स आहे. पण अधिकृत पन्नास ते शंभर आमचे इतके असू शकते. तरीही नेट नुकसान राहते. एफ.डी.आय. मधून पैसे येतात पण ते परतही जातात. २०२५ मध्ये गुंतवणूकदारांनी शंभर अब्ज डॉलर्स नफा परत पाठवला सोन्याचा फायदा हा आहे की, ते देशात राहते परत जात नाही. भारताच्या परकीय राखीव निधीमध्ये सोन्याचा दहा टक्के हिस्सा आहे. गेल्या दहा वर्षात सोन्याने बारा टक्के पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न दिले.आणि ते अमेरिकन ट्रेझरी पेक्षा जास्त आहे. म्हणजे सोने ही चांगली गुंतवणूक आहे.आता वेळ आली आहे की, घरातील सोन्याला उत्पादक बनवायचे. सरकारने अशा प्रकारची धोरणे आणावीत की ज्यामुळे हे सोने अर्थव्यवस्थेत येईल जसे की, सोन्यावर आधारित कर्ज किंवा गुंतवणूक योजना हे घरगुती एफ. डी. आय. सारखे असेल. त्यामुळे बाहेरील अवलंबन कमी होईल आणि अर्थव्यवस्था मजबूत होईल. सोन्याला फक्त दागिने म्हणून न पाहता एक मोठी ताकद म्हणून वापरणे गरजेचे आहे. सोने आपल्याला कसे उपयोगी पडू शकते? आपण सहकारी बँका आणि सोने तारण कर्ज व्यवसायातील भविष्यातील संधी याबाबत सविस्तर अभ्यास करणे गरजेचे आहे. भारतातील घराघरात साठवलेले सोने हे केवळ दागिने नव्हे तर एक मोठी आर्थिक ताकद म्हणून त्याकडे पाहणे खूप गरजेचे आहे. भारतातील सोने तारण कर्ज बाजार वेगाने वाढतो आहे. २०२५ मध्ये हा बाजार सुमारे ८०.२९ अब्ज डॉलर्स इतका आहे आणि २०३१ पर्यंत १५७.६० अब्जडॉलर्स पर्यंत

पोहोचेल असा अंदाज आहे.हे वार्षिक ११.९० टक्के दराने वाढेल. मार्च २०२५ पर्यंत बँकांचे गोल्ड लोन पोर्ट फोलिओ ०२,०८,७३५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला.

सहकारी बँकांसाठी हे बाजार विशेष महत्त्वाचे आहेत. शेतकरी आणि छोटे व्यावसायिक सोने तारणावर कर्ज घेतात जेणेकरून जास्तीत जास्तग्राहक सहज उपलब्ध होतात. सहकारी बँका शेती, छोटे उद्योग आणि ग्रामीण विकासासाठी गोल्ड लोन देतात. आर.बी.आय. ने २०२५ मध्ये नवीन नियम आणले ज्यामध्ये सोने आणि चांदीचे दागिने शेती आणि छोट्या व्यवसाय करण्यासाठी तारण म्हणून स्वीकारले जाऊ लागले. बुलेट पेमेंट (एकदाच परतफेड), कर्जाचा प्रकार जो सहकारी बँकांसाठी फायदेशीर आहे यामुळे शेतकऱ्यांना शेती, यंत्रे, सिंचन किंवा बागायतीसाठी पैसे मिळण्याची सोय उपलब्ध झाली. सोने आयात व्यापार तुट वाढवते पण घरातील सोने उत्पादक बनवले तर अर्थव्यवस्था मजबूत होते. सहकारी बँका यासोने तारण घेऊन कर्ज देतात त्यामुळे लोकांना व्यवसाय वाढवण्यासाठी मुक्त व्यासपीठ उपलब्ध होते. म्हणून सोन्याकडे केवळ चैनीची वस्तू म्हणून न पाहता त्याकडे मोठी गुंतवणूक म्हणून पाहणे खूप गरजेचे आहे.




सोने: गुंतवणूक व व्यवसाय

# ◈ सहकारी संस्था आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ◈

- तन्वी शिर्के

तृतीय वर्ष, वाणिज्य

भीमा ए. आय. मुळे बँकांच्या कार्यक्षमतेत मोठ्या प्रमाणावर वाढ होऊ लागली आहे. डाटा एन्ट्रीचे नियमित काम तसेच फसवेगिरीपासून तात्काळ संरक्षण करणे यामुळे शक्य झाले आहे. त्यामुळे बँकांच्या प्रशासकीय खर्चात बचत होऊ शकते. ए. आय. संचलित चॅटबॉक्स २४ तास ग्राहकांना सेवा देऊ शकतो. बँकांच्या ग्राहकांना तपशील वा डेटा उपलब्ध असल्यामुळे अनुचित व्यवहार तात्काळ लक्षात येऊ शकतात. बँकेसाठी आणि बँकेच्या ग्राहकांसाठी तयार केलेल्या अल्गोरीदमयासाठी उपयुक्त ठरते. पतमानांकन करणे, शेअर बाजार अशी संबंधित व्यवहार करणे, गुंतवणूक सल्ला देणे इत्यादी बाबत मदत करू शकते. बँकेची ही सेवा ग्राहकांना उपयुक्त आहे हे ग्राहकांच्या मतांवरून गुणांकन पद्धतीवरून सांगू शकते. थोडक्यात बँकेच्या कामकाजात सुव्यवस्था आणणे धोका कमी करणे, उपयुक्त सेवांबद्दल बँकांना माहिती देणे या प्रकारचे काम ए. आय. करू शकते. बँकिंग क्षेत्र हे सर्वसामान्यांच्या आर्थिक गरजांशी निगडित क्षेत्र आहे. ही एक स्वतंत्र अर्थव्यवस्था आहे. सामान्य माणसाच्या विकासाच्या कल्याणाचा यातून प्रामुख्याने विचार केलेला आहे.

अर्थव्यवस्थेत आर्थिक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असते यासाठी बँकांचे व्यवस्थापन गतिमान असण्या बरोबरच कामकाजात पारदर्शकता असणे गरजेचे आहे. आर्थिक सुव्यवस्था ही सर्वसामान्यांबरोबरच देशाच्या विकासात मोलाचा हातभार लावत आहे. बेकिंग क्षेत्राबरोबर कृषी क्षेत्र, लघुउद्योग, छोटे व्यापारी अशा अनेकांचे नाते आहे. म्हणून चबँकिंग क्षेत्राविषयी समाजात आदराची भावना निर्माण झाली आहे.

कॉर्पोरेट जगतात बँकिंग क्षेत्रात फार मोठे व्यावसायिक परिवर्तन घडून आले आहे. आधुनिक बँकिंग तंत्रज्ञानामुळे आता वित्तीय व्यवसायाचे सारे स्वरूप बदलले आहे. व्यवसायातील धोके लक्षात घेऊन बँकांनी माहिती व तंत्रज्ञान आधारित धोका व्यवस्थापन पद्धती अमलात आणली आहे. यात सहकारी बँकांनी आपल्या व्यवसायात व्यवस्थापन प्रणालीत अमुलाग्र बदल केलेले दिसून येत आहेत. दर्जात्मक बँकिंग सेवा, ए. टी. एम. सेवा, टेली बँकिंग सेवा, इंटरनेट बँकिंग, कोअर बँकिंग, मोबाईल बँकिंग आधी सेवा देण्यात सहकारी बँका आग्रेसर आहेत. कोअर बँकिंग पद्धतीमुळे बँकांच्या शाखांचे जाळे अधिक विस्तृत कार्यक्षम झालेली दिसून येते. सहकारी संस्थांचे वेगाने परिवर्तन होत असल्याचे दिसून येत आहे. ए. आय. हे जगभरातील प्रसिद्ध असलेली टेक्नॉलॉजी आहे. म्हणजे मानवी बुद्धिमत्तेसारखे शिकण्याची क्षमता मशीनमध्ये आणि त्या मशीनमधल्या सॉफ्टवेअर प्रोग्राममध्ये तयार करण्यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान होय. आर्टिफिशियल इंटेलिजन्सला मराठीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता असे म्हणतात. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा विविध क्षेत्रात वापर केला जातो.

जॉन मॅकार्थी यांनी १९५६ साली आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा शोध लावला. तसेच भविष्यात या तंत्रज्ञानाचा बोलबाला असणार आहे. भविष्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे तंत्रज्ञान

मानवी जीवनाचा एक हिस्सा बनणार आहे. छोट्या-छोट्या कामात या तंत्रज्ञानाचा वापर होऊ शकतो तसेच आगामी काळात माहिती तंत्रज्ञाना प्रमाणेच हे आहे हा मानवी जीवनाचा एक भाग बदलेला आहे. मशीन लर्निंग हा सुद्धा आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा महत्त्वाचा भाग आहे. ज्या मध्ये एआय वर आधारित मशीन जुना डेटा एकत्रित करणे त्यामध्ये संपूर्ण माहिती जाणून घेते आणि त्या मध्ये सूचनेनुसार बदल करते. सध्या अनेक मोठ्या आणि लोकप्रिय कंपन्या आर्टिफिशियल तंत्रज्ञानाचा उपयोग करत आहेत. याचा उपयोग त्याच्या प्रगतीसाठी करून ते त्यांची कंपनी मजबूत बनवत आहेत. जग भरात आर्टिफिशल इंटेलिजन्स रिसर्च सेंटर उपलब्ध आहेत. आर्टिफिशल इंटेलिजेशन माहितीने मशीन कम्प्युटर आणि यंत्र बनवून भविष्यात महत्त्वाची कामे करण्यासाठी मानवविरहित यंत्रांचा वापर केला जाऊ शकतो. म्हणजेच कोणतेही कठीण काम एका बुद्धिमान मशीन मार्फत घेतले जाऊ शकते. कोरोना कालावधी नंतर मनुष्यबळा- ऐवजी आर्टिफिकेशन्स वरील अवलंबित्व वाढले आहे.

अभियांत्रिकी क्षेत्राच्या तुलनेत यामध्ये कमी स्पर्धा आहे. आगामी काळात आयटी, फायनान्स सिक्युरिटी डेटा कलेक्शन यांसह अनेक ठिकाणी नोकरीच्या संधी वाढणार आहेत. एआय तंत्रज्ञानाचा वापर जगभरातील अनेक वित्तीय संस्थांकडून सुरू झालेल्या आहेत. नॅशनल बिझनेस रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्या पाहणी अहवालानुसार जगभरातील ३२% वित्तीय संस्थांनी या तंत्रज्ञानाचा स्वीकार केलेला आहे. बँकांच्या दैनंदिन कामकाजात पारदर्शकता, गतिमानता आणि सुरक्षितता यासाठी ए.आय. चा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. ए.आय. मुळे बँकांच्या कार्यक्षमतेत मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते. यामुळे डाटा एन्ट्रीचे नियमित काम तसेच फसवेगिरी पासून तात्काळ संरक्षण मिळू शकते. त्यामुळे बँकांच्या प्रशासकीय खर्चात बचत होऊ शकते. ए.आय. संचलित चॅटबॉक्स २४ तास सेवा देऊ शकतो. बँकांच्या ग्राहकांना तपशीलवार डेटा उपलब्ध असल्यामुळे अनुचित व्यवहार तत्काळ लक्षात येऊ शकतात. सहकारी संस्थांच्या प्रगतीमध्ये एआय ने खूप महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

१) एआयचे सहभागात्मक उपयोग - एआय सदस्यांचा मोठ्या प्रमाणातील डेटा विश्लेषित करून नमुने, प्रवृत्ती आणि सुधारणा करण्याचे संधी शोधू शकते. सहकारी संस्थांना संसाधनांचे वाटप, कार्यक्रमांची निर्मिती आणि आर्थिक धोरणाबाबत अधिक महत्त्वपूर्ण माहिती घेण्यास सक्षम करते. उदाहरणार्थ, एआय सदस्यांच्या गरजांचा अंदाज लावू शकते. सेवा वितरण अधिक कार्यक्षम करू शकते आणि सदस्यांचा अनुभव वैयक्तिकृत करू शकते.

२) कार्यक्षमतेत वाढ - एआय पुनरावृत्ती होण्याचे कार्य स्वयंचलित करू शकते, ज्या मुळे मानवी कर्मचारी अधिक धोरणात्मक कामावर लक्षकेंद्रित करू शकतात. यामुळे खर्चात बचत, उत्पादन क्षमतेत वाढ आणि ग्राहक सेवेतील सुधारणा होऊ शकते. या आधारित साधने पुरवठा साखळी अनुकूल करण्यात साठा व्यवस्थापनात आणि कार्यप्रदर्शन देखरेखित मदत करू शकतात.

३) मानवी सहकार्य सुलभ करणे -एआय सदस्यांमध्ये विश्वास आणि समज निर्माण करण्यासाठी वापरले जाऊ शकते, जे सहकारी आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेचा प्रसार करते. एआय आधारित साधने संवाद, माहिती वाटप आणि सामूहिक निर्णय घेण्यास मदत करू शकतात. हे गुंतागुंतीच्या सहकारी रचनेतील अडचणी सोडवण्यास आणि समुदाय भावना वाढवण्यास अधिक मदत करू शकते.

४) क्रेडिट जोखीम व्यवस्थापन - एआय मॉडेल्स कर्ज देणे योग्यता अधिक अचूकपणे मूल्यांकित करतात.

त्यामुळे खराब कर्जाचा धोका कमी होतो आणि कर्ज पोर्टफोलीओचे ऑप्टिमायझेशन होते.

५) अनुपालन - ए.आय. बँकांना गुंतागुंतीच्या नियमाचे पालन करण्यास मदत करते, ज्यामुळे कायदेशीर निकष पूर्ण होतात.

६) वैयक्तिक सेवा - ए. आय. ग्राहकांचे वर्तन आणि पसंतीयांचे विश्लेषण करून त्यांना योग्य वित्तीय उत्पादने, सेवा आणि शिफारशी देते, ज्यामुळे ग्राहकांचा सहभाग अधिक वाढतो.

७) ऑपरेशनल कार्यक्षमता - ए. आय. डेटा एन्ट्री, डॉक्युमेंट प्रोसेस यांसारख्या नियमित कामांचे स्वयंचलन करते. ज्यामुळे कार्य प्रवाह सुलभ होतो आणि खर्च कमी होतो.

८) गुंतवणूक व्यवस्थापन - ए. आय. बँकांना गुंतवणुकीच्या रणनीती अधिक प्रभावीपणे ठरवण्यास, व्यवहार निर्णय अधिक चांगल्या प्रकारे घेण्यास आणि पोर्टफोलिओ व्यवस्थापनासाठी मदत करते.

९) जोखीम व्यवस्थापन - विविध प्रकारच्या जोखीम (क्रेडिट जोखीम, ऑपरेशनल जोखीम, मार्केट जोखीम) ओळखण्यास आणि कमी करण्यास मदत करते.

१०) ग्राहक संबंध व्यवस्थापन - ग्राहकांच्या गरजा अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास, संवाद सुधारण्यास आणि मजबूत नाते निर्माण करण्यास एआय मदत करते. या सर्व सहभागात्मक बाबींचा वेध घेता भविष्यात सहकारी संस्थांमध्ये याचे सार्वत्रिकरण मूलभूत गरज असणार आहे. सहकारी संस्थांचा शाखा विस्तार कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीने उपयुक्त बनेल. सहकाराचे सहकार, सहभाग, विकास हे धोरण तळागाळा पर्यंत पोहोचण्यास कृत्रिम बुद्धिमत्ता खूप महत्त्वाची भूमिका निभावणार आहे.

अशा प्रकारे कृत्रिम बुद्धिमत्तेचे हे युग सर्वच क्षेत्रांमध्ये भविष्यकाळात स्वतःचे अस्तित्व निर्माण करत असताना दिसून येत आहे.

आपली ओळख आपली सुरक्षितता - KYC आणि AML चे महत्त्व:

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या काळात व्यवसायामध्ये कोणाशी व्यवहार केला जात आहे हे जाणून घेणे अत्यावश्यक झाले आहे. यामुळे फसवणूक, मनीलॉंडरिंग आणि दहशतवाद वित्तपुरवठा यांसारख्या संभाव्य धोक्यांपासून संरक्षण मिळते. आजच्या डिजिटल युगात व्यवसायातील सर्वात महत्त्वाचे चलन म्हणजे 'विश्वास' हेच आहे. कारण आर्थिक संस्थेत जर पाया मजबूत ठेवायचा असेल तर पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकाशी प्रामाणिक नाते ही महत्त्वाची भूमिका आहे आणि यात KYC ही अतिशय महत्त्वाची भूमिका बजावते. आर्थिक संस्थेत KYC म्हणजे फक्त ग्राहक ओळख नाही तर तो व्यावहारिक दृष्ट्या प्रामाणिक आहे का? हे तपासणी आणि आर्थिक जोखीम टाळणे हा मुख्य हेतू आहे.

व्यवसाय आपला ग्राहक ओळखा ही संकल्पना नेहमीच महत्त्वाची राहिली आहे. केवायसी पद्धतीची सुरुवात १९७० साली अमेरिकेतील Bank Secrecy Act ( BSA ) या कायद्यान्वये झाली. नंतर पुढे Anti - Money Laundering ( AML ) नियम आले. ज्यात ग्राहकाची ओळख पडताळणी अनिवार्य करण्यात आली. पुढे १९७० आणि १९८० च्या दशकात माफिया, ड्रग, तस्करी आणि आर्थिक गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याने अधिक कडक नियम लागू केलेगे ले. १९८९ झाली पॅरिस येथे झालेल्या G7 शिखर परिषदेत Financial Action Task Force ( FATF ) या आंतर राष्ट्रीय संस्थेची स्थापना करण्यात आली. ही संस्था मनी लॉंडरिंग, दहशतवाद, वित्तपुरवठा आणि आर्थिक गुन्ह्यांविरुद्ध जागतिक स्तरावर लढण्याच्या उद्देशाने स्थापन झाली. या संस्थेने ४० शिफारशी जारी केले आहेत ज्या जागतिक स्तरावर मानक म्हणून मानले जातात. या

शिफारशींमध्ये तीन प्रमुख घटक होते. ग्राहक ओळख, ग्राहक दक्षता आणि सतत निरीक्षण. यानंतर पुढे १९९० च्या दशकात सुरुवातीला पहिल्यांदा Bank Of England ने KYC ची मार्गदर्शक तत्वे सादर केली ज्यामध्ये ग्राहकांची अचूक पडताळणी, माहिती संकलन, व्यवहारांचे निरीक्षण यावर अधिक भर देण्यात आला. ११ सप्टेंबर २००१ मध्ये अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेने USA PATRIOT ACT लागू केला. या कायद्यानुसार प्रत्येक आर्थिक व्यस्थेला कस्टमर आयडेंटिफिकेशन प्रोग्राम (CIP) लागू करणे बंधनकारक झाले आहे त्यामुळे ग्राहकांची ओळख आणि व्यवहार अधिक काटेकोरपणे तपासले जाऊ लागले. भारतानेही २००२ मध्ये संसदेत प्रिव्हेन्शन मनीलॉडरिंग ऍक्ट ( PMLA ) मंजूर केला आणि २०२५ मध्ये सदर कायदा लागू केला. पुढे २०१२, २०१५, २०१९, २०२३ मध्ये सदर कायद्यात दुरुस्ती करून हा कायदा अधिक कठोर व व्यापक करण्यात आला. भारतात २००० च्या दशकात इंटरनेट आणि डिजिटल साधनांच्या वापरामुळे केवायसी प्रक्रियेत क्रांती झाली. डिजिटल व्हेरिफिकेशन तसेच आज अनेक संस्था आर्टिफिशलइंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग वापरून मोठ्या प्रमाणात ग्राहक डेटा व विश्लेषण करतात ज्याद्वारे फसवणूक टाळण्यात येते. या सर्व तंत्रज्ञानामुळे केवायसी प्रणाली अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक बनत आहे. केवायसी हे आर्थिक संस्था सुदृढ आणि पारदर्शक बँकिंग व्यवस्थेचा मुख्य भाग आहे. आजच्या डिजिटल आणि आर्थिक जगात ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी शिक्षण आणि जागरूकता अत्यंत महत्त्वाची आहे. यासाठी बँक व ग्राहक यांनी KYC, AML आणि CFT जाणून घेणे फार महत्त्वाचे आहे.

KYC चा अर्थ आपल्या ग्राहकाला ओळखत आहे. याचा मुख्य उद्देश ग्राहकाची ओळख, पत्ता आणि व्यवहारांचे स्वरूप यांची खात्री करणे आहे. केवायसी प्रक्रियेमुळे संस्थेला खात्री होती, ग्राहकाचे खाते वैध आहे. ग्राहकाचा आर्थिक व्यवहार प्रामाणिक आहे आणि संस्थेचा वापर कोणत्याही आर्थिक गैरव्यवहारासाठी होत नाही. केवायसीमध्ये ग्राहक स्वीकारण्याचे धोरण, ग्राहक ओळखण्याची प्रक्रिया, जखमीचे व्यवस्थापन आणि व्यवहारांचे निरीक्षण, ग्राहक पडताळणीत सतत निरीक्षणे घटक प्रामुख्याने दिलेले आहेत त्यांचे पालन आर्थिक संस्था यांना बंधनकारक केलेले आहे.

AML म्हणजे अँटी मनीलॉन्ड्री याचा अर्थ गुन्हेगारी मार्गाने आलेला पैसा बेकायदेशीररीत्या व्यवहारात आणण्यापासून रोखणे असा होतो. यामध्ये अशा व्यवहारांवर लक्ष ठेवणे हे संशयास्पद किंवा अवैध आर्थिक व्यवहारांशी संबंधित असू शकतात आणि संबंधित नियम प्राधिकरणांना संशयास्पद व्यवहार अहवाल देणे हा आहे. CFT म्हणजे combating the Financing of Terrorism आहे याचा अर्थ दहशतवादासाठी पैसा पुरवण्यावर नियंत्रण ठेवणे यामध्ये जर कोणी एखाद्या खात्यातून दहशतवादी गटाला पैसे पाठवले तर बँक असे व्यवहार ओळखून ते थांबवणे. त्याच प्रमाणे ( Unlawful Activity Prevention Act, 1967) UAPA हा देशाच्या एकात्मतेला, सुरक्षित तेला किंवा शांततेला धोका निर्माण करणाऱ्या बेकायदेशीर कृतींना थांबवण्यासाठी तयार केलेला कायदा आहे. त्या अनुषंगाने खातेदार ओळख अतिशय महत्त्वाची आहे. दहशतवादी संघटना किंवा व्यक्ती आढळल्यास त्यांना आर्थिक सेवा देणे हा गुन्हा ठरतो. हे कायदेशीर कृती प्रतिबंध अधिनियम १९६९ च्या ५ अ अंतर्गत बेकायदेशीर कृती करणाऱ्या त्या व्यक्ती किंवा संस्था यांना लाभ घेण्यासाठी निधी, आर्थिक मालमत्ता किंवा आर्थिक स्त्रोत संबंधित सेवा उपलब्ध करून देणे वर प्रतिबंध आहे. केंद्र सरकार लाया कलमानुसार निधी, संपत्ती किंवा खाते फ्रिज करण्याचा अधिकार आहे. तसेच वस्तु- मान विनाशकारी शस्त्रे आणि त्यांची वितरण प्रणाली बेकायदेशीर प्रतिबंधक कायदा हा २००५ मध्ये भारत सरकारने तयार केला आहे.

त्यामध्ये अणवस्त्रे, रासायनिकअस्त्र, मान जीवशास्त्रीय अस्त्रअशाजन संहार कअस्त्रांचा आणि त्यांची वितरण प्रणाली, अवैध वापर, उत्पादन, साठवण हस्तांतरण किंवा विक्री यांना थांबवण्यासाठी आहे. त्या अनुषंगाने कोणत्याही आर्थिक संस्थांना आर्थिक मदत देऊ नये यासाठी संशयास्पद व्यवहार होत असल्यास त्यांची माहिती नोंदवली जाऊश कते. त्यामुळे आर्थिक बँकांनी खात्यांचे व्यवहार तपासणी करूनच करणे गरजेचे आहे. समाजात शांतता सुरक्षितता निर्माण करण्याच्या दृष्टीने हे खूप महत्त्वाचे आहे. ग्राहक याना त्याने खातेदारांनी आपली संपूर्ण सत्य व अचूक माहिती देणे गरजेचे आहे. त्यामध्ये पत्त्यामध्ये बदल मोबाईल क्रमांकामध्ये बदल झाल्यास बँकेला त्वरित कळवून सुधारणा करून घेणे आवश्यक असते.

आजच्या डिजिटल आणि जलद बँकिंग युगात KYC आणि AML ही फक्त प्रक्रिया नाही तर आपल्या खात्याची, पैशाची आणि ओळखीची सुरक्षा करणारी अत्यावश्यक ढाल आहे. KYC आणि AML प्रक्रिया आर्थिक संस्था असली तरी फसवणूक टाळण्यासाठी ग्राहक व आर्थिक संस्था दोघांची समान भूमिका आहे. अच्छा या जागतिकीकरणाच्या स्तरावर वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांमुळे आपली वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. सुरक्षित बँकिंग ही केव्हा आर्थिक संस्थायांची जबाबदारी नाही तर जागरूक ग्राहकांची महत्त्वाची भूमिका आहे.

चला सुरक्षित बँकिंगची सवय लावूया... आणि जागरूक ग्राहक बनूया... आपली सुरक्षितता... आपल्या हातात....



# विविध विभागांचे अहवाल

## ◈ मराठी भाषा व वाङ्मय मंडळ ◈

सन २०२५-२६ शैक्षणिक वर्षांमध्ये मराठी भाषा व वाङ्मय मंडळ या विभागाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांचा अहवाल खालीलप्रमाणे दिनांक २१ जुलै २०२५ रोजी परिसरातील गौरी गणपतीची गीतांचे विद्यार्थ्यांनी संकलन करून 'मायबोली' या भिंकीपत्रिकेद्वारे त्याचे उद्घाटन करण्यात आले. त्याचबरोबर ३० नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनाचे औचित्य साधून 'संविधान घोषवाक्य' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयातील २८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रथम क्रमांक : विराज विलास जाधव (प्रथम वर्ष, कला), द्वितीय क्रमांक : निसर्गा पांडुरंग धावडे (तृतीय वर्ष, वाणिज्य),तर तृतीय क्रमांक : अमेय संजय सावंत (तृतीय वर्ष, वाणिज्य) या विद्यार्थ्यांनी मिळविला तर उत्तेजनार्थ क्रमांक सज्ञानी समीर घागरे (तृतीय वर्ष, कला) हिने मिळविला. दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी 'शुद्धलेखन' स्पर्धा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील २९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक : राजरत्न संजय वावळे (प्रथम वर्ष, कला), द्वितीय क्रमांक : दीक्षा दीपक गांगण (तृतीय वर्ष, वाणिज्य) तर तृतीय क्रमांक : निर्मिती संजय जाधव (प्रथम वर्ष, कला) या विद्यार्थ्यांनी मिळविला तर उत्तेजनार्थ समीक्षा गजानन पांचाळ (तृतीय वर्ष, वाणिज्य) हिने मिळविला.

दिनांक २७/०१/२०२६ रोजी मराठी भाषा पंधरवडा निमित्त ‘कवितेच्या गावा जाऊ’ या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपापल्या कवितेतून मराठी भाषेबद्दलची आत्मीयता व संवर्धन या विषयाच्या कविता सादर केल्या. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक डॉ. विकास पाटील यांनी मराठी भाषेबाबत संवर्धनाची, प्रबोधनाची गरज आहे असे सांगून मराठी भाषेबद्दलची जागृती विद्यार्थ्यांनी समाजापर्यंत पोहोचवावी असे सांगितले. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून इंग्रजीसह मराठी भाषेचे अस्तित्त्व जोपासावे या बाबत विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक २७/०२/२०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. विकास पाटील यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कुसुमाग्रजांनी मराठी साहित्याला दिलेले योगदान त्याचबरोबर त्यांच्या अजरामर कवितांचे सादरीकरण केले. याचबरोबर या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**- डॉ. बळवंत दाभाडे**

**विभाग प्रमुख, मराठी भाषा व वाङ्मय मंडळ**

# मराठी भाषा व वाङ्मय मंडळ




दिनांक : २१ जुलै २०२५ रोजी 'मराठी भाषा वाड.मय मंडळ ' च्या मार्फत ‘मायबोली’ या भितीपत्रिकेचे उद्घाटन करतांना संस्थेच्या मान्यवर.

दिनांक: २७ फेब्रुवारी २०२६ रोजी "मराठी भाषा गौरव दिनानिमित्त' "कवी कुसुमाग्रज : साहित्याचे योगदान " या विषयावर मार्गदर्शन डॉ. विकास पाटील , या प्रसंगी विचार मंचावरील प्र. प्राचार्य, डॉ. प्रमोद मेश्राम व डॉ. बी. टी. दाभाडे.







दिनांक : २७ १/२०२६ रोजी मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त ' कवितेच्या गावा जाऊ' या विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात मा मार्गदर्शन करताना डॉ. विकास पाटील

# मराठी भाषा व वाङमय मंडळ




दिनांक : ३०/११/२०२५ रोजी मराठी भाषा व वांडमय मंडळ आयोजित 'संविधान दिनानिमित्त घोषवाक्य' स्पर्धा कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करतांना डॉ. एम. आर. कोंडागुर्ले




दिनांक : १३/११/२०२५ रोजी मराठी भाषा व वांडमय मंडळ आयोजित 'शुद्धलेखन' स्पर्धा कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करतांना सहा. प्रा. पी. पी. राठोड




दिनांक : २१/०७/२०२५ रोजी मराठी भाषा व वांडमय मंडळ यांच्यामार्फत 'मायबोली' भित्तीपत्रीकेचे उद्घाटन करतांना संस्थापक सदस्य मा. श्री. विजय सावंत

# ◈ हिंदी विभाग ◈

हमारे महाविद्यालय के हिंदी विभाग अंतर्गत हिंदी अभ्यास मंडल के द्वारा हिंदी भाषा के विकास एवं प्रचार हेतु विभिन्न कार्यक्रमों का आयोजन किया गया।

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ के प्रारंभ मे नियोजन सभा का आयोजन किया था। जिसमें सालभर में जो- जो कार्यक्रम लेने है, उसका निर्धारण किया गया। १४ सितंबर २०२५ - २८ सितंबर २०२५ तक अपनें देश में हिंदी पखवाडा मनाया जाता है। इस उपलक्ष में महाविद्यालय में दिनांक १५ सितंबर २०२५ को सहा. प्रा. निंबाळकर का व्याख्यान आयोजित किया गया था। इस वक्त सहा. प्रा. निंबाळकर नें "आज के युग मे हिंदी भाषा की आवश्यकता" को दर्शाने की कोशिश की। तथा आज हिंदी कहा कहा तक पहुंच गई है, इसके बारे मे बताया एवं आनेवाले खतरों से अवगत कराया। इसी औसर पर ग्रंथालय मे हिंदी पुस्तकों की ग्रंथ प्रदर्शनी का भी आयोजन किया गया था।

'विश्व हिंदी दिवस' १० जनवरी २०२६ को मनाया गया। इस अवसर पर विभाग की और से 'कवी हरिवंशराय बच्चनजी' के साहित्य को बच्चों के सामने लाने के लिए, बच्चन जी की कविता पर आधारित "दर्पण"भित्तीपत्रिका का प्रकाशन किया गया तथा इसी अवसर पर हिंदी पुस्तक प्रदर्शन का भी आयोजन किया गया था।

**- सहा. प्रा. एस. एस. धोंगडे,**
विभाग प्रमुख, हिन्दी अभ्यास मंडल



हिंदी पखवाडे निमित्त मार्गदर्शन करते हुए सहा. प्रा. एस. व्ही. निंबाळकर



विश्व हिंदी दिवस के अवसर पर आयोजित पुस्तक प्रदर्शनी का आस्वाद लेते हुए शिक्षक तथा छात्र एवं छात्राएँ

# हिंदी विभाग




विश्व हिंदी दिवस के अवसर पर आयोजित पुस्तक प्रदर्शनी का उद्घाटन करते हुए प्र. प्राचार्य डॉ. मेश्राम




हिंदी अभ्यास मंडल की ओर से आयोजित ग्रंथप्रदर्शन का लाभ लेते हुये छात्र एवं छात्राएँ ।




हिंदी अभ्यास मंडल की ओर से आयोजित 'दर्पण' भितीपत्रिका का उद्घाटन करते हुए प्र. प्राचार्य डॉ. मेश्राम




हिंदी अभ्यास मंडल की ओर से आयोजित 'दर्पण' भितीपत्रिका का उद्घाटन करणे के बाद अवलोकन करते हुए मान्यवर, छात्र एवं छात्राएँ |

# ◈ वाणिज्य विभाग ◈

वाणिज्य विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

१. दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी वाणिज्य विभाग आणि मुंबई विमा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने "विमा जागृती" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना विम्याचे महत्त्व, प्रकार व त्यासंबंधी आवश्यक माहिती देण्यात आली.

२. दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी "नेपाळच्या समकालीन प्रश्नांचे आकलन" या विषयावर वाणिज्य विभागामार्फत विद्यार्थ्यांचा सेमिनार आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी या विषयावर विविध मुद्यांवर अभ्यासपूर्ण मांडणी केली.

३. शनिवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी "कृत्रिम बुद्धिमत्ता आणि करिअरच्या संधी" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी श्री. चेतन गोडबोले (सहाय्यक प्राध्यापक, एज्युकेशन ग्रुप, पुणे) यांनी विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले.

४. दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी वाणिज्य विभागामार्फत पाचल – मालवण – कुणकेश्वर – विजयदुर्ग – पाचल या ठिकाणी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीत विद्यार्थ्यांना ऐतिहासिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक माहिती मिळाली.

५. दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी वाणिज्य विभागामार्फत इंडस्ट्रियल व्हिजिट अंतर्गत हाडी येथे काथ्या उद्योग समूहाला भेट देण्यात आली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना उद्योगाचे प्रत्यक्ष कार्यपद्धती आणि उत्पादन प्रक्रिया याबाबत माहिती मिळाली.

६. दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी "अर्थमंथन २०२६" या उपक्रमांतर्गत "केंद्रीय अर्थसंकल्पाचा सखोल अभ्यास" या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी प्रा. पी. पी. राठोड यांनी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच "अर्थमंथन २०२६" या उपक्रमांतर्गत "अर्थसंकल्प २०२६ – PPT सादरीकरण स्पर्धा" आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन अर्थसंकल्पातील विविध मुद्यांवर प्रभावी सादरीकरण केले.

- सहा. प्रा. पवनकुमार पी. राठोड
वाणिज्य विभाग

## दिनांक २३/०२/२०२६ रोजी वाणिज्य विभाग आयोजित 'अर्थमंथन – २०२६' या उपक्रमांतर्गत 'अर्थसंकल्प – २०२६ पी. पी. टी' सादरीकरण स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी












## दिनांक १८/०२/२०२६ रोजी वाणिज्य विभाग आयोजित शैक्षणिक सहल व औद्योगिक सहलीतील काही क्षणचित्रे













# ◈ ग्रंथालय विभाग ◈

आधुनिक महाविद्यालयाच्या ग्रंथालयात एकूण ग्रंथ संख्या- ९०९६ असून, यामध्ये जनरल बुक्स मधील ग्रंथसंख्या -४३२८, बी. सी. बुक बँक स्कीम मधील ग्रंथसंख्या- ७७८, आय. सी. एस. एस. आर. बुक ग्रॅन्ट मधिल ग्रंथसंख्या- १०४२, देणगी दाखल प्राप्त झालेली ग्रंथसंख्या-१५०३, सिद्धिविनायक ट्रस्ट मुंबई कडून देणगी दाखल प्राप्त झालेली ग्रंथसंख्या-१०९५, शिक्षकांचे मायनर रिसर्च प्रोजेक्ट ग्रंट मधून खरेदी केलेली ग्रंथसंख्या - ५९ आणि स्पेसीमेन कॉपीच्या रूपाने प्रकाशकाकडून प्राप्त झालेली ग्रंथसंख्या- ३०३, पीएच. डी., एम. फिल., एम. आर. पी. थेसिस आणि डेजर्टेशन- ०६, कॉलेज कॉन्फरन्स प्रकाशन-१८ आहेत. तर ग्रंथालयामध्ये एकूण जर्नल्स २२ आहेत.

त्याचप्रमाणे ग्रंथालय विभागाद्वारे २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वाचन संस्कृती वाढविण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ते कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत-

**१) दिनांक १५/१०/२०२५ रोजी माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनानिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. या निमित्ताने ग्रंथालय विभागामार्फत खालील कार्यक्रम घेण्यात आले:**

- **प्रतिमा पूजन:** मान्यवरांच्या हस्ते माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.
- **मार्गदर्शनाचा कार्यक्रम:** मार्गदर्शनाच्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. ए. डी. पाटील यांनी मार्गदर्शन केले, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि आभार ग्रंथपाल डॉ. एम. आर. कोंडागुर्ले यांनी केले.

**२) दिनांक १२/०८/२०२५ रोजी डॉ. एस. आर. रंगनाथान जयंती दिन हा " राष्ट्रीय ग्रंथपाल दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. त्याप्रमाणे आपल्या महाविद्यालया मध्ये ही साजरा करण्यात आला -**

- **प्रतिमा पूजन** दिनांक १२/०८/२०२५ रोजी करण्यात आले.
- **ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन:** प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शन वेळी एल. आय. सी. शाखा, राजापूर चे शाखाधिकारी मा. श्री. सुर्यकांत माळी साहेब व त्यांचे सर्व सहकारी उपस्थित राहून पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घेतला.
- **मार्गदर्शनाचा कार्यक्रम:** प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहा. प्रा. एस. एस. धोंगडे, ग्रंथालय विभाग प्रमुख यांनी मार्गदर्शन केले, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. एम. आर. कोंडागुर्ले यांनी केले तर आभार सौ. एस. व्ही. कोलते यांनी मानले.

१) **गोल्ड कार्ड स्कीम :**

डॉ. एस. आर. रंगनाथान यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना "गोल्ड कार्ड" चे वितरण **गोल्ड कार्ड स्कीम** अंतर्गत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वाचनसंस्कृतीत वाढ करण्यासाठी या योजनेअंतर्गत प्रत्येक वर्गातून मागील वर्षी प्रथम, द्वितीय आणि तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता गोल्डकार्ड देण्यात आले. व त्या अंतर्गत वाचनासाठी वर्षभर एक जादा पुस्तक देण्यात आले.

**४) बेस्ट रिडर अवार्ड:**

दिनांक १९/१२/२०२५ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षाचा **उत्कृष्ट वाचक** म्हणून तीन विद्यार्थी निवडण्यात आले. ते खालीलप्रमाणे आहेत-

| | | |
|---|---|---|
| १. नेत्रा सुर्यकांत बावकर , | (द्वितीय वर्ष, कला) | - प्रथम क्रमांक |
| २. वर्षा संतोष जाधव , | (द्वितीय वर्ष, वाणिज्य) | - द्वितीय क्रमांक |
| ३. संस्कार चंद्रशेखर नारकर , | (प्रथम वर्ष, वाणिज्य) | - तृतीय क्रमांक |

**५) बी. सी. बुक बँक स्कीम:**

बी. सी. बुक बँक स्कीम अंतर्गत खरेदी केलेली एकूण ग्रंथसंख्या ७७८ असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ यासाठी मुंबई विद्यापीठ, मुंबई विद्यार्थी कल्याण विभागाकडून १०५००/- रुपये अनुदान ग्रंथ खरेदीसाठी प्राप्त झाले. त्यामधून २४ ग्रंथांची खरेदी करण्यात आली व उर्वरित रक्कम विद्यापीठाच्या नियम-निकषाप्रमाणे खर्च करण्यात आली.

**६) वाचन कक्ष:**

महाविद्यालयातील ग्रंथालयात विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी वाचन कक्षाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**७) वाचन संकल्प महाराष्ट्राचा: उपक्रमांतर्गत ग्रंथालय विभाग आयोजित वाचन पंधरवडा दिनांक- ०१/०१/२०२६ ते १५/०१/२०२६:**

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक दि. २०/१२/२०२४ आणि मुंबई विद्यापीठ, मुंबईचे परिपत्रक दि. ३१/१२/२०२४ प्रमाणे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्याच्या उद्देशाने **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** दरवर्षी हे अभियान यशस्वी राबविण्याची जबाबदारी ग्रंथालय सल्लागार समितीवर सोपविण्यात आली. ही समिती खालीलप्रमाणे आहे-

| | | |
|---|---|---|
| ०१ | डॉ. पी. एस. मेश्राम | प्रभारी प्राचार्य |
| ०२ | सहा. प्रा. एस. एस. धोंगडे | समन्वयक |
| ०३ | डॉ. व्ही. एस. पाटील | सदस्य |
| ०४ | सहा. प्रा. एस. जी. चव्हाण | सदस्या |
| ०५ | डॉ. एम. आर. कोंडागुर्ले | ग्रंथपाल / सचिव |

**या वाचन पंधरवडा उपक्रमाअंतर्गत खालील कार्यक्रम घेण्यात आले:**

१. सामुहिक वाचन - गुरुवार दि. : ०८/०१/२०२६

२. वाचन कौशल्य मार्गदर्शन कार्यक्रम - गुरुवार दि. : ०८/०१/२०२६

३. ग्रंथप्रदर्शन - शुक्रवार दि. : ०९, १० व १४/०१/२०२६

**७) दैनिक वर्तमानपत्रांची कात्रणे काढणे:**

विद्यार्थ्यांना दैनंदिन वर्तमान घडामोडींचे ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी दररोजच्या वर्तमानपत्रांमधून वेगवेगळया विषयांवर प्रकाशित होणाऱ्या माहितीचे कात्रण काढून फलकावर लावले जाते व नंतर ते फाईलला ठेवली जातात.

**८) ग्रंथालय मार्गदर्शन:**

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वर्गानुसार मार्गदर्शनाचे कार्यक्रम आयोजित केले जाते. त्यामध्ये ग्रंथालयाचे नियम, अटी व उपलब्ध साहित्याबाबत माहिती दिली जाते.

**९) सहकार्य:**

प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम, ग्रंथालय सल्लागार समितीचे प्रमुख सहा. प्रा. एस. एस. धोंगडे व सदस्य डॉ. व्ही. एस. पाटील, सहा. प्रा. स्नेहल चव्हाण आदींनी मार्गदर्शन केले. पुस्तकांचे दाते, ग्रंथालय परिचर सौ. स्नेहा कोलते, कार्यालय कर्मचारी वृंद व विद्यार्थी इत्यादींनी वर्षभर मोलाचे सहकार्य केले. या सर्वांचे आभार, धन्यवाद !

**सहा. प्रा. एस. एस. धोंगडे**
विभाग प्रमुख

**डॉ. मनोहर रामुलु कोंडागुर्ले**
ग्रंथपाल

# ग्रंथालय विभाग




डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त दि: १२/०८/२०२५ रोजी आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करतांना महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम आणि इतर मान्यवर




दि: १२/०८/२०२५ रोजी आयोजित ग्रंथ प्रदर्शनाच्या कार्यक्रमात डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पमालार्पण करतांना एल. आय. सी. शाखा राजापूर चे शाखाप्रमुख मा. श्री. सुर्यकांत माळी, इतर मान्यवर आणि विद्यार्थी




डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे पाहणी करतांना विद्यार्थी आणि इतर मान्यवर




डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे पाहणी करतांना विद्यार्थी आणि इतर मान्यवर




डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम




ग्रंथालयाद्वारे आयोजित डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शन करतांना सहा. प्रा. एस. एस. धोंगडे

# ग्रंथालय विभाग




डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात
प्रास्ताविक व सूत्रसंचालन करतांना ग्रंथपाल
डॉ. एम. आर. कोंडागुर्ले




डॉ .एस .आर .रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात
उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त करतांना सौ. एस.व्ही.कोलते




डॉ .एस .आर .रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात
उपस्थित सर्व प्राध्यापक, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी




दि: १५/१०/२०२५ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम
यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन या कार्यक्रमात
प्रतिमेस पुष्पमालार्पण करतांना डॉ. ए. डी. पाटील




दि: १५/१०/२०२५ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या
जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात प्रतिमेस
आदरांजली देतांना प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम




डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन
प्रेरणा दिन कार्यक्रम साजरा

२०२५-२६ या वर्षाच्या मेरीट मध्ये आलेल्या विद्यार्थ्यांना ग्रंथालय विभागाकडून गोल्ड कार्ड चे वितरण करून अभिनंदन करतांना मान्यवर
























# ग्रंथालय विभाग




दि: ०१/०१/२०२६ ते १५/०१/२०२६ या कालावधीत आयोजित केलेल्या वाचन पंधरवडा या उपक्रमांतर्गत डॉ. पी. एस. मेश्राम, प्रभारी प्राचार्य ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करतांना व उपस्थित सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक




दि: ०१/०१/२०२६ ते १५/०१/२०२६ या कालावधीत आयोजित केलेल्या वाचन पंधरवडा या उपक्रमांतर्गत आयोजित ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी करतांना विद्यार्थी आणि विद्यार्थीनी




दि.:०८/०१/२०२६ रोजी सामुहिक वाचनात प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचा सहभाग




दि.:०८/०१/२०२६ रोजी सामुहिक वाचनात प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचा सहभाग




वाचन कौशल्य वाढविणे या मार्गदर्शन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांचे स्वागत करतांना डॉ. बी. टी. दाभाडे




वाचन कौशल्य वाढविणे या मार्गदर्शन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना

# ◈ सांस्कृतिक विभाग ◈

- शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये सांस्कृतिक विभागा अंतर्गत खालील कार्यक्रम घेण्यात आले.
- दिनांक २१ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्था पदाधिकारी व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
- दिनांक ०१ ऑगस्ट २०२५ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रम करण्यात आला.
- दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी नवागताचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी महाविद्यालयात नव्याने प्रकाशित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
- दिनांक १० आक्टोंबर २०२५ पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या "एकात्म मानव दर्शन" हीरक महोत्सवा निमित्ताने निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.
- दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ संविधान दिन कार्यक्रम करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य मा. डॉ. पी. एस. मेश्राम यांनी संविधानाचे महत्व आपल्या व्याख्यानात विशद केले.
- दिनांक ०६ डिसेंबर २०२५ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनी महाविद्यालयात मा. प्र. प्राचार्य डॉ. पी. एस मेश्राम यांच्या हस्ते फोटो पूजन करून साजरा करण्यात आला.
- दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात "तरूणाईच्या आत्महत्या एक समस्या" या विषयावर रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले.
- दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. पी. जी. पवार डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वेळी संस्था सदस्य व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रात्री विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाने सर्वांची मने जिंकली.
- दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी युवा सप्ताहा अंतर्गत "युवा दिन" म्हणजे स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ. व्ही.एस. पाटील यांनी व्याख्यान दिले.

**सहा. प्रा. एस. व्ही. निंबाळकर**
**सांस्कृतिक विभाग, प्रमुख**

# सांस्कृतिक विभाग




दिनांक :२१/०७/२०२५ महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त सरस्वती प्रतिमेला दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करतांना संस्थेचे सरचिटणीस मा. नरेश पाचलकर




दिनांक: २१/०७/२०२५ महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त सरस्वती प्रतिमेला दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करतांना संस्थापक सदस्य मा. विजय सावंत




दिनांक: २१/०७/२०२५ महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त सरस्वती प्रतिमेला दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करतांना संस्थेचे सदस्य मा. चंद्रकांत लिंगायत




दिनांक: २१/०७/२०२५ महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त सूत्रसंचालन करतांना डॉ. बी. टी. दाभाडे




दिनांक: २१/०७/२०२५ महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करतांना संस्थेचे सदस्य मा. विजय सावंत, मा. सिद्धार्थ जाधव, मा. अशोक सक्रे, इतर मान्यवर व एन. एस. एस. विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास पाटील सर्व प्राध्यापक वर्ग व विध्यार्थी




दिनांक: १५/१२/२०२५ रोजी वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त ‘सारी डे’ या कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थीनी

# सांस्कृतिक विभाग




दि.२६/०६/२०२५ रोजी राजर्षी छ. शाहू महाराज जयंती कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. अशोक पाटील




दि.०१/०८/२०२५ रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. विकास पाटील




दि.२२/०८/२०२५ रोजी स्वागत समारंभ कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सांस्कृतिक विभाग प्रमुख सहा. प्रा. श्री. संजय निंबाळकर




दि.२२/०८/२०२५ रोजी स्वागत समारंभ कार्यक्रमात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना दीक्षा गांगण




दि.२२/०८/२०२५ रोजी स्वागत समारंभ कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना कलिका जाधव




युवा सप्ताहा अंतर्गत स्वामी विवेकानंदांवर व्याख्यान देताना डॉ. व्ही. एस. पाटील




दि. ६/१२/२०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पुष्पमालार्पण करतांना प्र. प्रा. डॉ. पी. एस. मेश्राम




दि. २६/११/२०२५ रोजी संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमालार्पण करतांना प्र. प्रा. डॉ. पी. एस. मेश्राम




दि. २६/११/२०२५ रोजी संविधान दिनानिमित्त मार्गदर्शन करतांना डॉ. ए. डी. पाटील




वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दि. १५/१२/२०२५ रोजी पारंपरिक डे या कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थी



खाना-खजाना कार्यक्रम परिक्षण करताना सहा. प्रा. एस. एस. धोंगडे आणि सहा. प्रा. एस. जी. चव्हाण



खाना-खजाना कार्यक्रम परिक्षण करताना सहा. प्रा. एस. एस. धोंगडे आणि सहा. प्रा. एस. जी. चव्हाण

# सांस्कृतिक विभाग




रांगोळी रेखाटन स्पर्धा "तरूणाईच्या आत्महत्या"



रांगोळी रेखाटन स्पर्धा "तरूणाईच्या आत्महत्या"




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. पी. जी. पवार व संस्था सदस्य




वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. पी. जी. पवार व संस्था सदस्य




दि. २३/१२/२०२५ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. पी. जी. पवार व उपस्थित मान्यवर




दि. २३/१२/२०२५ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभानिमित्त मनोगत व्यक्त करतांना विभाग प्रमुख सहा. प्रा. एस. व्ही. निंबाळकर व उपस्थित मान्यवर

# सांस्कृतिक विभाग



नवरात्रोत्सवानिमित्त सरस्वती प्रतिमेचे पूजन करतांना साहिल नार्वेकर



नवरात्रोत्सवानिमित्त सरस्वती प्रतिमेचे पूजन या कार्यक्रमानिमित्त भजनामध्ये रममाण झालेले महाविद्यालयाचे विद्यार्थी




दि. १९/०२/२०२६ रोजी छ. शिवाजी महाराज यांच्या जयंतिनिमित्त प्रतिमा पूजन करताना डॉ. ए. डी. पाटील




दि. १९/०२/२०२५ रोजी छ. शिवाजी महाराज यांच्या जयंतिनिमित्त प्रतिमा पूजन करताना विध्यार्थी साहिल नार्वेकर




दि. १९/०२/२०२५ रोजी छ. शिवाजी महाराज यांच्या जयंतिनिमित्त प्रतिमा पूजन करताना विध्यार्थीनी




दि. १९/०२/२०२६ रोजी छ. शिवाजी महाराज यांच्या जयंतिनिमित्त मनोगत व्यक्त करताना विभाग प्रमुख सहा. प्रा. एस. व्ही. निंबाळकर

# ◈ राष्ट्रीय सेवा योजना विभाग नियमित उपक्रम ◈

राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ करिता १०० विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. या विभागामार्फत पुढील उपक्रम घेण्यात आले .

१) जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

२) आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त डॉ. बी. टी. दाभाडे यांचे व्याख्यान तर सहा. प्रा. एन. जी. देवन यांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

३) २७ जून २०२५ रोजी महिला कर्करोग तपासणी अभियानात स्वयंसेवकांनी सहभाग घेतला घेतला.

४) १६ जुलै २०२५ रोजी स्वयंसेवकांनी रस्त्यावरील झाडी मारून महाविद्यालय ते सह्याद्री दर्शन परिसर स्वच्छ केला.

५) दिनांक १८ जुलै २०२५ रोजी 'कलम बांधणी प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी' या विषयावर जिल्हास्तरीय कौशल्याधारित कार्यशाळा संपन्न झाली.

६) दिनांक २७ जुलै २०२५ रोजी राजापूर, लांजा तालुका नागरिक संघ,मुंबई व महाविद्यालयाच्या वतीने अनुस्कुरा घाट परिसर व उगवाई मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

७) दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी तहसीलदार कार्यालय, राजापूर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अंतर्गत मंडल स्तरावरील शिबिरात श्री पवार यांचे व्याख्यान संपन्न झाले.

८) दिनांक ७ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालय परिसरात औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली.

९) दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालय परिसरात आणि पिकअप शेड परिसरात स्वच्छता करण्यात आली.

१०) दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी 'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत रांगोळी स्पर्धा घेण्यात आली.

११) दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी एस. आर.डी./ एन.आर.डी. व उत्कर्ष निवड शिबिरात तीन विद्यार्थी सहभागी झाले.

११) दिनांक २ सप्टेंबर २०२५ रोजी गणेश विसर्जनावेळी निर्माल्य स्वयंसेवकांनी संकलित केले.

१२) दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी श्रीनिवास मच्छा यांचे रेड रिबन क्लब कार्य व स्वरूप विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

१३) दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी सायबर क्राईम या विषयावर सिया शेरे यांचे व्याख्यान संपन्न झाले.

१४) दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी जनरल तपासणी आरोग्य शिबिर संपन्न झाले.

१५) दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी श्री जगदीश पाटील यांचे 'घेऊया आरोग्याची काळजी ' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

१६) दिनांक २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत एनएसएस सप्ताह संपन्न झाला. या सप्ताहात डॉ. ए. डी. पाटील यांचे व्याख्यान महाविद्यालय परिसर, सह्याद्री दर्शन परिसर, दत्तक गाव परिसर आदी परिसरात स्वच्छता, वृक्षारोपण, घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा असे विविध उपक्रम घेण्यात आले.

१७) दिनांक ८ ऑगस्ट २०२५ रोजी महापूरग्रस्त मदत निधी संकलन रॅली काढून ११०००/- रुपयांची मदत संकलित करण्यात आली व ती मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्यात आली.

१८) दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी वंदे मातरम या गीताच्या शताब्दी महोत्सवानिमित्त वंदे मातरम या गीताचे समूह गायन करण्यात आले.

१९) दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी महा कृषी विस्तार ॲप मार्गदर्शन कार्यशाळेत मंडल कृषी अधिकारी श्री. ए. डी. भारती यांचे व्याख्यान संपन्न झाले.

२०) दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी एड्स सप्ताहाचे उद्घाटन घेण्यात आले. या सप्ताह अंतर्गत व्याख्यान, रॅली, प्रबोधनपर पथनाट्य असे विविध उपक्रम घेण्यात आले.

२१ ) दिनांक २५ जानेवारी २०२६रोजी दत्तक गावी स्वच्छता करण्यात आली .

२२ ) दिनांक २५ जानेवारी २०२६रोजी राजापूर लांजा तालुका नागरिक संघ अयोजित अकराव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या क्रांतीज्योतीचे पूजन करण्यात आले.

२३ ) दिनांक २७ जानेवारी २०२६रोजी जाऊ कवितेच्या गावा कार्यक्रमात वणवा विषयावर कवितावाचन करण्यात आले.

२४ ) दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ ते ०२डिसेंबर २०२५ या कालावधीत लांजा महाविद्यालयात झालेल्या LTP शिबिरात तीन विद्यार्थी सहभागी झाले. (नेत्रा बावकर ,विक्रांत शिंदे ,करण तळेकर )

२५ ) दिनांक १७ जानेवारी २०२६ ते दिनांक २४ जानेवारी २०२६ या कालावधीतील अकोला येथे झालेल्या आव्हान या राज्यस्तरीय शिबिरामध्ये निसर्गा धावडे व तुषार गोरुले या दोन विद्यार्थी सहभागी झाले.

-डॉ. विकास पाटील
विभाग प्रमुख

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग




जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करताना संस्था सरचिटणीस श्री नरेश पाचलकर व उपस्थित मान्यवर




आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रात्यक्षिक आणि मार्गदर्शन करताना सहा. प्रा. एन. जी. देवन




आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. बी. टी. दाभाडे व उपस्थित मान्यवर

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग



'हर घर तिरंगा' उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या रांगोळी स्पर्धेची पाहणी करताना संस्थेचे सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर, संस्था सदस्य श्री, बाबा सावंत, प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम व मान्यवर




रेड रिबन क्लब कार्य व स्वरूप या विषयावर मार्गदर्शन करताना ग्रामीण रुग्णालय, लांजा येथील समन्वयक श्रीनिवास मच्छा व उपस्थित मान्यवर




महाविद्यालय ते सह्याद्री दर्शन रोडवरील झाडी मारून गटर खुदाई करताना स्वयंसेवक

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग




'कलम बांधणी प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी' या विषयावरील जिल्हास्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना माजी विद्यार्थी सुमित सावंत

अनुस्कुरा घाटात स्वच्छता करताना स्वयंसेवक






राजापूर लांजा तालुका नागरिक संघ मुंबई व महाविद्यालयाच्या नएसएस विभागामार्फत अनुस्कुरा घाटात वृक्षारोपण करताना स्वयंसेवक व संघाचे पदाधिकारी

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

महाविद्यालय परिसरात औषधी वनस्पतींची डॉ. ए. डी. पाटील यांच्या हस्ते लागवड करताना स्वयंसेवक





महाविद्यालय परिसरात स्वच्छता करताना स्वयंसेवक




कॉलेज परिसरातील पिकअप शेडची स्वच्छता करताना स्वयंसेवक

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग




एनएसएस सप्ताह उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. ए. डी. पाटील व उपस्थित मान्यवर



सह्याद्री दर्शन परिसरात स्वच्छता करताना स्वयंसेवक




पूरग्रस्तांसाठी स्वयंसेवकांनी काढलेली मदत फेरी

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

महा कृषी विस्तार ॲप संदर्भात माहिती देताना सहाय्यक कृषी अधिकारी श्री. एम. ए. गीते, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम व उपस्थित मान्यवर







एड्स सप्ताहानिमित्त 'एड्स रुग्ण व समाज' या विषयावर बोलताना सहा. प्रा.पी.पी. राठोड व उपस्थित मान्यवर

सह्याद्री दर्शन ते महाविद्यालय या परिसरातील खड्डे भरताना प्राध्यापक व स्वयंसेवक






राजापूर लांजा तालुका नागरिक संघ अयोजित अकराव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या क्रांतीज्योतीचे पूजन करताना मान्यवर

# ◈ विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर ◈

**दि. ०३ ते ०९ डिसेंबर २०२५**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर येरडव मुक्कामी दिनांक ३ ते ९ डिसेंबर २०२५ या कालावधीत संपन्न झाले. दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजी येरडव गावचे माजी सरपंच श्री ज्ञानदेव दळवी यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. दुपारच्या सत्रात शिबिरात घ्यावयाच्या उपक्रमांचे नियोजन करण्यात आले.

दिनांक ४ डिसेंबर २०२५ रोजी ग्रामपंचायत परिसर,पाटीलवाडी परिसर, दत्त मंदिर परिसर आदी ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. दुपारच्या सत्रात राजापूर लांजा तालुका नागरिक संघाचे अध्यक्ष श्री.सुभाष लाड यांचे 'समृद्ध कोकण आणि तरुणाई ' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. सायंकाळच्या सत्रात श्री. निलेश दळवी यांचा संगीत भजन संध्या हा कार्यक्रम संपन्न झाला. शुक्रवार दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी येरडव ते अनुस्कुरा या सातवाहन कालीन ऐतिहासिक मार्गाची स्वच्छता व दुरुस्ती केली. या मार्गावरील पांडवकालीन ऐतिहासिक उगवाई मंदिर, शिलालेख, ढोपर विहीर परिसरात स्वच्छता करण्यात आली. दुपारच्या सत्रात 'कोकणातील पर्यटनाच्या संधी' या विषयावर प्रा. विजय हटकर यांचे व्याख्यान संपन्न झाले. शनिवार दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी सावंतवाडी, हनुमानवाडी परिसर, पिकअपसेड परिसर, जांगल देव मंदिर परिसरात स्वच्छता करण्यात आली. सावंतवाडी ते येरडव धनगरवाडा या पायवाटेची यावेळी दुरुस्ती करण्यात आली तर सायंकाळच्या सत्रात 'आऊट ऑफ द बॉक्स' या विषयावर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ.राहुल मराठे यांचे व्याख्यान संपन्न झाले. रविवार दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी सावंतवाडी येथे अर्जुना नदीवर वनराई बंधारा बांधण्यात आला. दुपारच्या सत्रात 'मधुमक्षिका पालन रोजगाराचे नवे साधन'या विषयावर प्रा. हेमंत डुंबरे, श्री. दिलीप जाधव या मान्यवरांचे मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न झाले. सोमवार दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी पाटीलवाडीत पाच शोष खड्डे खणण्यात आले. तसेच बौद्धवाडी येथे विहार व सार्वजनिक विहीर परिसरात स्वच्छता करण्यात आली. बौद्धवाडी ते अनुस्कुराघाट या परिसरातील पायवाट दुरुस्त करण्यात आली.

दुपारच्या सत्रात मंडल कृषी अधिकारी श्री. ए. डी. भारती यांचे व्याख्यान संपन्न झाले.रात्री मनोरंजन आणि प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. मंगळवार दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी प्राथमिक शाळा येरडव परिसरात स्वच्छता करण्यात आली. दुपारी येरडवचे माजी सरपंच श्री. ज्ञानदेव दळवी यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर, संस्था सदस्य श्री. विजय सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप समारंभ संपन्न झाला. यावेळी आदर्श स्वयंसेवक म्हणून भरत जोशी तर आदर्श स्वयंसेविका म्हणून निसर्गा धावडे हिला तर आदर्श डायरी लेखनासाठी दीक्षा गांगण हिला तर प्रेरणा पुरस्काराने करण वाजे याला मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी शिबिरातील अनुभवांचे लिहिलेल्या स्नेहबंध या हस्तलिखिताचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले.

-डॉ. विकास पाटील
विभाग प्रमुख

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग
## विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर येरडव दि,०३ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२५




विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी गाडगेबाबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना संस्थेचे सरचिटणीस श्री नरेश पाचलकर, येरडव गावचे माजी सरपंच श्री.ज्ञानदेव दळवी व मान्यवर

विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीरात ग्रामपंचायत परिसरात स्वच्छता करताना स्वयंसेवक



# विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर



विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजापूर लांजा तालुका नागरिक संघाचे अध्यक्ष श्री सुभाष लाड व उपस्थित मान्यवर



पांडवकालीन उगवाई (अनुस्कुरा ) मंदिर परिसरात स्वच्छता करताना स्वयंसेवक



सातवाहनकालीन अनुस्कुरा ते येरडव या ऐतिहासिक वाटेवरील पाण्याच्या झऱ्याची स्वच्छता करताना स्वयंसेवक



सातवाहनकालीन अनुस्कुरा ते  येरडव या ऐतिहासिक पायवाटेची दुरुस्ती  करताना स्वयंसेवक



पांडवकालीन  उगवाई मंदिर व ऐतिहासिक नाका परिसरात स्वच्छता केल्यानंतर स्वयंसेवक



येरडव (सावंतवाडी )बंधारा बांधताना स्वयंसेवक

# विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर



येरडव सावंतवाडी येथे बंधारा घालताना स्वयंसेवक



विशेष श्रमसंस्कार  निवासी शिबीरात मार्गदर्शन करताना एन एस एस विभागाचे रत्नागिरी जिल्हा समन्वयक डॉ.राहुल मराठे



विश्वशांती बौद्ध विहार येरडव बौद्धवाडी येथे स्वच्छता करताना स्वयंसेवक



येरडव बौद्धवाडी सार्वजनिक विहीर परिसरात स्वच्छता करताना स्वयंसेवक



येरडव बौद्धवाडी ते अनुस्कुरा घाट  या पायवाटेची दुरुस्ती करताना स्वयंसेवक



येरडव धनगरवाडा येथील जांभळीचे पाणी या झऱ्याची स्वच्छता करताना स्वयंसेवक

# विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर




येरडव हनुमानवाडी येथे स्वच्छता करताना स्वयंसेवक



विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीराच्या सांस्कृतिक कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी बोलताना सरचिटणीस श्री नरेश पाचलकर व उपस्थित मान्यवर




विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीरातील स्वयंसेवकांच्या अनुभवांचे हस्तलिखित 'स्नेहबंध' चे प्रकाशन करताना संस्थेचे सरचिटणीस श्री नरेश पाचलकर, संस्था सदस्य श्री. विजय सावंत व मान्यवर



विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीरातील आदर्श स्वयंसेवक पुरस्काराने भरत जोशी याला सन्मानित करताना संस्था सदस्य श्री. विजय सावंत व उपस्थित मान्यवर




विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीरातील आदर्श स्वयंसेविका पुरस्काराने कु. निसर्गा धावडे हिला सन्मानित करताना येरडवचे माजी सरपंच श्री. ज्ञानदेव दळवी व उपस्थित मान्यवर

# ◈ बी.सी.स्कॉलरशिप/बुक बँक/मैत्री संघ/एडवाझारी विभाग ◈

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये विभागाच्या वतीने वर्षाच्या सुरुवातीलाच वार्षिक नियोजन बैठक घेऊन, घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले त्यानुसार-

प्रथमता विद्यार्थ्यासमवेत बैठक घेऊन विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या सर्व शिष्यवृत्तींची माहिती देण्यात आली तसेच यावर्षी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीचा लाभ घेण्याची उदासीनता पाहून विभागाच्या वतीने असे ठरवण्यात आले की भारत सरकार शिष्यवृत्ती चे फॉर्म महाविद्यालयातच भरण्यात यावे त्यानुसार आज पर्यंत भारत सरकार शिष्यवृत्ती एस.सी., एस.टी., एन.टी., ओ.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे व राजर्षी शाहू शिष्यवृत्ती ही ओपन विद्यार्थ्यांच्या साठी, या सर्व शिष्यवृत्तीचे फॉर्म एकूण ४० फॉर्म महाविद्यालयात भरण्यात आले तसेच चालू शैक्षणिक वर्षामध्ये १७९ विद्यार्थ्यांचे डॉक्युमेंट गोळा करण्यात आल्या व त्यातील ६० विद्यार्थ्यांचे प्रस्ताव हे हिंदुस्थान पेट्रोलियम या संस्थेकडे पाठवण्यात आले तसेच चालू वर्षामध्ये सुभद्राबाई शिक्षण निधी मुंबई साठी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज केलेले होते पैकी ५ विद्यार्थ्यांना ५००० हजार प्रमाणे रोख रुपये २५०००/-मंजूर झाले

चालू शैक्षणिक वर्षामध्ये ए. वाय. सय्यद एज्युकेशन मेमोरियल ट्रस्ट मुंबई या संस्थेकडे अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे ०६ प्रस्ताव पाठवण्यात आले.

विद्यार्थ्यांना दाखले सुलभरीत्या उपलब्ध व्हावेत त्यासाठी दिनांक ०४ ऑगस्ट २०२५ रोजी "छत्रपती शिवाजी महाराज, महाराजास्व समाधान शिबिर दाखले आपल्या दारी "तहसीलदार कार्यालय राजापूर, सर्कल कार्यालय पाचल व परिसरातील सर्व तलाठी यांच्या वतीने व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये दाखले मिळवताना येणाऱ्या अडचणी कशा दूर करता येतील या दृष्टीने सर्कल श्री पवार यांनी मार्गदर्शन केले व सहकार्याचे आश्वासनही दिले

चालू शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाच्या बी.सी. बुक-बँक विभाग अंतर्गत ३२ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आजपर्यंत या विभागामध्ये ७७८ पुस्तके संग्रहित आहेत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील अनुदान रुपये १०५००/-विद्यापीठा कडून प्राप्त झाले. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या नियम आणि निकषांनुसार ते सर्व खर्च करण्यात आले व त्याचे लेखा परीक्षण पूर्ण झाले आहे. लेखा परीक्षण अहवाल व नवीन वर्षाचा अनुदान मागणी प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करण्यात आला आहे मागील अहवालानुसार युटिलायझेशनही पाठवण्यात आले आहे अशा प्रकारे या विभागांतर्गत हे कार्यक्रम राबवण्यात आले.

**- सहा. प्रा. सुभाष धोंगडे**
विभाग प्रमुख

# बी.सी.स्कॉलरशिप/बुक बँक/मैत्री संघ/एडवाइझारी विभाग




विविध शिष्यवृत्तीसाठी लागणाऱ्या कागदपत्रा संबंधी मार्गदर्शन करताना विभाग प्रमुख सहा. प्रा. श्री. सुभाष धोंगडे आणि सर्कल कार्यालयाचे अधिकारी




विविध शिष्यवृत्तीसाठी लागणाऱ्या कागदपत्रा संबंधी मार्गदर्शन करताना सर्कल कार्यालयाचे अधिकारी श्री. पवार साहेब विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना




निवडणूक संबधी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र स्वीकारत असतांना कु. समीक्षा कस्पले




निवडणूक संबधी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे प्रमाणपत्र स्वीकारत असतांना गणेश कोलते




निवडणूक संबधी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे प्रमाणपत्र स्वीकारत असतांना विराज जाधव




विविध शिष्यवृत्ती संबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सहा. प्रा .एस. एस. धोंगडे या प्रसंगी उपस्थित ग्रंथपाल डॉ. एम. आर. कोंडागुर्ले व मुख्य लिपिक श्री. राजेश चव्हाण

# ◈ वक्तृत्व / निबंध / वादविवाद स्पर्धा विभाग◈

शेक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये वर्षाच्या सुरूवातीलाच झालेल्या नियोजनानुसार खालील कार्यक्रम राबविण्यात आले-

१) २२ ऑगस्ट २०२५ रोजी ओणी पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ ओणी आयोजित "प्रबोधनकार ठाकरे राज्यस्तरीय अंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत" १) नेत्रा सूर्यकांत बावकर (एस. वाय. बी. ए.) व २) श्रुती विलास कलमष्टे (एफ. वाय. बी. ए.) या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. त्यामध्ये श्रुती विलास कलमष्टे हिची पहिल्या फेरीत " सर्वोत्तम २१ स्पर्धकां"मध्ये निवड झाली.

२) सप्टेंबर २०२५ मध्ये 'महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या' वतीने आयोजित "मराठी भाषा युवा दूत ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा" सप्टेंबर २०२५ या स्पर्धेत "अभिजात मराठी माझ्या अपेक्षा" या विषयावर श्रुती विलास कलमष्टे (एफ. वाय. बी. ए.) या विद्यार्थिनीने सहभाग घेतला यासाठी तिला **"मराठी भाषा युवा दूत"**म्हणून प्रमाणपत्र व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.

३) दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी राजापूर तालुका बौद्धजन संघ मुंबई. ग्रामीण शाखेच्या गट क्रमांक- ३ च्या वतीने **"सन्मान संविधानाचा"** या अंतर्गत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाच्या वतीने तीन विद्यार्थिनींना पाठवण्यात आले होते. त्यामध्ये नेत्रा सूर्यकांत बावकर, स्नेहल जगन्नाथ कानेटकर व लतिका उदयचंद्र जाधव हे सहभागी झाले होते त्यापैकी नेत्रा सूर्यकांत बावकर हिचा या स्पर्धेत द्वितीय क्रमांक आला तिला तीन हजार रोख रुपये व सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्राप्त झाले, तसेच स्नेहल जगन्नाथ कानेटकर (एफ. वाय .बी. ए.) हिला उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले .

४) दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी आपल्या महाविद्यालयात फोरम ऑफ फ्री इंटरप्राईजेस मुंबई द्वारा, ५९ वी ए. डी. श्रॉफ वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे अध्यक्ष म्हणून सीनियर प्राध्यापक डॉ. ए. डी. पाटील हे उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये-

१) प्रथम क्रमांक - दीक्षा दीपक गांगण (टी. वाय. बी. कॉम.) रोख रुपये २५०० व प्रमाणपत्र देण्यात आले

२) द्वितीय क्रमांक- नेत्रा सूर्यकांत बावकर एस. वाय. बी. ए. रोख रुपये १५०० व प्रमाणपत्र

३) तृतीय क्रमांक- साहिल सत्यवान नार्वेकर एस. वाय. बी. कॉम. रोख रुपये १००० व प्रमाणपत्र

४) उत्तेजनार्थ निर्मिती संजय जाधव एफ. वाय. बी. ए. प्रमाणपत्र

५) उत्तेजनार्थ निसर्गा पांडुरंग धावडे टी. वाय. बी. कॉम. प्रमाणपत्र

अशी बक्षीसे देऊन सन्मानित करण्यात आले अशाप्रकारे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

५) श्रीमती लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालय, दोडामार्ग जिल्हा सिंधुदुर्ग यांच्यावतीने राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी आपल्या महाविद्यालयातून १) श्रुती विलास कलमष्टे (एफ. वाय. बी. ए.), २) संस्कार चंद्रशेखर नारकर (एफ. वाय. बी. कॉम .) या दोन विद्यार्थ्यांचे निबंध पाठवण्यात आले.

६) २३ व २४ डिसेंबर २०२५ रोजी सरस्वती विद्यामंदिर आणि कनिष्ठ महाविद्यालय, पाचल यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय निबंध, वक्तृत्व, कथाकथन, स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी महाविद्यालयाच्या नऊ विद्यार्थ्यांना पाठवण्यात आले होते. त्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा विभागात १) श्रुती विलास कलमष्टे हिला उत्तेजनार्थ रोख रुपये ५००/- , प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

७) मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभाग व बार्टी महाराष्ट्र शासन यांच्यावतीने आयोजित **"भारतीय संविधान फेस्टिवल"** अंतर्गत भारतीय संविधानावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये निबंध व काव्य लेखन या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये निबंध स्पर्धेत निसर्गा पांडुरंग धावडे (टी. वाय. बी. कॉम.), नेत्रा सूर्यकांत बावकर (एस. वाय. बी. ए.), सज्ञानी समीर घागरे (टी. वाय. बी. ए.), निर्मिती संजय जाधव (एफ. वाय. बी. ए.) यांनी निबंध स्पर्धेत सहभाग घेतला, तसेच निर्मिती संजय जाधव (एफ. वाय. बी. ए.) या मुलीने भारतीय संविधानावर कविता सादर केली.

८) भारतीय डाक विभागांतर्गत 'ढाई आख्खर' राष्ट्रीय स्तरावरील पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धेसाठी खुल्या गटातून विक्रांत विश्वनाथ शिंदे (एस. वाय. बी. कॉम.), निसर्गा पांडुरंग धावडे (टी. वाय. बी. कॉम.), सज्ञानी समीर घागरे (टी .वाय. बी.ए.) व नेत्रा सूर्यकांत बावकर (एस. वाय. बी. ए.) या विद्यार्थ्यांनी आपली स्वलिखित पत्रे पाठवून सहभाग घेतला.

९) आपल्या महाविद्यालयाच्या निबंध वक्तृत्व व वादविवाद विभागाच्या वतीने प्रतिवर्षी कै. हरी तुकाराम खापणे स्मृतीप्रित्यर्थ राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये राज्यभरातील विविध विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातून स्पर्धेत आलेल्या निबंधांमधून खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

१) प्रथम क्रमांक साहिल दिलीप आग्रे, पाटपन्हाळे महाविद्यालय, पाटपन्हाळे, ता. गुहागर.

२) द्वितीय क्रमांक प्रतीक्षा राजेंद्र बावळे, शारदाबाई पवार महाविद्यालय, शारदानगर, बारामती.

३) तृतीय क्रमांक निसर्गा पांडुरंग धावडे, श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालय, पाचल.

असे विविध कार्यक्रम राबवण्यात आले.

# वक्तृत्व / निबंध / वादविवाद स्पर्धा विभाग




फोरम ऑफ फ्री इंटरप्राईजेस मुंबई मार्फत आयोजित ५९ वी ए. डी. श्रॉफ वक्तृत्व स्पर्धेत प्रास्ताविक करतांना सहा. प्रा. एन. जी. देवन




फोरम ऑफ फ्री इंटरप्राईजेस मुंबई मार्फत आयोजित ५९ वी ए. डी. श्रॉफ वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक विजेती दीक्षा दीपक गांगण या विद्यार्थिनीला सन्मानित करतांना डॉ. बी. टी. दाभाडे




फोरम ऑफ फ्री इंटरप्राईजेस मुंबई मार्फत आयोजित ५९ वी ए. डी. श्रॉफ वक्तृत्व स्पर्धेत व्दितीय क्रमांक विजेती नेत्रा सुर्यकांत बावकर या विद्यार्थिनीला सन्मानित करतांना सहा. प्रा. पी. पी. राठोड




फोरम ऑफ फ्री इंटरप्राईजेस मुंबई मार्फत आयोजित ५९ वी ए. डी. श्रॉफ वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक विजेता साहिल सत्यवान नार्वेकर या विद्यार्थ्याला सन्मानित करतांना डॉ. बी. टी. दाभाडे




फोरम ऑफ फ्री इंटरप्राईजेस मुंबई मार्फत आयोजित ५९ वी ए. डी. श्रॉफ वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ विजेती निसर्गा पांडुरंग धावडे या विद्यार्थिनीला सन्मानित करतांना डॉ. बी. टी. दाभाडे




फोरम ऑफ फ्री इंटरप्राईजेस मुंबई मार्फत आयोजित ५९ वी ए. डी. श्रॉफ वक्तृत्व स्पर्धेत उत्तेजनार्थ विजेती कु. निर्मिती संजय जाधव या विद्यार्थिनीला सन्मानित करतांना सहा. प्रा. पी. पी. राठोड

# ◈ क्रीडा विभाग ◈

सन - २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षामध्ये क्रीडा विभागाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांचा अहवाल खालीलप्रमाणे दिनांक : ११ /१२ /२०२५ रोजी महाविद्यालयामध्ये वार्षिक क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रस्सीखेच मुलींच्या वैयक्तिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तृतीय वर्ष, वाणिज्य या वर्गाने विजय संपादन केला. त्याचबरोबर या स्पर्धेमध्ये मुलांमध्ये तृतीय वर्ष, वाणिज्य या वर्गाने विजय संपादन केला. तसेच २०० मीटर धावणे या वैयक्तिक स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक : विराज राजाराम धावडे (तृतीय वर्ष, वाणिज्य), या विद्यार्थ्याने तर द्वितीय क्रमांक : आयुष सुभाष मांजरे (तृतीय वर्ष, वाणिज्य) तर तृतीय क्रमांक : अथर्व प्रदीप चंदुरकर (प्रथम वर्ष, कला) या विद्यार्थ्याने मिळविला. २०० मीटर धावणे मुलींमध्ये प्रथम क्रमांक : कु निसर्गा पांडुरंग धावडे (तृतीय वर्ष, वाणिज्य) आणि द्वितीय क्रमांक : कु. गायत्री विठ्ठल गिरकर (प्रथम वर्ष, वाणिज्य) तर तृतीय क्रमांक : कु. लावण्या संतोष तळेकर (प्रथम वर्ष, वाणिज्य) या विद्यार्थिनींनी मिळविला. १०० मीटर धावणे मुलांमध्ये प्रथम क्रमांक : विराज राजाराम तावडे (प्रथम वर्ष, कला), द्वितीय क्रमांक : आयुष सुभाष मांजरे (तृतीय वर्ष, वाणिज्य), तर तृतीय क्रमांक : अथर्व प्रदीप चंदुरकर (द्वितीय वर्ष, वाणिज्य) यांनी मिळविला. १०० मीटर धावणे मुलींमध्ये प्रथम क्रमांक : कु. गायत्री विठ्ठल गिरकर (प्रथम वर्ष, वाणिज्य), द्वितीय क्रमांक : कु. निसर्गा पांडुरंग धावडे (तृतीय वर्ष, वाणिज्य) तर तृतीय क्रमांक : कु. सज्ञानी समीर घागरे (तृतीय वर्ष, कला) या विद्यार्थिनींनी मिळविला. गोळा फेक मुलांमध्ये प्रथम क्रमांक : मंथन चंद्रकांत पवार (तृतीय वर्ष, वाणिज्य), द्वितीय क्रमांक : प्रणव परशुराम शेलार (प्रथम वर्ष, कला), तर तृतीय क्रमांक : आयुष सुभाष मांजरे (तृतीय वर्ष, वाणिज्य) या विद्यार्थ्याने मिळविला. तर गोळा फेक मुलींमध्ये प्रथम क्रमांक : कु. कलिका उदयचंद्र जाधव (तृतीय वर्ष, कला), द्वितीय क्रमांक : कु गायत्री विठ्ठल गिरकर (प्रथम वर्ष, वाणिज्य) तृतीय क्रमांक : कु. तन्वी हिरोजी शिर्के (तृतीय वर्ष, वाणिज्य) या विद्यार्थिनींनी मिळविला .

थाळीफेक मुलांमध्ये प्रथम क्रमांक : आयुष सुभाष मांजरे (तृतीय वर्ष, वाणिज्य), द्वितीय क्रमांक : मंथन चंद्रकांत पवार (तृतीय वर्ष, वाणिज्य), तर तृतीय क्रमांक : साहिल संदीप शिनगारे (द्वितीय वर्ष, कला)

या विद्यार्थ्यांनी मिळविला. तर थाळीफेक मुलींमध्ये प्रथम क्रमांक : कु. गायत्री विठ्ठल गिरकर (प्रथम वर्ष, वाणिज्य), द्वितीय क्रमांक : कु. नेत्रा सूर्यकांत बावकर (द्वितीय वर्ष, कला), तर तृतीय क्रमांक कु. निसर्गा पांडुरंग धावडे (तृतीय वर्ष, वाणिज्य या विद्यार्थिनींनी मिळविला.

दिनांक : १२/१२/२०२५ रोजी कबड्डी या सांघिक स्पर्धेमध्ये तृतीय वर्ष, वाणिज्य या वर्गाने वर्गाने विजय मिळविला, तर खो-खो या मुलांच्या स्पर्धेमध्ये द्वितीय वर्ष, वाणिज्य या वर्गाने विजय मिळविला. तसेच खो-खो या मुलींच्या स्पर्धेमध्ये तृतीय वर्ष, वाणिज्य या वर्गाने विजय मिळविला, तर क्रिकेट या स्पर्धेमध्ये तृतीय वर्ष, वाणिज्य या वर्गाने विजय मिळविला.

दिनांक २७/०२/२०२६ रोजी शिवबा प्रतिष्टान राजापूर आयोजित राजापूर श्री २०२६ जिल्हास्तरीय शरीर सौष्टव स्पर्धेत अथर्व धावडे (प्रथम वर्ष, कला) या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**डॉ. बळवंत दाभाडे**
विभाग प्रमुख, क्रीडा विभाग


दिनांक:११/१२/२०२५ रोजी आयोजित केलेल्या १०० मीटर धावणे स्पर्धेतील सहगागी विद्यार्थिनी


दिनांक: ११/१२/२०२५ रोजी आयोजित केलेल्या १०० मीटर धावणे स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी.


दिनांक : ११/१२/२०२५ रोजी आयोजित केलेल्या २०० मीटर धावणे स्पर्धेतील सहभागी विद्यार्थिनी.


दिनांक : ११/१२ २०२५ रोजी आयोजित केलेल्या २०० मीटर धावणे स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी.

# क्रीडा विभाग



दिनांक : ११ /१२ /२०२५ रोजी आयोजित केलेल्या गोळा फेक या स्पर्धेतील एक क्षण



दिनांक : ११/ १२ /२०२५ रोजी आयोजित केलेल्या गोळा फेक या स्पर्धेतील एक क्षण.



दिनांक: १२ /१२/ २०२५ रोजी आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी.




दिनांक : १२ /१२/ २०२५ रोजी आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी.



दिनांक : ११/ १२ /२०२५ रोजी आयोजित केलेल्या रस्सीखेच या स्पर्धेतील विद्यार्थिनी.



दिनांक : ११/ १२/ २०२५ रोजी आयोजित केलेल्या रस्सीखेच स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी.

**शिवबा प्रतिष्टान, राजापूर आयोजित राजापूर श्री २०२६ जिल्हास्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धेतील अथर्व धावडे (प्रथम वर्ष कला) यांची काही क्षणचित्रे**












# ◈ महिला विकास कक्ष ◈

महिला विकास कक्षांतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांमध्ये विद्यार्थिनींच्या विकासासाठी अनेक उपक्रम घेण्यात आले. ते खालील प्रमाणे -

१. महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षाच्या वतीने मंगळवार दिनांक १६/०९/२०२५ रोजी हिमोग्लोबिन व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सर्व मुलींचे 'रक्तगट व हिमोग्लोबिन' तपासणी करून त्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले.

२. महाविद्यालयातील महिला विकास कक्षामार्फत महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची दि. १६/०९/२०२५ रोजी आरोग्य तपासणी रायपाटण हॉस्पिटल येथे करण्यात आली.

३. महाविद्यालयातील महिला विकास कक्षामार्फत दिनांक ०३/०१/२०२६ रोजी सावित्रीबाई फुले जयंती दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

४. कक्षामार्फत ०८/०३/२०२६ रोजी जागतिक महिला दिन दरवर्षी महिलांविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करून उत्साहात साजरा केला जातो.

**- सहा. प्रा. स्नेहल चव्हाण**
विभाग प्रमुख

# महिला विकास कक्ष













दिनांक - १६/०९/२०२५ रोजी महिला विकास कक्षामार्फत विद्यार्थी-विद्यार्थिनी व प्राध्यापक व शिक्षकेत्तर हिमोग्लोबिन व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.












दिनांक - ०३.०१.२०२६ रोजी सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.

# महिला विकास कक्ष













दिनांक – १९/०१/२०२६ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ॲनिमिया तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# ◈ दोन दिवसीय नॅक राष्ट्रीय कार्यशाळा ◈

**उद्घाटन सत्र-**

श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल रायपाटण या आमच्या महाविद्यालयात दोन दिवसीय राष्ट्रीय नॅक कार्यशाळा दिनांक २५ व २६ जुलै २०२५ रोजी संपन्न झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व सरस्वती मातेचे पूजन करून या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. तदनंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी डॉ ए. डी. पाटील यांनी आपल्या प्रास्ताविक पर मनोगतातून कार्यशाळेचे स्वरूप स्पष्ट केले. यावेळी बोलताना प्रमुख मार्गदर्शक डॉ. एन.एस. धर्माधिकारी यांनी "प्रत्येक महाविद्यालयांना नॅकला सामोरे जाताना अनेक आवाहनांना कवेत घ्यावे लागते. नॅकचे शिवधनुष्य पेलताना महाविद्यालयांची दमछाक होते. अशावेळी खापणे महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कार्यशाळेंचा अनुभव आपण घेतला तर नॅकचे बदललेले स्वरूप आपल्या लक्षात येईल. येऊ घातलेले दहा क्रायटेरिया, त्यातील गुणांकन पद्धती, मूल्यांकन पद्धती, त्याचे सूक्ष्म अवलोकन या साऱ्यावर भर दिल्यास महाविद्यालय यशस्वीपणे नॅकला सामोरे जाईल. नॅकच्या बदलत्या स्वरूपानुसार काम केल्यास नॅक यशस्वी करत्ता येईल म्हणूनच आपण सर्वांनी नॅकचे बदललेले स्वरूप लक्षात घेऊन काम करूया "असे आवाहन केले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी संस्थेचे सरचिटणीस श्री नरेश पाचलकर, आय. क्यु. ए. सी. प्रमुख डॉ.ए.डी. पाटील, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.पी. एस. मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते. त्याच्यानंतर प्र. प्राचार्य डॉ.पी.एस. मेश्राम यांनी या कार्यशाळेला शुभेच्छा आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या." महाविद्यालयांवरील नॅक संदर्भात असणारा तणाव अशा कार्यशाळातून कमी होईल. गुणांकन पद्धती व मूल्यांकन पद्धती समजून घेतल्यास नॅक संदर्भात घ्यावयाचे उपक्रम अधिक सजगतेने महाविद्यालयांना घेता येतील. या कार्यशाळेत मिळणाऱ्या अनुभवांचा फायदा कार्यशाळेत सहभागी झालेल्या महाविद्यालयांना नक्की होईल. या कार्यशाळेत तुम्ही अधिक समरसतेने सहभागी होऊन अधिकाधिक ज्ञान घ्या आणि त्याचा तुमच्या महाविद्यालयाप्रती नॅकसाठी उपयोग करा," असे आवाहन आपल्या अध्यक्षीय मनोगतातून संस्थेचे सरचिटणीस श्री. नरेश पाचलकर यांनी केले. शेवटी आभार सहा. प्रा.एस.व्ही. निंबाळकर यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. विकास पाटील यांनी केले.

**सत्र पहिले-**

दुसऱ्या सत्रात डॉ. बी.टी. दाभाडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. नॅकच्या बदलेल्या प्रारूपासंदर्भात डॉ. एन. एस. धर्माधिकारी यांनी माहिती दिली. या सत्रात नॅकच्या बदललेल्या स्वरूपानुसार कागदपत्रे कशी बनवावी? व ती अपलोड कशी करावी? या संदर्भात सखोल माहिती देण्यात आली. बनवलेल्या कागदपत्रातील सांख्यिकीय डेटा बनवताना घ्यावयाची दक्षता त्यांनी सांगितली. या सत्राचे आभार डॉ. ए. डी. पाटील यांनी मानले

**सत्र दुसरे-**

या सत्रात डॉ. एन. एस. धर्माधिकारी यांनी बदललेल्या दहा क्रायटेरिया संदर्भात माहिती दिली. या क्रायटेरियानुसार बदललेले गुणांकन समजून दिले. एक एक गुण कसा मिळवत जावे यासंदर्भात सखोल माहिती दिली या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. ए. डी. पाटील यांनी केले तर आभार डॉ. विकास पाटील यांनी मानले.

**दिवस दुसरा दिनांक २६/०७/२०२५**

**सत्र तिसरे-**

या सत्रात पहिल्या दिवशी झालेल्या चर्चेतून उपस्थितांच्या मनात निर्माण झालेले प्रश्न विचारण्यात आले. कॉलेज पातळीवर असणाऱ्या समस्या प्राचार्य व त्यांचे प्रतिनिधी यांनी विचारल्या. त्याला समर्पक उत्तरे डॉ. एन.एस. धर्माधिकारी यांनी दिली. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ.ए.डी. पाटील यांनी केले तर आभार ग्रंथपाल डॉ. एम. आर. कोंडागुर्ले यांनी मानले

**सत्र चौथे-**

चौथ्या सत्रात कार्यशाळे संदर्भात फीडबॅक घेण्यात आला. यावेळी उपस्थित असणाऱ्या अभ्यासकांनी कार्यशाळे संदर्भात आपली मते नोंदवली. यानंतर दुपारचे जेवण झाले.

**- डॉ. अशोक पाटील**

आय.क्यू.ए.सी., विभाग प्रमुख




दिनांक: २५/०७/२०२५ रोजी आयोजित केलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेमध्ये प्रमुख NAAC पाहुणे मा. एन. एस. धर्माधिकारी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना




दिनांक: २५/०७/२०२५ रोजी आयोजित केलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय NAAC कार्यशाळेमध्ये संस्थेचे सरचिटणीस मा. नरेश पाचलकर उपस्थित प्राध्यापकांना मार्गदर्शन करतांना




दिनांक: २५/०७/२०२५ रोजी आयोजित केलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय NAAC कार्यशाळेमध्ये उपस्थित प्राध्यापकांना मार्गदर्शन करतांना प्र. प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम




दिनांक: २५/०७/२०२५ रोजी आयोजित केलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय NAAC कार्यशाळेमधील विविध महाविद्यालयातील उपस्थित प्राध्यापक वर्ग

# ◈ स्टाफ अकॅडेमी विभाग ◈

सन २०२५ - २६ शैक्षणिक वर्षामध्ये स्टाफ अकॅडेमी विभागाकडून विविध विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक : ३१/०७/२०२५ रोजी सकाळी ११:३० महाविद्यालयातील सांस्कृतिक सभागृहात सहा. प्रा.एस. व्ही निंबाळकर सर यांचे 'माझा इंग्लंडचा प्रवास' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सहा. प्रा. एस.व्ही. निंबाळकर सर यांनी काही दिवसांपूर्वी इंग्लंडचा प्रवास केला होता.त्यांनी या प्रवासामध्ये आलेले अनुभव कथन केले. पूर्वीचा व सध्याचा इंग्लंड याचे सविस्तर वर्णन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून भारत व इंग्लंड याचे पूर्वीचे आताच्या राजकीय संबंधावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी.टी. दाभाडे यांनी केले, तर आभार सहा. प्रा.पी.पी.राठोड सर यांनी मानले.

दिनांक : ०१ /१०/२०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता महाविद्यालयातील सांस्कृतिक सभागृहात डॉ. एम. आर. कोंडागुर्ले (ग्रंथपाल) यांचे 'अध्ययन, अध्यापन प्रक्रियेत कृत्रिम बुध्दिमत्तेच्या साधनांचा वापर ' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले होते. डॉ. एम. आर. कोंडागुर्ले यांनी अध्ययन व अध्यापन कार्यवाहीत शिक्षण व्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.) या साधनांचा वापर कसा हो तो आहे हे सविस्तर सांगितले. या साधनांमुळे समाजातील व्यक्तींच्या व विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात आमुलाग्र बदल होत आहेत. याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. पी. एस. मेश्राम या अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांच्या दैनंदिन व शैक्षणिक कार्यवाहीमध्ये ए. आय. चा वापर मोठ्या प्रमाणावर होतो आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास सादत आहे, यासंबंधी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. टी. दाभाड यांनी केले, सहा. प्रा. एन. जी देवन सर यांनी आभार मानले.

दिनांक : २७/ ११ / २०२५ रोजी सहा. प्रा.पवनकुमार राठोड यांचे 'अर्थव्यवस्थेतील व्यापार चक्रे आणि त्यांचे व्यवस्थापन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या विषयावर मार्गदर्शन करताना त्यांनी अर्थव्यवस्थेतील व्यापार चक्रे आणि त्यांचे व्यवस्थापन यांचा एकमेकांशी परस्पर संबंध कसा असतो, तसेच या व्यापार चक्रातील अनेक बदलांमुळे व्यवसाय, व्यापार, उद्योग आणि व्यवस्थापनाच्या अनेक धोरणांवर थेट कसा परिणाम होतो याविषयी मार्गदर्शन केले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अशोक पाटील यांनी व्यापार चक्र व व्यवस्थापनाचा असणारा संबंध, व्यवस्थापनाला येणारी वेगवेगळी आव्हाने व संधी कशाप्रकारे असते. तसेच वृद्धी व विस्तार टप्प्यांमधील असणारे व्यवस्थापन, अशा टप्प्यात व्यवसाय , मागणी व उत्पादन कसे वाढते, याविषयी अध्यक्षीय मनोगतातून मार्गदर्शन केले.

दिनांक : २३ /०१ / २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता महाविद्यालयातील सांस्कृतिक सभागृहात 'वाणिज्य या संकल्पनेचा विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर सहा. प्रा. पी. के. कांबळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.कांबळे सर यांनी बाजारपेठा निर्माण करण्याचे कार्य वाणिज्य संस्था करतात. घाऊक व्यापारी हा बाजारपेठांचा राजा कसा बनला आहे. वाणिज्य ही केवळ खरेदी, विक्रीची प्रक्रिया नसून समाजाच्या आर्थिक प्रगतीचा कणा आहे. तसेच उत्पादन आणि उपयोग यातील अंतर कमी करून आर्थिक चक्र गतिमान ठेवण्याचे कार्य वाणिज्य संस्था करते याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. ए. डी. पाटील सर यांनी आपले अध्यक्षीय मनोगतातून वाणिज्य ही संस्था मानवाच्या गरजेतून निर्माण झालेली व्यापक व प्रभावी अशी संस्था आहे. तसेच व्यापार उद्योगांमध्ये आपला देश प्राचीन काळापासून आघाडीवर आहे, याबाबतची अनेक उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन डॉ. बी. टी. दाभाडे यांनी केले, तर सहा. प्रा. एन. जी देवन यांनी आभार मानले.

**- डॉ. बळवंत दाभाडे**

विभाग प्रमुख

# स्टाफ अकॅडेमी विभाग




दिनांक ३१/०७/२०२५ रोजी 'माझा इंग्लंडचा प्रवास' या विषयावर मार्गदर्शन करताना सहा. प्रा. एस. व्ही. निंबाळकर




दिनांक : ०१/१०/२०२५ रोजी 'अध्ययन, अध्यापन - प्रक्रियेत कृत्रिम बुध्दिमत्तेच्या साधनांचा वापर या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. एम. आर. कोंडागुर्ले



दिनांक: २७/१२/२०२५ रोजी 'अर्थव्यवस्थेतील व्यापार चक्र आणि त्यांचे व्यवस्थापन ' या विषयावर मार्गदर्शन करताना सहा. प्रा. पवनकुमार राठोड




दिनांक: २३/०१/२०२६ रोजी स्टाप अकेडेमी विभाग आयोजित 'वाणिज्य या संकल्पनेचा विश्लेषणात्म अभ्यास' या विषयावर मार्गदर्शन करतांना सहा. प्रा. पी. के. कांबळे

# ◈ स्पर्धा परीक्षा आणि करिअर गाईडन्स विभाग ◈

महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागामार्फत विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने अनेक उपक्रम राबविण्यात आले.

१. दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी "एलआयसी मधील करिअरच्या संधी" या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या वेळी श्री. अतुल जाधव (विकास अधिकारी, एलआयसी) यांनी विद्यार्थ्यांना एलआयसीमधील विविध करिअर संधींबाबत सविस्तर माहिती दिली.

२. दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी "Orientation and Induction Program on Competitive Examination" या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांची माहिती, अभ्यास पद्धती आणि तयारीचे मार्गदर्शन देण्यात आले.

३. दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी "स्पर्धा परीक्षांमधील विविध संधी" या विषयावर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन आणि करिअरच्या संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

- सहा. प्रा. **पवनकुमार पी. राठोड**<br>विभाग प्रमुख

## स्पर्धा परीक्षा विभागामार्फत 'स्पर्धा परीक्षांमधील विविध संधी' या विषयावर मार्गदर्शन करतांना सहा. प्रा. पी. पी. राठोड












# ◈ वैयक्तिक अहवाल २०२५-२०२६◈

## ❖ डॉ. प्रमोद एस. मेश्राम

प्राध्यापक, प्र. प्राचार्य, इतिहास विभाग, प्रमुख

१) लोकशाहीर आण्णा भाऊ साठे एक बहुआयामी व्यक्तिमत्व आय. एस. बी. एन. क्रमांक ९७८-८१-९८७७८८-८-२ या संपादित पुस्तकात 'लोकशाहीर आण्णा भाऊ साठे जीवन व कार्य' हा संशोधन पेपर प्रकाशित झाला.

२) मुंबई विद्यापीठ मुंबई मा. कुलगुरूंचे प्रतिनिधी म्हणून कॅस कमिटीवर नेमणूक.

३) श्री शिवाजी महाविद्यालय,परभणी, यांचे मार्फत दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत महाराष्ट्र 'भारतीय पर्यटनातील ऐतिहासिक स्थळे : एक वर्णनात्मक अभ्यास' हा संशोधन पेपर प्रकाशित.

४) ओस्मानिया विद्यापीठ हैद्राबाद येथील इतिहास विभागामार्फत 'ऐतिहासिक संशोधन आणि अध्यापनशास्त्रातील उदयोन्मुख जागतिक ट्रेंड एक आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन' या विषयावर दिनांक १२ व १३ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत 'रोगाचे संरचनात्मक कारण म्हणून गरिबी: एक ऐतिहासिक आणि समकालीन विश्लेषण' हा संशोधन पेपर प्रकाशित झाला.

५) नारायणराव राणा महाविद्यालय बडनेरा येथील इतिहास विभागामार्फत झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारा या विषयावर झालेल्या राष्ट्रीय परिषदेत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शेतकरी परिषदा: एक चिकित्सक अभ्यास' हा संसोधन पेपर पुस्तकात प्रकाशित.

६) महिला सशक्तीकरण संघ नागपूर येथील 'महिला सशक्तिकरण संघटनेमार्फत' दिनांक १२/११/२०२५ रोजी 'ग्लोबल टीचर अवार्डने' सन्मानित करण्यात आले.

७) तेजस सेवा प्रतिष्टान, संगमनेर यांच्या वतीने 'महाराष्ट्र रत्न पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आले.

❖ **सह. प्रा. डॉ. व्ही. एस. पाटील**

**मराठी विभाग, प्रमुख**

१) दिनांक ०२-०८-२०२५ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सावर्डे येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वार्षिक नियोजन सत्रात सहभाग.

२) दिनांक २४ - ०८- २०२५ रोजी आबासाहेब मराठे महाविद्यालयात उत्कर्ष निवड शिबिरात परीक्षक म्हणून काम पाहिले.

३) दिनांक १७-११-२०२५ रोजी आबासाहेब मराठी महाविद्यालय राजापूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या उद्‌बोधन वर्गास मार्गदर्शन केले.

४) दिनांक ०१-१२-२०२५ रोजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,लांजा आयोजित नेतृत्व प्रशिक्षण शिबिरात 'नैतिक मूल्ये आणि नेतृत्व कौशल्य' या विषयावर मार्गदर्शन केले.

५) दिनांक १८- १२ -२०२५ रोजी आबासाहेब मराठे महाविद्यालय, राजापूर आयोजित जुहाटी येथील विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरात' राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकाची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन केले.

६) दिनांक २४- १२-२०२५रोजी सरस्वती विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, पाचल येथे जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

७) साहित्य विविधा या पुस्तकात 'जीवनानुभवांची गहनता आणि आशय समृद्धतेची सरिता कथा सरिता' हा शोधनिबंध प्रकाशित झाला

८) दिनांक २७-१२-२०२५रोजी छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा महाविद्यालय आयोजित आंतरराष्ट्रीय एक दिवशीय चर्चासत्रामध्ये 'एकविसाव्या शतकातील मराठी कादंबरीतील स्त्री चित्रण' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

९) दिनांक ७ व ८ फेब्रुवारी २०२६ रोजी दादा पाटील महाविद्यालय,कर्जत येथे आधुनिक परिस्थितीत लोककला,लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती : आव्हाने आणि संभावना ' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत 'दक्षिण कोकणातील लोकवाद्यांची वैशिष्ट्ये' या विषयावर शोध निबंध सादर केला.

१०) दि. २७ फेब्रुवारी२०२६ रोजी दापोली अर्बन बँक सायन्स कॉलेज, दापोली या महाविद्यालयात एनएसएस स्क्रुटीनी सत्रात सहभाग.

११) दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रा. डॉ.एन. डी. पाटील महाविद्यालय,मलकापूर यांनी मानवी मूल्य आणि साहित्य या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवशीय नॅशनल ई सेमिनार मध्ये 'मराठी संत साहित्यातील मानवी मूल्ये' या विषयावर शोध निबंध सादर केला.

१२) दि.०८ एप्रिल २०२६ रोजी फोंडाघाट महाविद्यालय आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये 'मराठी साहित्य आणि सामाजिक शास्त्रामधील भारतीय ज्ञान परंपरा' या विषयावर शोध निबंध सादर केला.

१३) दि. २३ एप्रिल२०२६ रोजी नवनिर्माण महाविद्यालय रत्नागिरी आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मूल्यमापन सत्रात सहभाग.

१४) दि. २४ एप्रिल२०२६ रोजी वराडकर बेलोसे महाविद्यालय दापोली आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये संत साहित्यातील कवयित्रींचे योगदान 'संत साहित्यातील कवयित्रींचे योगदान ' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

१५) दि. ०२ मे २०२६ रोजी 'रत्न नगरीचा रत्नपारखी ' हा लेख गुरुवर्य सुभाष लाड यांच्यावरील गौरव ग्रंथात प्रकाशित झाला.

❖ **सहा. प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील**

## इतिहास विभाग

१) अहिल्यानगर येथील बी द चेंज फाउंडेशन यांचा सन २०२६ चा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला.

२) श्री. मनोहर हरी खापणे महाविद्यालयाच्या आय. क्यू. ए. सी. विभागामार्फत दोन दिवशी नेक बायनरी टेशन फॉर हायर एज्युकेशनल इन्स्टिट्यूट या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले.

३) छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये २१ व्या शतकातील लोकप्रिय मराठी मालिकांचा सामाजिक प्रभाव या विषयावर शोधनिबंधाचे वाचन केले.

४) अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेने कणकवली महाविद्यालय येथे घेतलेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये स्वातंत्र्यसैनिक आबा नारकर यांचे कार्य या विषयावर शोधनिबंधाचे वाचन केले.

५) श्रीपतराव चौगुले महाविद्यालय माळवाडी कोतोली यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये राजर्षी शाहू महाराजांचे शेतीविषयक धोरण या विषयावर शोधनिबंधाचे वाचन केले.

६) फोंडाघाट महाविद्यालयाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये उपयोजित इतिहास आणि विविध विषयांमधील संशोधन या विषयावर शोधनिबंधाचे वाचन केले.

❖ **सहा. प्रा. डॉ. बळवंत दाभाडे**
**मराठी विभाग**

१) श्री मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल ता. राजापूर, जि. रत्नागिरी आणि आय.क्यु.ए.सी. विभाग आणि मराठी विभाग, हिंदी विभाग, इतिहास विभाग व वाणिज्य विभागामार्फत आयोजित केलेल्या दिनांक २५,२६ जुलै २०२५ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय नॅक कार्यशाळेत सहभाग.

२) दिनाक १८ जानेवारी २०२६ रोजी काव्यांगण साहित्य मंच, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत काव्यादीप प्रातिनिधिक या काव्यसंग्रहामध्ये (आय.एस.बी.एन., नं. ९७८ - ८१- ९९२९८५ - ६ - ९ ) दु:ख या शीर्षकाची कविता प्रकाशित.

३) दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा आयोजित '२१ व्या शतकातील भारतीय आणि जागतिक परिप्रेक्षातील सामाजिक परिवर्तन' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत " सोशल मिडीया, कृत्रिम बुध्दिमत्ता आणि सामाजिक संवाद" या संशोधन लेखाचे सादरीकरण व संशोधन लेख प्रकाशित.

४) दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी पुरातन आणि संग्रहालये संचालनालय विभागीय कार्यालय, पुणे विभाग आणि भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, वाघोली, पुणे संयुक्तपणे आयोजित भारतीय ज्ञान प्रनाली (IKS) : सर्वोच्च प्रणाली या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये ' मराठी भाषेचा उगम आणि ऐतिहासिक, वाङ्मयीन परंपरा' या विषयावरील संशोधन लेख सादरीकरण व आंतरराष्ट्रीय ई संशोधन जर्नल, पिअर रिव्ह्यूड, रेफर केलेले आणि इंडेक्स केलेले जर्नलमध्ये संशोधन लेख प्रकाशित.

५) श्रीपतराव चौगुले महाविद्यालय माळवाडी कोतोली जि. कोल्हापूर यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये सर्वांसाठी शिक्षण, वाचन संस्कृती आणि राजर्षी शाहू महाराजांचे विचार या विषयावर शोधनिबंधाचे वाचन केले.

❖ **सहा. प्रा. संजय वसंत निंबाळकर**

**हिंदी विभाग, प्रमुख**

महाविद्यालयीन विविध उपक्रमातील सहभाग:

१) दिनांक २५/२६ जुलै, २०२५ रोजी श्री मनोहर हरी खापणे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, पाचल मध्ये 'नॅक एस. एस. आर. मूल्यमापन' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन व सहभाग.

२) महाविद्यालयात दिनांक ११/१२/२०२५ ते १२/१२/२०२५ या कालावधीत क्रीडा महोत्सवात सहभाग.

३) दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचे आयोजन.

४) १४ सप्टेंबर २०२५ ते २० सप्टेंबर २०२५ या कालावधीत महाविद्यालयात हिंदी सप्ताह अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन.

❖ **सहा. प्रा. एस. एस. धोंगडे**

**हिंदी विभाग**

१) श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल ता. राजापूर, जि. रत्नागिरी आणि आय.क्यु.ए.सी. विभाग आणि मराठी विभाग, हिंदी विभाग, इतिहास विभाग व वाणिज्य विभागामार्फत आयोजित केलेल्या दिनांक २५,२६ जुलै २०२५ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय नॅक कार्यशाळेत सहभाग.

२) दिनांक ३१-०१-२०२६ ते ०१-०२-२०२६ या कालावधीत रिंगणे येथील ग्रामीण साहित्य संमेलनासाठी आलेल्या क्रांतीज्योतीचे स्वागत करण्यासाठी उपस्थित राहून सहभाग घेतला.

❖ **सहा. प्रा. श्री. नंदकुमार गोविंद देवण**

**इंग्रजी विभाग, प्रमुख**

**1)** Successfully Participated in the Three days “NAVONMESH” NEP Orientation workshop, jointly organized by Anandibai Raorane Arts, Commerce and Science College, Vaibhavwadi, Dist. Sindhudurg (Maharashtra) and MSFDA, Pune, Held from 10$^{th}$ to 12$^{th}$ February, 2026, focussing on the effective implementation and academic perspectives of the National Education Policy (NEP)2020.

## ❖ डॉ. मनोहर रामुलु कोंडागुर्ले

### ग्रंथपाल

**Research Paper and Participation in Seminars/Workshops/ Conferences/ Webinars:**

1) Article entitled "Emerging Technologies in Library Science: From Automation To Artificial Intelligence" Published in An International Scholarly Open Access, Peer Reviewed, Referred Journal of Emerging Technologies and Innovative Research (JETIR), ISSN: 2349-5162, Volume 13, Issue 1, January 2026.
2) Article entitled "The Role of Libraries as Third Places in Enhancing Wellbeing and Community Belonging", Published in International Journal of Innovative Science and Research Technology, ISSN: 2456-2165, Volume 11, Issue 1, January 2026.
3) Awarded with "Best Researcher Award" in the subject of Library and Information science in International Education Award for Excellence – 2025 for contribution in Research by Shri. Paramhans Education and Research Foundation Trust, New Delhi, dated 07/12/2026.
4) Article entitled "Digital Transformation as a Catalyst for Sustainable and Inclusive Knowledge Access: A Review Study" Presented in One Day National Conference on Sustainable Development in India, organized by Deshbhakt Ratnappa Kumbhar College of Commerce, Kolhapur, held on 13rd February, 2026.
5) Article entitled "Integration Open Education Resources into Library Services for Effective Research Skill Development" Presented in 4th National Conference on Changing Trends in Higher Education organized by YDVD Arts Commerce and Science College, Teosa, Dist. Amaravati (Maharashtra), dated 28/03/2026 and Published in Single Blind Peer Reviewed and Indexed Multidesciplinary International Research Journal, ISSN 2278-9308.
6) Book entitled "Artificial Intelligence in Education" (Principal Author Dr. Manohar R. Kondagurle & Co-Authored by Dr. Charu Gupta, Dr. Varanganthan Anita Avula, Dr. Sumit Kumar, Ishaan Arora) published by Vinsa Publishing, Delhi on May 2025. ISBN: 978-93-484-60-25-7.
7) Working as an Active Review Member of the esteemed "Journal of Emerging Technologies and Innovative Research" (An International Peer Reviewed Journal) ISSN-2349-5162.
8) Participated One Day National Workshop on "Beyond Installation: Practically Daily Management of D-Space Repository" Organized by Dept of Library of Bhogawati Mahavidyalaya, Kurukali and New College, Kolhapur in Association with SUCLA on 24/02/2026.
9) Article entitled "Digital Revolution and It's Impact on Library Services: Transforming Access, Services and The Future of Libraries Presented in on Day Multi-Disciplinary

National Conference (Hybrid Mode) on Emerging Research Trends in Language, Literature and Social Sciences organized by Phondaghat College, Phondaghat, held on 8th April, 2026.

10) Article entitled, “Transforming Libraries in Digital Era: Challenges Opportunities and Future Directions” Published in Peer Reviewed (Refereed Interdisciplinary Research Journal, April, 2026.

11) Participated in Three Days Online Bootcamp on Build Global Career as an Academic Writer organized by SkillArbitrage held on 21/02/2026 to 23/02/2026.

12) Participated in Two Days National Workshop on NAAC organized by IQAC of Shri. Manohar Hari Khapane College of Arts and Commerce, Pachal on 25-26, July, 2025.

## ❖ सहा. प्रा. पी. पी. राठोड
## कॉमर्स विभाग

1. Published and presented a research paper titled “Utilization of Artificial Intelligence in the Modern Economy: Lessons from Digital History,” examining the role of artificial intelligence in shaping contemporary economic systems.
2. Published and presented a research paper titled “NEP 2020 as a Catalyst for Economic Transformation: Aligning Indian Higher Education with Emerging Sectors,” highlighting the transformative potential of the National Education Policy 2020 in strengthening the linkage between higher education and emerging economic sectors.
3. Published and presented a research paper titled “Public Finance and Social Justice: An Analytical Study of Dr. B. R. Ambedkar’s Economic Philosophy,” focusing on Dr. B. R. Ambedkar’s contributions to public finance and their relevance to social justice and inclusive development in contemporary India.
4. Published and presented a research paper titled “Digital Economy and Financial Inclusion in Emerging Markets: An Inclusive Growth Theoretical Framework,” exploring the relationship between digital economic transformation and financial inclusion for sustainable and inclusive growth.
5. Successfully participated in the three-day “NAVONMESH” NEP Orientation Workshop, jointly organized by Anandibai Raorane Arts, Commerce and Science College, Vaibhavwadi (Maharashtra) and MSFDA, Pune, held from 10th to 12th February 2026, focusing on the effective implementation and academic perspectives of the National Education Policy (NEP) 2020.
6. Successfully completed the Six-Day Faculty Development Program (FDP) on “AI in Teaching and Learning,” organized by Abhinav Jnyan Mandir Sanstha’s Abhinav Jnyan Mandir Arts, Science and Commerce College, Karjat (Raigad), conducted from 5th to 11th March 2026, aimed at enhancing faculty competencies in integrating Artificial Intelligence tools into modern teaching–learning practices.

### ❖ सहा. प्रा. स्नेहल गोविंद चव्हाण
### कॉमर्स विभाग

१) श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल - रायपाटण आयोजित I.Q.A.C. विभाग इतिहास मराठी हिंदी, इंग्लिश आणि वाणिज्य या विभागामार्फत तीन दिवशीय राष्ट्रीय परिषदेचे दिनांक - २३/२४/२५ मार्च २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सहभाग आणि संशोधन लेख सादरीकरण केले.

२) ऑगस्ट २०२५ मध्ये मराठी साहित्य व कला सेवा संघ मुंबई यांच्यामार्फत आयोजित करण्यात आलेल्या खुल्या निबंधलेखन स्पर्धेमध्ये उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त करण्यात आले.

३) काव्यांगण साहित्य मंच महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत १८ जानेवारी २०२६ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या काव्यदीप या कवितासंग्रहामध्ये स्वरचित 'पैसा' ही कविता प्रकाशित करण्यात आली.

४) जानेवारी २०२६ या वर्षांमध्ये भारतीय डाक विभागामार्फत घेण्यात आलेल्या पत्रलेखन स्पर्धेमध्ये सहभाग.

५) राजापूर लांजा तालुका नागरिक संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या साहित्य संमेलनामध्ये स्वरचित 'पैसा' ही कविता सादरीकरणात सहभाग. तसेच त्यांच्या कविता संग्रहात कविता प्रकाशित.

६) अनुदूर येथील जवाहर महाविद्यालय संस्कृत विभागामार्फत या राज्यस्तरीय प्रतिनिधी काव्यसंग्रहासाठी 'मैत्री' ही स्वरचित कविता प्रकाशित.

### ❖ सहा. प्रा. पी. के. कांबळे
### कॉमर्स विभाग

१. श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय पाचल - रायपाटण आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मु. पो. येरडव येथील विशेष श्रमसंस्कार शिबिरात सहभाग.

२. महाविद्यालयाच्या स्टाफ अकॅडेमी या विभागाअंतर्गत 'वाणिज्य या संकल्पनेचा विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर मार्गदर्शन केले.

३. कॉमर्स या विभागांतर्गत तृतीय वर्ष, वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांना 'नियोजित अंतिम परीक्षा व भविष्याचा वेद' या विषयावर मार्गदर्शन केले.

# सांस्कृतिक विभाग - वार्षिक स्नेहसंमेलन क्षणचित्रे

















# नॅक कार्यशाळा क्षणचित्रे

## (दि. २५ व २६ जुलै २०२५)
























# राष्ट्रीय सेवा योजना विभाग




सायबर क्राईम या विषयावर मार्गदर्शन करताना सिया शेरे व उपस्थित मान्यवर



पूरग्रस्तांसाठी काढलेल्या मदत फेरीतील एक क्षण



पिकअप शेड परिसरात स्वच्छता करताना स्वयंसेवक



अनुस्कुरा घाटात वृक्षारोपण करताना स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी डॉ. विकास पाटील



महाविद्यालय परिसर स्वच्छता करताना स्वयंसेवक



अकोला येथील राज्यस्तरीय आव्हान शिबिरात सहभागी विध्यार्थी

*With Best Compliments From...*

# AARYAN CLEARING AGENCY

CUSTOM BROKER LICENCE NO- APOPK7553BCH001 (11/2094)



## MANOHAR KHAPANE

*Director*

1302,13th Floor, Real Tecn Park, Plot No.39/2,
Sector-30A, Vashi, Navi Mumbai-400703

■ Tel.: 022-27814922/23/24 ■ Dir.: 022-27815900 ■ Fax: 022-27816363

Email : aaryanclearing@gmail.com